कीं कर्म न करी बंध, ब्रह्मीं निष्काम अर्पिलें, ।
या कर्मयोगीं कर्माचा संन्यास हरि बोलिला. ॥ ४
कर्मसंन्यास म्हणजे कर्मत्यागचि तो असा, ।
कीं करूनी नसे केलें, न कळे अर्जुना असें. ॥ ५
वाटलें त्यास कीं कर्मत्याग बोलोनि, मागुती ।
कर्मयोग करू सांगे, तरि संदिग्ध बोल हे. ॥ ६
या आशयें प्रश्न करी, त्याचें उत्तर दे हरी ।
कीं हे एकाविणें एक सिद्धि देती न सर्वथा. ॥ ७
स्वातंत्र्य सांख्ययोगांसी कीं एकचि अनुष्ठितां. ।
दोहींचें फळ हा पावे. न तसें ये स्थळीं घडे. ॥ ८
ऐसें श्रीकृष्ण बोलेल, करितां प्रश्न अर्जुन. ।
तेथूनियां समश्लोकीं संगती श्लोक हे पृथक्. ॥ ९

**विषयप्रवेश.**

बोलोनि कर्मसंन्यास कर्मयोगहि बोलसी. ।
दोहींत श्रेय जें एक कृष्णा! तें सांग निश्चित. ॥ १
कल्याणकर संन्यास, कर्मयोगहि हा; परी ।
कर्मत्यागाहुनी थोर कर्मयोग विचारितां. ॥ २
जाणावा तोचि संन्यासी, इच्छा द्वेष नसे जया. ।
निर्द्वंद्व[२] जो, अनायासें बंधापासूनिया सुटे. ॥ ३
बोलती सांख्ययोगांतें पृथक् अज्ञ, न पंडित. ।
कीं एकाच्या अनुष्ठानें दोहींचें फळ पावतो. ॥ ४
पावती सांख्य ज्या स्थानीं, योगीही तेथ पावती. ।
सांख्ययोग असे ऐक्यें जो पाहे, तोचि डोळस. ॥ ५
संन्यास तो नव्हे ऐसा, जो कर्माविण दुर्लभ. ।
कर्मयोगें जो मुनि, तो ब्रह्म सत्वर पावतो. ॥ ६
कर्मयोगें शुद्धचित्त, जिंकिलीं इंद्रियें, मन, ।
जो देहजीवभूतात्मा, करितांही अलिप्त तो. ॥ ७
न कांहीं करितों, ऐसें मानितो नित्यतत्त्ववित्[१] ।
विषयीं वर्ततां, जातां, निजतां, श्वास वाहतां, ॥ ८

---

१. 'संशयें' असाही पाठ आहे. २. तत्त्वज्ञ.

कर्मेंद्रियक्रिया होतां, निमिषादिहि हालतां, ।
इंद्रियें स्वस्वविषयीं वर्तती, मानुनी असें. ॥ ९
कर्में समर्पुनी ब्रह्मीं, संग टाकूनि, जो करी ।
पापें, न लिंपे तो; जैसें जळीं कमळिणीदळ. ॥ १०
कायामनें, बुद्धिनेंही, [1]वासनातीत इंद्रियें, ।
चित्तशुद्ध्यर्थ करिती, संग टाकूनिया, क्रिया. ॥ ११
योगी कर्मफलत्यागें [2]स्थितीची शांति पावतो. ।
सकाम कामसंकल्पें बद्ध होतो फळीं रत. ॥ १२
करूनि कर्में, संन्यासी [3]मनें होऊनिया, सुखें, ।
असें नव[4]द्वारपुरीं, [5]न करी करवीहि ना. ॥ १३
कर्तृत्वकर्में लोकांचीं; न ईश्वर हि निर्मितो. ।
न कर्मफलभोगातें. वर्ते [6]संसारचक्र हें. ॥ १४
कोणाचें पापही [7]नेघे, नेघे पुण्यहि ईश्वर, ।
अज्ञानें वेष्टिलें ज्ञान, त्याणें [8]करिति, भोगिती. ॥ १५
अज्ञान बुद्धिचें ज्याचें, तें ज्या ज्ञानेंचि नाशिलें, ।
परा जडातें तें त्याचें प्रकाशी ज्ञान सूर्यवत्. ॥ १६
त्याचि ज्ञानीं बुद्धि, चित्त, [9]निष्ठा; तें परमाश्रय; ।
असे ते पावती मोक्ष, ज्ञानें जाळूनि [10]संचित. ॥ १७
विद्यासद्गुणसंपन्नीं ब्राह्मणीं, धेनुहीमधें, ।
गजीं, श्वानांत, चांडाळीं, पाहती सम पंडित. ॥ १८
समीं मन स्थिर; तिहीं [11]जितेंचि [12]भवें जिंकिला. ।
सम तें ब्रह्म निर्दोष; तस्मात् ब्रह्मींच ते [13]समीं ॥ १९
न हर्षे, प्रिय होतां जो; अप्रियें घाबिरा नव्हे; ।
स्थिरबुद्धि; न जो मूढ, ब्रह्मीं ब्रह्मज्ञ तो स्थिर. ॥ २०
स्पृहा न बाह्यविषयीं; स्वरूपीं पावतो सुख; ।

---

१. वासनारहित. २. समाधिस्थितीची. ३. जो मनानें संन्यस्त होऊन. ४. देहांत. ५. 'कांहीं न करवी करी' असाही पाठ आहे. ६. संसारचक्र आपोआप चाललें आहे. ७. घेत नाहीं. ८. जन कर्में आचरितात. ९. ज्ञान. १०. पूर्व कर्म. ११. जितेपणींच. १२. संसार. १३. स्थिर झाले, इति शेषः.

ब्रह्मयोगीं युक्तचित्त; तो भोगी सुख अक्षय. ॥ २१
जे भोग विषयस्पर्शें, तें दुःखाचेंचि कारण; ।
[1]आद्यंतवंत; कौंतेया! रमे ज्ञानी न त्या सुखीं. ॥ २२
जो [2]जितांच शके सोसूं, पूर्वींच मरणाहुनी, ।
कामक्रोधादि वेगांतें; तो योगी, तो सुखी, नर. ॥ २३
सुखी आंत, रमे आंत, अंतर्ज्योतीच जो स्वयें, ।
जाला ब्रह्मचि तो योगी, [3]ब्रह्मनिर्वाण पावतो. ॥ २४
पावती ब्रह्मनिर्वाण, जे ज्ञानी, क्षीणपातक; ।
द्वैतनाशें स्थिर मती, सर्वभूतहितीं रत. ॥ २५
जे कामक्रोधरहित, प्रयत्नीं वशचित्त जे, ।
देह वांचो मरो; ते तों मुक्त केवळ [4]आत्मवित् ॥ २६
बाहेरी बाह्यविषयां, दृष्टितें भोवयामधें, ।
नासिकीं वाहती प्राणापानातें करुनी सम. ॥ २७
बुद्धींद्रियमनस्थैर्य, मुनि, मोक्षपरायण, ।
नाहीं इच्छा, भय, क्रोध, ज्याला; मुक्तचि तो सदा. ॥ २८
भोक्ता यज्ञतपांचा मी, [5]सर्वलोकमहेश मी; ।
सर्वांचा मी सखा, मातें [6]जाणोनी शांति पावतो. ॥ २९

उपसंहार.

इति टीका समश्लोकी अध्याया पंचमावरी ।
श्रीपार्थसारथी कर्ता जो वामनमनोरथी. ॥ १
अध्याय हा पंचम स्वात्मयोगी, जो कर्मसंन्यास करी सुयोगी, ।
तो श्रेष्ठ [7]संन्यासि म्हणे हरी तो, [8]जो मोह माया स्मरणें हरीतो. ॥ २

---

## अध्याय सहावा.

उपोद्घात.

पूर्वाध्यायीं अर्जुनाचा प्रश्न कीं, 'श्रेय एक जें, ।
तें सांग कर्मसंन्यास, अथवा कर्मयोगचि.' ॥ १

---

१. आदि आणि अंत ज्यांना आहेत. २. जिवंत असतां. ३. ब्रह्माच्या ठायीं लीन होतो. ४. आत्मज्ञानी. ५. सर्व जगाचा परमेश्वर. ६. याप्रमाणें मला जाणणारा. ७. 'संन्यास' पाठ. ८. 'जो पार्थमोहासहि संहरीतो' पाठ.

श्रीकृष्णें उत्तर दिलें, कीं, 'मोक्षार्थी तयास या ।
दोहींविणें नव्हे सिद्धी, हे सापेक्ष परस्पर.' ॥ २
हें घडे सांख्ययोगांसी, कीं त्या दोहींत एकचि ।
अनुष्ठितां सिद्धि होय, बोलिली उभयत्र जे. ॥ ३
'संन्यासस्तु महाबाहो दुःखमाप्तुमयोगतः' ।
या श्लोकांत विनाकर्म बोलिला न्यास दुर्लभ. ॥ ४
'तयोस्तु कर्मसंन्यासात्कर्मयोगो विशिष्यते' ।
या श्लोकीं कर्मयोगातें श्रेष्ठ दोहींत बोलिला. ॥ ५
हें तों विरुद्ध, कीं कर्मयोगाची नीच पायरी ।
संन्यासज्ञानसिद्धीची शेवटीलीच पायरी. ॥ ६
याचा बोलोनिया भाव विरोधपरिहार या ।
अध्यायप्रथमारंभीं करी श्लोकद्वयें हरी. ॥ ७
'काम्यानां कर्मणां न्यासं संन्यासं कवयो विदुः' ।
ऐसें पुढें बोलणार अध्यायीं अठरावि‌या. ॥ ८
संन्यास दोंपरी ऐसा कीं काम्यत्याग एक हा, ।
शिखासूत्रादिकत्याग न्यास आश्रमरूप तो; ॥ ९
निरग्निआश्रमन्यास शुद्धचित्तासि बोलिला. ।
कर्मयोगाविणें जो कां पूर्वीं दुर्लभ वर्णिला. ॥ १०
टाकूनि काम संकल्प कर्में कृष्णार्पणें करी, ।
कर्मींच त्यास संन्यास साधे यास्तव थोर हा. ॥ ११
अशुद्धचित्त संन्यासी होतां भ्रष्टचि होइल. ।
निरग्नि मग तो कर्में शुद्धचित्त न हो शके. ॥ १२
तसाच जो क्रिया टांकी संन्यासपदवीविना ।
प्रत्यवायें बद्ध होतो उभयभ्रष्ट अक्रिय. ॥ १३
निरग्नीहुनिही श्रेष्ठ कर्मयोग अशा गुणें ।
अक्रियाहुनिही श्रेष्ठ हें बोलेल जगद्गुरू. ॥ १४

विषयप्रवेश.

कर्मी फलासक्त नव्हे, करावें कर्म, तें करी; ।
तो संन्यासी, तोचि योगी, न निरग्नि, न अक्रिय. ॥ १

---

१. जो मोक्षार्थी, त्यास. २. आचरितां. ३. त्याग. ४. संन्यासाश्रम. ५. कर्में करीत नाहीं तो.

संन्यास जो म्हणावा, तो कर्मयोगचि पांडवा ! ।
कीं काम्यत्याग संन्यास, कर्मयोग न त्याविण. ॥ २
योगारुरुक्ष[1] जो ज्ञानी, कर्म त्यासहि कारण; ।
तयाच योगारूढासी[2] ध्यान स्थितिस कारण. ॥ ३
जेव्हां न विषयीं गुंते, कर्मीही न रुते मन; ।
भोगसंकल्पही टाकी, तेव्हां आरूढ बोलिजे. ॥ ४
उद्धरावें स्वचित्तातें प्रपंचीं बुडवूं नये. ।
मित्र हें आपुलें चित्त, शत्रुही चित्त आपुलें. ॥ ५
मित्र त्याचेंचि तें चित्त, जें स्वरूपेंचि जिंकिलें. ।
अनात्मज्ञास शत्रुत्वें वर्ते चित्तचि शत्रुवत्. ॥ ६
शांताचें जितचित्ताचें थोर चित्त वरें स्थिर, ।
मानापमानीं शीतोष्णीं सुखदुःखांत जें सम, ॥ ७
ज्ञानें अनुभवें तृप्त जो कूटस्थ[3] जितेंद्रिय[4] ।
तो योगारूढ, कीं हेम भेंडें[5] धोंडा जया सम. ॥ ८
मित्र शत्रू उदासीन मध्यस्थ असखे सखे ।
साधू पापी, अशां सर्वी समबुद्धि विशेष तो. ॥ ९
कर्मयोगीं चित्त योजी सदा एकांत सेवुनी. ।
स्थिरचित्तें तनू एक, टाकी आशा परिग्रह[6]. ॥ १०
स्थापूनियां शुद्धदेशीं[7] स्थिर आसन आपुलें, ।
न बहू उंच ना नीच कुश चर्मावरी पट. ॥ ११
करूनि मन एकाग्र स्थिर चित्तेंद्रियक्रिया ।
चित्तशुद्ध्यर्थ योजावा योग बैसोनि आसनीं. ॥ १२
माज[8] पाठ शिर ग्रीवा[9] नीट हे धरुनी स्थिर, ।
ठेवूनि दृष्टि नासाग्रीं न पहाव्या दिशा दश. ॥ १३
मन निर्भय जो शांत ब्रह्मचारी व्रतस्थ जो ।
मद्रूपीं लावुनी चित्त वसे मत्पर होउनी. ॥ १४
ऐसें सदा चित्त योजी, योगी आवरुनी मन, ।
मोक्षासि साधन असी माझी तो शांति पावतो. ॥ १५

---

१. योगरूप वृक्षावर चढूं इच्छिणारा, योग प्राप्त करून घेण्यास इच्छिणारा. २. योगरूप वृक्षावर चढलेल्याला; योग प्राप्त करून घेतला आहे ज्यानें, त्याला. ३. निर्विकार. ४. ज्यानें इंद्रियें जिंकिलीं. ५. मातीचें ढेंकूळ. ६. गुंता. ७. शुद्धस्थानीं. ८. मध्यभाग, कंबर. ९. मान.

न योग बहु खातांही, न एकाग्रत्व लंघनीं, ।
न बहु निजतां, नित्य जागतां हि न, अर्जुना ! ॥ १६
विहार आहार चेष्टा कर्मीं निद्रा [1]प्रबोधही ।
युक्त ज्याचीं तया साधे योग जो दुःखनाशक. ॥ १७
आत्मस्वरूपींच चित्त राहे जेव्हां नियोजिलें ।
सर्व कामस्पृहाशून्य म्हणावा सिद्ध तेधवां. ॥ १८
निवातसदनीं दीप न हाले उपमा असी ।
चित्तास योगियाच्या जो स्वात्मयोगासि योजितो. ॥ १९
जेथें [2]उपरमे चित्त योगमार्गें निरोधिलें, ।
जेथें चित्तें आत्मयातें पाहे तोष तयांतचि, ॥ २०
तेथें अनंत सुख जें [3]बुद्धिग्राह्य [4]अतींद्रिय ।
जाणे त्यातें; न मग हा तत्त्वापासूनिया चळे. ॥ २१
न मानी लाभ अधिक त्या सुखाहुनि आणखी, ।
न चळे थोर दुःखेंही पावतां, ज्या सुखीं स्थिती. ॥ २२
दुःखसंयोग वृत्तीचा तद्वियोगांत आयता ।
चित्तात्मयोग तो यत्नें साधावा दृढनिश्चयें. ॥ २३
संकल्प करितां [5]जाले काम ते सर्व टाकुनी ।
मनेंचि [6]इंद्रियग्राम दंडूनी सकळां स्थळीं. ॥ २४
[7]धैरणायुक्त बुद्धीनें व्हावें स्थिर हळू हळू ।
योजूनि चित्त [8]चिन्मात्रीं कांहीं चिंतू नये मग. ॥ २५
ज्या ज्या पदार्थीं [9]निघतें मन चंचल अस्थिर ।
तेथें तेथेंचि आत्मा हा करावें वश त्यांत तें. ॥ २६
ऐशा प्रशांतचित्तातें योग्यातें सुख उत्तम ।
साधे रजतमातीत ब्रह्मरूप अकर्मक. ॥ २७
योजी ऐसा सदा चित्त योगी ज्यास न वासना ।
ब्रह्मस्पर्शें अनायासें अत्यंत सुख भोगितो. ॥ २८
सर्व भूतांमधें आत्मा भूतें तीं आत्मयामधें ।
नित्य योगीं चित्त असा तो पाहे समदर्शनी. ॥ २९

१. जागृति. २. स्थिर होतें. ३. बुद्धीनेंच जाणायाचें. ४. इंद्रियांच्या आटोक्या बाहेरचें. ५. झालेले. ६. इंद्रियसमुदाय. ७. धैर्ययुक्त. ८. ब्रह्मीं; आत्मत्वीं. ९. रिघतें; शिरतें.

मातें सर्वत्र जो पाहे पाहे सर्व मदंतरीं, ।
मी त्याचा त्यास सोडीना तो माझा सोडिना मला. ॥ ३०
सर्वभूतस्थ त्या मातें भजे धरुनि एकता; ।
मजमध्येंच तो योगी प्रपंचीं जरि सर्वथा. ॥ ३१
स[1]र्वभूतीं स्वदृष्टान्तें जो पाहे सम अर्जुना! ।
सुखा दुःखासही योगी तो थोर मज संमत. ॥ ३२
जो योग हा बोलिलासी साम्यें श्लोकचतुष्टयें, ।
त्याच्या स्थितीतें स्थिर मी न देखें मधुसूदना! ॥ ३३
कीं कृष्णा! चंचळ मन इंद्रियें जें मथी बळी ।
त्याचा निग्रह वाऱ्याची मोट जैशी न बांधवे. ॥ ३४
खरेंच हें महाबाहो! मन चंचल दुर्जय, ।
अभ्यासें अणि वैराग्यें तरी तें जिंकिजे तसें. ॥ ३५
माझी हे बुद्धि कीं योग नव्हे, जों मन नावरे, ।
प्रयत्नशीळें स्ववशें तो पावों शकिजे मनें. ॥ ३६
निष्ठा असोनि अळसी, मन योगांतुनी चळे, ।
न योग पावतां कृष्णा! जाय कोणे गतीप्रती? ॥ ३७
तो काय उभयभ्रष्ट मेघांचें जेंवि थी[2]गळ, ।
अपक्व पावला मोह ब्रह्ममार्गीं म[3]हाभुजा!? ॥ ३८
निःशेष या संशयातें कृष्णा! छेदिसि एक तूं. ।
या संशयाचा संहर्ता न दिसे तुजवांचुनि. ॥ ३९
पार्था! न येथें न स्वर्गीं त्याचा नाश घडे कधीं; ।
कल्याणमार्गीं या कोणी बापा! जाय न दुर्गती. ॥ ४०
पावोनि पुण्यलोकांतें वर्षें अ[4]मुप राहुनी ।
शुची श्रीमंतसदनीं तो योगभ्रष्ट जन्मतो. ॥ ४१
योगियांचेच अथवा कुळीं होतो[5] भल्यांचिया ।
हा जन्म दुर्लभ बहू या लोकीं जो असे रिती. ॥ ४२
त्या देहीं पूर्वदेहींचा बु[6]द्धिसंयोग पावतो ।
मोक्षीं मग बहू यत्न करितो कुरुनंदना! ॥ ४३

---

१. सर्व भूतांच्या ठायीं असणारा. २. तुकडा. ३. महाबाहो अर्जुना. ४. पुष्कळ. ५. जन्मतो. ६. बुद्धिसंस्कार.

त्याला तत्पूर्वअभ्यास बळें योगींच योजितो ।
पूर्वीं तो योगजिज्ञासु तरी वेदां अतिक्रमी. ॥ ४४
प्रयत्नें साधितां योग जाते किल्बिषवासना; ।
अनेक जन्मीं जे सिद्ध या जन्मीं मुक्ति पावतो. ॥ ४५
तापसांहुनिही थोर संमत ज्ञानियांहुनी ।
कर्मयोग्यांहुनी तस्मात् योगी तूं होइं अर्जुना! ॥ ४६
स्वरूपनिष्ठ चित्तें जो यां सर्वां योगियांमधें ।
भक्तियोगें भजे मातें तो योगी थोर संमत ॥ ४७

उपसंहार.

इति टीका समश्लोकी षष्ठाध्यायात्मदीपिका ।
श्रीपार्थसारथी कर्ता जो वामनमनोरथी. ॥ १
षष्ठाध्यायीं संयमयोग नामा, बोधी पार्था श्रीहरी तो अनामा ।
अभ्यासीतां तत्त्वबोधावलोका, दे सौख्यातें क्षिप्र हा संतलोकां. ॥ २

---

## अध्याय सातवा.

उपोद्घात.

योगियांतहि सर्वांत जो भजे भक्तिनें मला, ।
तो थोर षष्ठाध्यायांतीं भगवान् बोलिला स्वयें. ॥ १
योगी होऊनियां कैसा भक्त हें अर्जुनाप्रती ।
सांगतो सप्तमाध्यायीं प्रसंगें ज्ञानभक्तिही. ॥ २

विषयप्रवेश.

सप्रेम मन मद्रूपीं योगाभ्यासीं मदाश्रित ।
सर्वत्वीं जाणसी मातें जसें, तें स्पष्ट आइक. ॥ १
विज्ञानेसीं तुतें ज्ञान हें मी निःशेष सांगतों, ।
जें जाणोनि पुन्हा येथें जाणणें हें उरेचि ना. ॥ २
मनुष्यांच्या सहस्रांत मोक्षयत्नीं नर क्वचित् ।
यत्नेंही सिद्ध जे त्यांत जाणे तत्त्व असा क्वचित्. ॥ ३

---

१. योग जाणण्याची ज्याला इच्छा झाली तो. २. पापवासना. ३. 'योगअभ्यास' पाठ. ४. नामरहित. ५. सत्वर.

पंचभूतें बुद्धि मन अहंकारहि आठवा ।
माझी प्रकृति हे ऐसी अष्टधा भेद पावली. ॥ ४
अपरा कार्यरूपा हे मूळ प्रकृति ते परा ।
चिदंशें जीव जे जाली, जाणिजेतें जिणें जग. ॥ ५
ईपासोनिच हीं भूतें मूळ चिच्छक्ति जाण हे, ।
उत्पत्तिप्रलयस्थान सर्वांचें जाण मी तसा. ॥ ६
धनंजया! नसे कांहीं मजहूनि पलीकडे ।
मजमध्यें ओविलें हें विश्व, सूत्रीं जसे मणी. ॥ ७
जळीं विभूती रस मी, चंद्रसूर्यांत मी प्रभा, ।
वेदीं प्रणव मी, शब्द नभीं, पौरुष[1] मी नरीं. ॥ ८
पृथ्वींत मी पुण्यगंध, तेज तें मी हुताशनीं[2], ।
जीवन प्राणिमात्रांत, तप मी तापसांमधें. ॥ ९
भूतें मिथ्यांबु[3] मी सूर्य, असें तद्बीज नित्य मी, ।
बुद्धिवंतांत मी बुद्धी, तेज तेजस्वियांत मी. ॥ १०
बळवंतांत बळ मी कामरागविवर्जित. ।
न धर्मासी जो विरुद्ध कामही तो विभूति मी. ॥ ११
आतां सत्त्वादि जे भाव ते मिथ्या सर्प, दोर मी. ।
कीं मी रज्जू न त्या सर्पी, मज रज्जूंत सर्प तो. ॥ १२
या तीं गुणांच्यिया भावीं मोहेंलें विश्व हें मज, ।
नेणे[4] जो मी आत्मरज्जू गुण सर्पापलीकडे. ॥ १३
मी देव, माझी त्रिगुणा हे माया तरवे न जे, ।
मातेंचि जे भजति ते मायेतें तरताति या. ॥ १४
मातें न भजती पापी मूढ जे पुरुषाधम ।
जे भ्रष्टबुद्धि मायेनें पावले दैत्यभाव जे. ॥ १५
भजती सुकृती मातें अर्जुना! ते चतुर्विध ।
आरोग्यकाम[5] जिज्ञासु[6] अर्थार्थी आणि आत्मवित्[7]. ॥ १६
ज्ञानी त्यांत सदायुक्त एकत्वीं भक्ति, थोर तो. ।
त्यास मी प्रिय कीं स्वात्मा, तोही आत्मा मम प्रिय. ॥ १७

---

१. पराक्रम. २. अग्नींत. ३. मृगजल. ४. विसरलें. ५. आरोग्य ज्याला पाहिजे आहे असा. ६. ज्ञानेच्छु. ७. आत्मज्ञानी.

तेहि थोर, परी ज्ञानी मी मदात्माचि मानितों, ।
मातें स्वसद्गतीतेंची भजतो युक्तचित्त जो. ॥ १८
बहुजन्माच्चिया अंतीं ज्ञानी मातें भजे असा ।
कीं 'वासुदेव हें सर्व', तो थोर अति दुर्लभ. ॥ १९
ज्या ज्या कामीं ज्ञान नेलें त्या त्या कामीं [1]सुरेतरां, ।
त्या त्या नेमेंचि भजती वश स्वप्रकृतीस जे. ॥ २०
जो जो जी जी तनू भक्त श्रद्धेनें म्हणतो 'भजों,' ।
त्या त्यास अचल श्रद्धा त्या त्या रूपींच देतसें. ॥ २१
त्या श्रद्धेनें त्यास पूजी; त्यांत जो अन्यसेवक, ।
त्यापासूनिहि जे पावे काम, ते म्यांचि निर्मिले. ॥ २२
अंतवंतें फळें त्यांचीं अल्पबुद्धींस होति जीं. ।
मेल्या ते पावती त्यांतें, मद्भक्तहि मजप्रती. ॥ २३
[2]व्यक्त मी मज ते ऐसें अव्यक्ता मूढ मानिती, ।
नेणतां परवस्तू जे मी अत्युत्तम अव्यय. ॥ २४
झांकलों योगमायेनें सर्वां प्रकट मी नसें. ।
मातें नेणे मूढलोक जो अनादि अनंत मी. ॥ २५
जीं गेलीं त्यांस मी जाणें, हो[3] तीं त्यांसहि अर्जुना! ।
भूतें होणारही जाणें; मातें कोणीच नेणती. ॥ २६
प्रियेच्छा-अप्रियद्वेषें द्वंद्वमोहें करूनिया ।
सर्वभूतें सृष्टिकाळीं मोह पूर्वील पावती. ॥ २७
ज्यांच्या अंतरिंचीं गेलीं पापें पुण्यक्रियाबळें, ।
मातें भजति ते द्वंद्वमोहत्यागें [4]दृढव्रत. ॥ २८
नाशावया [5]जरामृत्यु यत्न ज्यांचे मदाश्रयें, ।
ते ब्रह्म जाणती कीं, तें सर्व अध्यात्म कर्मही. ॥ २९
अधिभूता अधियज्ञा सह जो अधिदेव मी ।
त्या मातें जाणती, [6]प्राणप्रयाणीं तेचि जाणती. ॥ ३०

---

१. इतर देवतांकडे. २. ते मूढ मज अव्यक्ता मी व्यक्त ऐसें मानिती—असा अन्वय. ३. आहेत. ४. ज्यांचें व्रत दृढ ते. ५. वृद्धपणा आणि मृत्यु. ६. देह सोडून जातांना.

### उपसंहार.

इति टीका समश्लोकी अध्याया सप्तमावरी ।
श्रीपार्थसारथी कर्ता जो वामनमनोरथी. ॥ १

अध्याय हा सप्तम योगनामा, विज्ञानविख्यात स्वयें अनामा, ।
अभ्यास अभ्यास करी महात्मा, चतुर्विधा माझिही भक्ति वैर्मा. ॥ २

---

## अध्याय आठवा.

### उपोद्घात.

सप्तमाध्यायपर्यंत तत्त्वमार्ग जगद्गुरू ।
बोलिला अर्जुनाला, तें जालें सर्व परोक्षवत्. ॥ १
पुसावें अर्जुनें तत्त्व, करावी करुणा मग; ।
या भावें सप्तमाध्यायीं सप्तधा ज्ञेय बोलिलें. ॥ २
कीं ब्रह्म, अध्यात्म, कर्म, अधिभूतादि, मी तया ।
मातें जाणति पुण्यात्मे, भजती मजलाचि ते. ॥ ३
'तद्विद्धि प्रणिपातेन' इत्यादि श्लोक दोन हे ।
अध्यायांत चतुर्थांत बोलिला याचि आशयें. ॥ ४
कीं जाइं संतां शरण, ते ज्ञान उपदेशिती. ।
भाव कीं ये शरण तूं, मग सांगेन तत्त्व मी. ॥ ५
परंतु कर्मसंन्यासें, कर्मयोगें करूनिया ।
श्रेय, हा संशय मधें आड आला धनंजया. ॥ ६
पंचमाध्यायआरंभीं केला प्रश्न, म्हणूनिया ।
संन्यासकर्मयोगाचें कृष्णें तत्त्व निरूपिलें. ॥ ७
प्रसंगें आरुरुक्षाला कर्म कारण बोलतां ।
आरूढ कैसा? हे शंका हराया योग बोलिला. ॥ ८
समाधि निर्गुणाकार पष्ठाध्यायांत बोलिला. ।
विश्वात्मयोगही तेथें फळरूपेंचि वर्णिला; ॥ ९
तो विस्तारें सप्तमांत विभूतींसह बोलिला. ।
'वासुदेवः सर्वमिति' प्रसंगें भक्त वर्णिला. ॥ १०

---

१. मार्ग. २. कर्में ईश्वरार्पित करून. ३. योगरूप वृक्षावर चढूं इच्छिणाराला.

उत्तमश्लोकमुखिचें हें श्लोकामृत सेवितां ।
तत्त्वप्रश्न करावा, हें न स्मरे पांडुनंदना. ॥ ११
कृपा जरी उपजली तरि आपण होउनी, ।
नये शरण जों संतां, तत्त्व सांगों नये तया. ॥ १२
म्हणोनि पूर्वाध्यायान्तीं ब्रह्मकर्मादि सप्तधा ।
ज्ञेय बोलोनि संक्षेपें, प्रश्नाचें बीज पेरिलें. ॥ १३
कीं ब्रह्म जाणती तेचि तें सर्व ब्रह्म जाणती ।
भावें कीं वेगळें आधीं जाणतां सर्व ब्रह्म तें. ॥ १४
'अक्षरं ब्रह्म परमं' ऐसें उत्तरही पुढें ।
होणार, कीं जें परम शुद्ध तें ब्रह्म अक्षर. ॥ १५
भाव कीं–क्षरही ब्रह्म बोलिजे अधिभूत जें, ।
'अधिभूतं क्षरो भावो' म्हणोनिहि वदेल जें. ॥ १६
जें अक्षर क्षर हि तें, जें सोनें तेंचि भूषण. ।
जें कां केवळ तें सोनें [1]म्हणतां, तेंचि भूषण. ॥ १७
न विकार सुवर्णाला, न अलंकार वेगळा. ।
न विकार क्षरत्वींही, न अन्य क्षरभागही. ॥ १८
गूढार्थ हा न कळतां करावा प्रश्न अर्जुनें, ।
करावा मग तत्त्वाचा उपदेश अनुग्रह, ॥ १९
या भावें सप्तधा ज्ञेय बोलोनी राहिला उगा, ।
प्रश्नबीजांतही तत्त्व गूढभावें निरोपुनी. ॥ २०
त्यामधें ब्रह्म जें सर्व जाणावें काय काय तें ।
तरि ब्रह्मचि अध्यात्म, म्हणजे तेंचि आपण. ॥ २१
आपला भाव अध्यात्म याचें उत्तरही असें, ।
भाव कीं, हा स्वयें ब्रह्म जो जाणों इच्छितो तया. ॥ २२
कर्म कीं क्षरभागाची उत्पत्ती करि सृष्टि ते ।
भूतांची आणखी नाना भावांचा जेथ उद्भव. ॥ २३
न भोंवतां भोंवताहे मेदिनी [2]स्पृष्टिच्या भ्रमें. ।
ब्रह्म क्रियारूप दिसे अविद्यादृष्टिच्या भ्रमें. ॥ २४
एवं कर्म ब्रह्म आणी अधिभूतादि जें त्रय, ।
तेंहि ब्रह्मचि जाणावें तिन्ही एकांत एक जीं. ॥ २५

१. 'म्हणावें' असाही पाठ आहे. २. स्पर्शशक्तीच्या.

आकाशीं कुंभ सजळ, आकाश उदकीं घटीं; ।
प्रतिबिंबें नभ जळीं, सर्व एकांत एक हें. ॥ २६
ईश्वरामाजि हे देह, देहीं व्यापक ईश्वर, ।
जीव तत्प्रतिबिंबांश, सर्व एकांत एक हे. ॥ २७
त्यामध्यें अधिदेवाख्य जीवात्मा प्रतिबिंबतो, ।
उपाधिवांचुनी आणि बिंबावांचूनि जो नसे. ॥ २८
प्रतिबिंब दिसे [१]व्योम जें कां डळमळी जळीं, ।
बिंबाकाशा घटापाण्यावांचोनी तें असेचि ना. ॥ २९
'साधिभूताधिदैवं मां साधियज्ञं च ये विदुः' ।
म्हणोनि दोहींसहित अधिदेव निरूपिला. ॥ ३०
यालागिं देह क्षर जो म्हणावा अधिभूत तो. ।
तयासहित जाणावा जीवात्मा अधिदेव तो. ॥ ३१
अधियज्ञासहित कीं, निज बिंबात्मया सह ।
जाणावा फलभोक्ता हा तो यज्ञादि[२]फलप्रद. ॥ ३२
प्रश्नोत्तरहि ऐसेंची होणार, अधिभूत जो ।
[३]क्षर तो आणि पुरुष अधिदेव म्हणूनियां. ॥ ३३
अधियज्ञहि या देहीं मीचि या उत्तरीं हरी ।
बोलेल, याचि अर्थातें पहावें सज्जनीं बरें. ॥ ३४
गूढार्थ हा न कळतां करील प्रश्न अर्जुन; ।
तेथूनिया समश्लोकी, संगतीश्लोक हे पृथक्. ॥ ३५

विषयप्रवेश.

काय तें ब्रह्म, अध्यात्म, कर्मही, पुरुषोत्तमा! ।
अधिभूत कसें कैसें अधिदैवहि बोलिजे. ॥ १
अधियज्ञ कसा, कोण, या देहीं मधुसूदना!? ।
जाणावा हा कसा प्राणप्रयाणीं सुज्ञ जे तिहीं? ॥ २
[४]परमक्षर तें ब्रह्म, अध्यात्म स्वात्मभाव जो, ।
[५]भूतभौतिक उत्पत्ती करी जें सृष्टि, कर्म तें. ॥ ३
अधिभूत [६]क्षरतनू, जीवात्मा अधिदैवत, ।
बिंब त्या प्रतिबिंबाचा देहींच अधियज्ञ मी. ॥ ४

---

१. आकाश. २. फळ देणारा. ३. नाशवंत. ४. परम अक्षर. 'अक्षर ब्रह्म जें शुद्ध' असाही पाठ आहे; ५. चराचराची. ६. नाशवंत शरीर.

मातेंचि अंतकाळींही स्मरतां देह सोडुनी ।
जो जाय, तो मत्स्वरूपा पावे येथें न संशय. ॥ ५
जें जें आणिकही रूप स्मरतां देह जो त्यजी ।
तें तेंचि पावे, स्मरणीं रंगला ज्याचिया सदा. ॥ ६
तस्मात् तूं सर्वदा मातें स्मरें, हें युद्धही करीं, ।
समर्पितां बुद्धि मन मज, मातेंचि पावसी. ॥ ७
अभ्यासयोगें, अन्यत्र जाय ना ऐसिया मनें ।
दिव्य चिन्मात्र पुरुषा पावे सतत चिंतितां. ॥ ८
पुराण सर्वज्ञ फलप्रदाला, स्मरेल जो सूक्ष्म अतींद्रियाला, ।
अतर्क्यरूपीं धरि विश्व ज्याला, सूर्य प्रकाशूनि तमीं निराळा. ॥ ९
प्राणप्रयाणीं मन आवरूनी, मद्भक्तिनें योगबळें करूनी, ।
प्राणें निज भ्रूयुगचक्र भेदी, पावे स्वदिव्या पुरुषा अनादी. ॥ १०
जें बोलती अक्षर वेद संत, यती विरागी निघती जयांत ।
इच्छूनि जे कां गुरुभक्त होती, तत्प्राप्ति सांगेन निरोधरीती. ॥ ११
कोंडूनि सकळ द्वारें, हृदयीं मन कोंडुनी, ।
धरूनि मस्तकीं प्राण अनुष्ठी योगधारणा. ॥ १२
ॐ हें एकाक्षर ब्रह्म जपे मातें स्मरे, असा ।
अर्चिरादिपथें जाय, ब्रह्म्यासह तया गती. ॥ १३
नव्हे इतर मी ऐशा चित्तें मातें स्मरे सदा, ।
पार्था! सुलभ मी त्याला योगीं जो नित्य योजिला. ॥ १४
मातें पावोनिया, जन्म दुःखाचें घर नश्वर ।
न पावती पुन्हा संत, थोर जे गति पावले. ॥ १५
अर्जुना! पुनरावृत्ति ब्रह्मलोकादिकांहुनी ।
मातें पावोनि, तो कोणी पुन्हा जन्मा न ये कधीं. ॥ १६
युगें सहस्र दिवस, ब्रह्म्याची रात्रिही तसी, ।
जाणती तेथ जे गेले क्रममुक्त्यर्थ राहिले. ॥ १७
प्रकृतीपासुनी व्यक्ती होती ब्रह्मदिनागमीं; ।
लीना प्रकृतितत्त्वीं या होती आरंभितां निशा. ॥ १८

---

१. इंद्रियरहिताला. २. प्राण सोडितांना. ३. दोनी भोंवयांमधील चक्र. ४. अविनाशी. ५. रिघती, मिळती. ६. नाशवंत. ७. पुनर्जन्म. ८. ब्रह्म्याचा दिवस येतां.

तोचि हा ग्राम भूतांचा होतो, होऊनि नासतो; ।
रात्रीं अवश हा लीन, दिनारंभींच होतसे. ॥ १९
सत्ता निराकार तयां भूतां प्रकृतिहीहुनी ।
निराळी सर्वभूतीं, जे न नासे विश्व नासतां. ॥ २०
जो अक्षर निराकार, तो श्रेष्ठ गति बोलिजे. ।
न येति तेथ जे गेले; माझें परम धाम तें. ॥ २१
तो तों अद्वैतभक्तीनें पार्था! पुरुष पाविजे, ।
ज्याच्या स्वरूपीं हीं भूतें, ज्याणें हें व्यापिलें जग. ॥ २२
ज्या काळीं न पुन्हा जन्म, योगियां जन्मही जयीं, ।
ते सांगतों देवताही, मार्गी भेटति ज्या क्रमें. ॥ २३
अग्निही, ज्योतिही, दीसें, पक्षही, शुक्लमास सा ।
उत्तरायण, हा मार्ग वेदज्ञा ब्रह्मलोकिंचा. ॥ २४
धूम, रात्रि, कृष्णपक्ष सा मास दक्षिणायन; ।
चंद्रामृत अशा मार्गें योगी पावोनि जन्मतो. ॥ २५
शुक्लकृष्णगती ऐशा विश्वाच्या शाश्वता बऱ्या. ।
पहिलीनें नये जन्मां, दुसरीनें फिरे पुन्हा. ॥ २६
जाणोनि मार्ग हे दोनी आत्मयोगी न मोहती. ।
अर्जुना! होइं तूं तस्मात् योगयुक्तचि सर्वदा. ॥ २७
वेदांमधें, यज्ञतपांमधेंही, दानांतही, जें फळ पुण्य कांहीं, ।
अतिक्रमी जाणुनि सर्व मातें, योगी चढे आद्य परंपदातें. ॥ २८

उपसंहार.

इति टीका समश्लोकी अध्याया आठव्यावरी. ।
श्रीपार्थसारथी कर्ता जो वामनमनोरथी. ॥ १
आठवा देवकीचा जो, आठवा अवतार जो, ।
आठवा तत्कृताध्याय आठवा हृदयीं सदा. ॥ २
अध्याय हा 'अक्षरयोग' नामा, जो आठवा आठवितां अनामा. ।
पावाल हो सद्यचि स्वात्मठेवा, अविस्मरें हेंचि मनांत ठेवा. ॥ ३

---

१. उत्पन्न होतो. २. अविनाशी. ३. स्थान. ४. दिवस. ५. सहा. ६. आठवा पुत्र. ७. स्मरा.

## अध्याय नववा.

### उपोद्धात.

देणें असें अनंताचें कीं, अनंत न मागवे. ।
पुसेल मार्ग तत्त्वाचे किती अर्जुन बापुडा? ॥ १
आलें कृपेचें भरतें करुणावैरुणालया; ।
जें गुह्याहुनिही गुह्य तें सांगेल अतःपर. ॥ २
ज्ञानाचें फळ तों हें कीं आत्मयांत चराचर ।
देखे, चराचरीं आत्मा, तेव्हां तो सिद्ध बोलिजे. ॥ ३
पावे जो या अनुभवा, योगभ्रष्ट न होय तो. ।
काण्वशाखा यजुर्वेदी बोलते स्पष्ट हे श्रुती. ॥ ४
अर्थ कीं सर्व भूतांतें जो आत्म्यांतचि देखतो, ।
आत्म्यांस सर्वभूतीं जो, तो नव्हे निंद्य त्यावरी. ॥ ५
अनुष्टुप्श्लोकरीती हे दिसते, परि हे श्रुती; ।
अर्थ कीं स्पष्टही ऐसा होय, तेव्हां न निंद्य तो. ॥ ६
योगाभ्यासीं भ्रष्ट होय, तेव्हां तो निंद्य बोलिजे, ।
कीं पदाप्रति तो थोरा वेंचतां च्यवला अहो! ॥ ७
जो या अनुभवा पावे, तो कधीं भ्रष्ट होय ना. ।
यालागीं श्रुति बोले कीं तो नव्हे निंद्य त्यावरी. ॥ ८
षष्ठाध्यायांत हरिही श्लोकामाजि तिसाविया ।
बोलिला कीं, 'असा योगी, नेदीं अंतर त्यास मी.' ॥ ९
मातें सर्वत्र जो पाहे, पाहे सर्व मदंतरीं, ।
मी त्याचा, त्यास सोडीना, तो माझा, सोडिना मला. ॥ १०
षष्ठाध्यायश्लोकटीका समश्लोकीहि ये रिती ।
तस्मात्सर्वात्मकध्यानें योगभ्रष्ट नव्हे कधीं. ॥ ११
'तद्विद्धि प्रणिपातेन' इत्यादि श्लोक दोनि हे ।
चतुर्थाध्याय तेथेंही बोलिला तो जगद्गुरू. ॥ १२

---

१. कृष्णाचें. २. अंत नाहीं ज्याला असें. ३. समुद्राला. ४. 'यस्तु सर्वाणि भूतानि आत्मन्येवानुपश्यति । आत्मानं सर्वभूतेषु न ततो विजुगुप्सते ॥' ही श्रुति. ५. कवळितां. ६. पतन पावला. 'चळला' असाही पाठ आहे.

'तद्विद्धि प्रणिपातेन' या श्लोकीं 'ज्ञान ये रीती ।
गुरूपदेशही घे तूं,' म्हणूनि हरि बोलिला. ॥ १३
यापुढें दुसऱ्या श्लोकीं उत्तमश्लोक बोलिला ।
कीं, 'तूं अशेष हीं भूतें आपणामाजि देखसी; ॥ १४
तेधवां मजसीं ऐक्य कीं अखंड अशा रिती, ।
भूतें मजमधें तूंही ज्ञान ये रिति देखसी'. ॥ १५
तस्मात् गुरूपदेशाचें फळ कीं, आपणामधें ।
दिसती सर्वही भूतें, तंतूमाजि जसा पट. ॥ १६
आतां गुरू स्वयें जाला पूर्वाध्यायीं जगद्गुरू[1] ।
ब्रह्म अध्यात्म कर्मादि ब्रह्मत्वें उपदेशिलें. ॥ १७
क्षरभागहि ते ठायीं ब्रह्मत्वें उपपादिला, ।
परंतु सातवा प्रश्न वर्णितां ग्रंथ वाढला. ॥ १८
क्षरभाग कसा ब्रह्म हें कळे स्पष्ट जेधवां, ।
सर्वभूतें आत्मयांत, आत्मा भूतीं दिसे तयीं. ॥ १९
दोरामधें सर्प जैसा ब्रह्मीं तैसें चराचर, ।
ब्रह्म दोर दिसे तेव्हां दिसे सर्प चराचर. ॥ २०
तें ज्ञान सांगेल येथें अध्यायीं नवमीं हरी ।
कीं, 'सूर्यकिरणीं पाणी मजमध्यें तसें जग.' ॥ २१
मूढाची उदकीं दृष्टी, जीवदृष्टी जडा जगीं ।
सूर्याचे किरणीं दृष्टी देखोनीहि मृषाजळ. ॥ २२
स्वस्वरूपीं सदा दृष्टी सगुणाची तयांतची, ।
भासे चराचर मृषा, जाणे सर्वज्ञ त्यासही. ॥ २३
अर्जुनाची जीवदृष्टी, विश्व सत्य दिसे तया. ।
'त्या दृष्टिनें मजमधें सर्व भूतें' म्हणे हरी. ॥ २४
मूढदृष्टी दिसे पाणी, सूर्य अंगीकरूनियां ।
म्हणे, 'मजमधें पाणी आहे, कीं तुज दीसतें?' ॥ २५
म्हणेल मागुतीं कृष्ण कीं, 'मी भूतांमधें नसें.' ।
मूढातें बोलतो सूर्य कीं, 'त्या पाण्यांत मी नसें.' ॥ २६
आतां 'जसें जीवदृष्टी आपणांत चराचर ।
अंगी केलें, तसें त्यांत मीही आहें,' म्हणों जरी, ॥ २७

---

१. 'उपदेशिला' असाही पाठ आहे.

माजे दृष्टीस हें विश्व नाहींच मज अंतरीं. ।
माझ्या यथार्थ दृष्टीनें, 'मी त्यांत,' म्हणतां नये. ॥ २८
म्हणुनि कृष्ण बोलेल कीं, 'भूतें हि विचारितां ।
मजमध्यें नसति, हीं, मी तयांत न वास्तव.' ॥ २९
करूनियां असा बोध सांगेल तदुपासना ।
कीं, 'हीं जसीं मजमधें, पाहें तूं आपणांतही. ॥ ३०
आतां तुझी जीवदृष्टी. जालें ज्ञान जरी तुज, ।
स्वरूपीं पाहसी[१] विश्व दृष्टीं तारांगणें जसीं. ॥ ३१
जाईल जिकडे दृष्टी, दिसती तिकडेचि तीं. ।
प्रमाणें थोर नक्षत्रें, अल्पें दूरूनि दीसती. ॥ ३२
तसें तूं आपणामध्यें ध्यातां सर्व चराचर ।
यथास्थित समग्रत्वें न देखसिल जेधवां. ॥ ३३
गुरूक्त हा अनुभव नव्हे म्हणुनि तेधवां ।
मानिसी झणि या भावें श्लोक बोलेल हा हरी. ॥ ३४
अर्थ हा कीं नभीं वायु द्विधाव्यापक, चंचळ, ।
ये चंचळ प्रतीतीस, न प्रतीतीस ये दुजा[२]. ॥ ३५
पवनीं न तरी भेद, न अन्यत्र नभींहुनी. ।
ध्यानीं स्मरे, न स्मरेही, तरी तुजमधें जग. ॥ ३६
नाडा[३] पसरला थोर, दिसे सर्प तदाश्रयें. ।
परि जों दृष्टि तों सर्प, पाहें ब्रह्मीं असें जग. ॥ ३७
न पावतां दृष्टि नाडा उरला, सर्प ते स्थळीं ।
न भासे. आणि कां भासे तरी नाड्यांत त्यांतचि. ॥ ३८
याळागिं ये अनुभवा, न येही, वायु तो नभीं. ।
तैसीं मजमधें भूतें म्हणोनी अवधारिं तूं. ॥ ३९
भूतें मजमधें, भूतीं मी नसें, मजमाजिही ।
हीं भूतें नसती, ऐसें या अध्यायीं निरूपिलें. ॥ ४०
हें बोलोनि 'यथाकाशे वायुः सर्वत्रगो महान्' ।
हा श्लोक कृष्ण बोलेल कीं असी तदुपासना. ॥ ४१

१. 'पाहतां' असाही पाठ आहे. २. व्यापक वायु. ३. दोरी.

कोणी पूर्वोक्तदृष्टांतीं श्लोक वाखाणिती, परी ।
दृष्टांतीं श्लोक योजेना, पहावें सज्जनीं बरें. ॥ ४२
भूतें मजमधें, त्यांत मी नाहीं, मजही मधें ।
न भूतें, साम्य हें कैसें गगनीं पवनीं घडे? ॥ ४३
न दृष्टांतीं सर्वसाम्य. एकदेशी म्हणोनियां ।
घ्यावा, तथापि नं घडे दृष्टांतासि विरुद्ध जो. ॥ ४४
भूतें मजमधें, भूतीं मी, असें म्हणतां जरी ।
दृष्टांत एकदेशीही येस्थळीं साजता तरी. ॥ ४५
आकाशीं वायु, परि त्या वाय्यांत, न असे नभ. ।
न तो वायुहि आकाशीं हें घडे तरि तें घडे. ॥ ४६
भूतांस वायुदृष्टांत, नभदृष्टांत आपणा ।
बोलतां, तरि दृष्टांत साजता एकदेशिही. ॥ ४७
भूतें त्यांत, न तो भूतीं, तीं भूतेंही न त्यामध्यें, ।
ये अर्थीं येथ दृष्टांत न साधे यांत एकही. ॥ ४८
भूतें मजमधें, भूतीं मी नसें, यासही न ये. ।
न भूतेंही मजमधें, नये दृष्टांत येथही. ॥ ४९
सिंहदृष्टांत शूरासी एकदेशीहि साजतो. ।
ग्रामसिंहासही धाके, तो 'सिंह' म्हणवे कसा? ॥ ५०
आतां अर्थच्चि लागेना तिहीं भळतसी गती ।
कल्पावी मुख्य हा अर्थ साधतां गौण कां परी? ॥ ५१
गीताकार स्वयें जाला टीकाकार म्हणोनियां ।
मुख्यार्थ हे सांपडती तत्कृपा फलरूप जे. ॥ ५२
स्थळस्थळीं आणिकही टीकाकारांतरांचिया ।
बोलण्यांत विरुद्धार्थ येणें रीतीच पाहतां. ॥ ५३
भूतें मजमधें, भूतीं मी नसें, मजमाजि तीं ।
भूतेंही नसती, ऐसें येथें बोलेल माधव. ॥ ५४
तेथें विविध दृष्टांत टीकाकार निरूपिती, ।
परंतु एक दृष्टांतें तिन्ही गोष्टी न साधती. ॥ ५५
भूतें मजमधें सर्व, परि भूतांत मी नसें, ।
ज्या दृष्टांतें साधतें हें, पुढिल्यास विरुद्ध तो. ॥ ५६

१. 'भूतें मजमधें भूतीं मी नसें मजमाजि तीं' असाही पाठ आहे.

कीं 'भूतेंही मजमधें नसती' मागुतीं म्हणे, ।
दृष्टांतीं साधितां येथें साधेना सर्वथा तया. ॥ ५७
पाण्यापासूनिया फेंस, परि फेंसीं न तें जळ, ।
हें साधिलें परि पुढें न साधे बोल तीसरा; ॥ ५८
'न भूतेंही मजमधें', म्हणतां फेंसही जळीं ।
नसे ऐसें जयिं घडे, साधे हा अर्थ तेधवां. ॥ ५९
जळाबाहिर जो फेंस तो फेंस न असे जळीं, ।
ऐसेंही म्हणतां 'भूतें मजमाजि न' हें घडे. ॥ ६०
आरोप जो अधिष्ठानीं, अधिष्ठान न त्यामधें, ।
ज्याचा आरोप तेंही त्या अधिष्ठानामधें नसे. ॥ ६१
अधिष्ठाना विवर्ताच्या दृष्टांताविण आणखी ।
दृष्टांत घेति ये ठायीं, साधेना अर्थ त्यांस हा. ॥ ६२
तथापि ते संत थोर, मत्त हस्ती जया पथें ।
जाती, त्याच पथें जाती, थोर देखोनिया पथ. ॥ ६३
भगवद्भावपीयूष वाळवंटांत सांडलें. ।
हस्ती न लाधती तेंही मज मुंगीस लाधलें. ॥ ६४
नेत्रांसही दिसेना तें उपनेत्रांसि दीसतें. ।
तथापि नेत्रांवांचूनी उपनेत्र वृथाचि ते. ॥ ६५
तैसे जरी सूक्ष्मदृष्टी मज हे अर्थ साधले, ।
ते त्यांचीच कृपा ज्यांचा श्रीवत्सांकित अंकित. ॥ ६६
गुंजा रत्नासम चढे तीं रत्नें जोखितां तरी ।
त्यांचें मोल न ती पावे, मीही संतांत ये रिती. ॥ ६७
आतां हे बोलही बोले विश्वात्मा भगवान् स्वयें ।
स्वविद्याशक्तिचीं दावी अमानित्वादि भूषणें, ॥ ६८
वस्तुतां ग्रंथकर्ता तो स्वयें अर्जुनसारथी ।
ज्या मंदिरीं प्रकटला तें हें मंदिर शोभितो. ॥ ६९
राजविद्या, राजगुह्य, आतां सांगेल येथुनी; ।
तेथूनीयां समश्लोकीसंगती श्लोक हे पृथक्. ॥ ७०

१. 'जळाबाहेर जो फेंस नसे फेंसहि त्या जळीं' असा एक पाठ आहे. २. मूलाधारीं. ३. भ्रांती, भास. ४. अमृत. ५. श्रीवत्स नामक रत्नानें भूषित, श्रीकृष्ण. ६. नम्रता इ०. ७. 'लक्षणें' असाही पाठ आहे.

विषयप्रवेश.

हें तों गुह्याहुनी गुह्य सांगतों तुज सज्जना ! ।
विज्ञाना[1]सहित ज्ञान ज्या ज्ञानें मोक्ष पावसी. ॥ १
ह्या गुह्यांत हें रा[2]जा धर्म पावन उत्तम; ।
प्रत्यक्षीं ये अनुभवा नित्य जें सुखसाध्य जें. ॥ २
ज्ञानीं निघोनिही[3] श्रद्धा या धर्माची न ज्यां नरां, ।
मातें न पावतां मार्गीं निघाले जन्ममृत्युच्या. ॥ ३
हा विश्वसर्प म्यां दोरें व्यापिला स्वअमूर्तिनें[4]. ।
सर्वभूतें मजमधें, त्या सर्पीं दोर मी नसें. ॥ ४
तींही न मज रज्जूंत, पाहें हे युक्ति ऐश्वरी[5]. ।
भूतीं नसोनि धरितों[6], कीं माझी बुद्धि कल्पिते. ॥ ५
नभींच सर्वत्र वायु, काळें मोठा नभींच तो. ।
आत्मयांत तसें सर्व, मानी तूं स्मृत अस्मृत. ॥ ६
द्रष्टा[7] रज्जूच मी, माया माझी दृष्टि निजे ठायीं. ।
तींत लीन जगत्सर्प मी, कल्पादीस[8] जो सृजीं[9]. ॥ ७
पुनः पुन्हा विश्वसर्प मायादृष्टि अधिष्ठुनी[11] ।
निर्मितों[10] स्वात्मदोरी कीं भूतग्राम[12] तिला वश. ॥ ८
मातें सृष्ट्यादि कर्में तीं न बाधति धनंजया ! ।
कीं मी उदासीन जसा असें, कर्मीं न लंपट. ॥ ९
मी द्रष्टा, दृष्टिनें माझ्या वीते[13] माया चराचर. ।
या हेतुनें विश्वसर्प मज दोरींच होतसे[14]. ॥ १०
तो मी महा ईश, त्यातें हे मूढ अवमानिती ।
मनुष्यतनु देखोनी, मी परंज्योति[15] नेणती. ॥ ११
वृथा आशा, वृथा कर्में, वृथा ज्ञानें कुबुद्धिचीं. ।
राक्षसी आसुरी मूढा प्रकृती ज्या, तदाश्रित[16]. ॥ १२

---

१. विशेष ज्ञानासहित. २. राजाला. ३. निघोन. ४. अव्यक्त मूर्तीनें. ५. ईश्वरी योग. ६. भूतांमध्यें नसून भूतांचें धारण करितों. ७. पाहणारा. ८. कल्पांतीं. ९. कल्पाच्या आरंभीं. १०. उत्पन्न करितों. ११. व्यापून. १२. भूतसमुदाय. १३. प्रसवतें. १४. उत्पन्न होतो. १५. परमेश्वर. १६. त्यांच्या आश्रयानें राहतात.

महा सुबुद्धि ते, पार्था! दैवी प्रकृतीनें मला ।
अद्वैतें भजती, आधीं अंतीं जाणोनि एक मी. ॥ १३
मत्कीर्तनीं नित्य रत प्रयत्नीं जे दृढव्रत, ।
वंदिती आत्मभक्तीनें स्वरूपीं नित्ययुक्त जे. ॥ १४
वृत्तिहोमेंचि, ऐक्येंची, कीं ध्याती विश्वतोमुख, ।
पृथक्त्वें ऐक्यजिज्ञासु बहुधा देव याजक. ॥ १५
विश्वतोमुख ऐसा कीं, क्रतु, यज्ञ, पितृव्रतें, ।
मीचि. मी द्रव्य, मंत्राज्य, अग्नि मी, हुत होम मी. ॥ १६
बाप मी, माय मी, आजा, जगाचा धरणार मी; ।
ज्ञेय मी, शुद्ध ॐकार, ऋग्यजुर्वेद साम मी. ॥ १७
गति, पालक मी, साक्षी, वासस्थान, सखा, प्रभू, ।
मी सृष्टिस्थितिसंहारनिधी मी, बीज, नित्य मी. ॥ १८
तपतों, वर्षतों वृष्टी, ओढितों मीचि, सोडितों. ।
मोक्ष मी, मृत्यु मी, मीचि जडचैतन्य, अर्जुना! ॥ १९
इंद्रादि रूपें बहुधा यजूनी, [3]मातेंचि वेदीं तिन्हिं सोमपानी ।
पवित्र ते प्रार्थुनि इंद्रलोकीं, निमग्न होती सुरभोगपंकीं.[5] ॥ २०
ते भोगुनी स्वर्गसुखासि अंतीं, या मृत्युलोका परतोनि येती. ।
[6]प्रपन्न जे ये रिति वेदधर्मी, [7]गतागती पावति [8]कामकामी. ॥ २१
[9]अन्य टाकूनि मातेंची चिंतिती भजती जन ।
जे नित्ययुक्त, त्यांचा तो मी योगक्षेम[10] वाहतों. ॥ २२
अन्यभक्तहि जे देवां अन्यां भजति भक्तिनें, ।
माझीच पूजा परि ते [11]होते [12]अविधिपूर्वक. ॥ २३
मी स्वामि, भोक्ता त्यां सर्वां यज्ञाचा, [13]च्यवती तरी ।
कीं, मातें नेणती तत्त्वें, जो [14]ईशोपाधिबिंब मी. ॥ २४
देवांस देवताभक्त, पितरांस पितृव्रत, ।
भूतें यजिति ते भूतां, मातें मद्भक्त पावती. ॥ २५

---

१. अंतःकरणवृत्तीचा होम करून. २. सर्वत्र मुखें ज्याला, त्यातें. ३. 'मातेंचिही वेदिति सोमपानी' असा एक पाठ आहे. ४. तीन्ही वेदीं. ५. चिखलामध्यें. ६. मग्न. ७. येरझारा. ८. फलेच्छेनें कर्मे करणारे. ९. अन्य देवतांना. १०. असलेलें राखणें, आणि अवश्य पाहिजे असलेलें देणें. ११. ती माझीच पूजा होते. १२. अशास्त्र. १३. पतन पावतात. १४. ईश, आणि उपाधीपासून मुक्तबिंब.

पत्रें, पुष्पें, फळें, पाणी, जो जें अर्पील भक्तिनें, ।
तें भक्षितों, जें निष्कामें भक्तिनें मज अर्पिलें. ॥ २६
करिसी जें, भक्षिसी जें, जें देसी, होमिसील जें, ।
तपही करिसी, पार्था! जें, तें करीं मदर्पण. ॥ २७
फळां बऱ्यां वाइटांही पासूनि सुटसी असा, ।
या संन्यासें युक्तचित्त मुक्त तूं मज पावसी. ॥ २८
सम मी सकळां भूतीं, न द्वेषी मज, न प्रिय ।
परि जे भजती प्रेमें, मी त्यांत, मजमाजि ते. ॥ २९
जरी असे दुराचारी, भजे मज, न आणिकां, ।
तो तों साधूचि मानावा, कीं ज्याचा दिव्य निश्चय. ॥ ३०
तो होतो शीघ्र धर्मात्मा, पावतो शांति शाश्वती. ।
पार्था! मद्भक्त नासेना, हे जगीं पैज घालिं तूं. ॥ ३१
चांडाळादिक जातीनें पापी, तेहि महा गती ।
पावती; भजतां मातें स्त्रिया, वैश्यहि, शूद्रही. ॥ ३२
पुण्यब्राह्मण, राजर्षी, यांचें नवल कायसें? ।
या दुःखा-मृत्युलोकीं तूं पावसी भजतां मज. ॥ ३३
मद्रूपीं मन, मद्भक्त, माझें यजन वंदन, ।
मदाश्रित, असें चित्त योजितां मज पावसी. ॥ ३४

### उपसंहार.

इति टीका समश्लोकी अध्याया नवमावरी. ।
श्रीपार्थसारथी कर्ता जो वामनमनोरथी. ॥ १
नवमाध्यायीं नवविध भक्ती, अनुभवणें या नवनव युक्ती, ।
विज्ञानासह ज्ञानहि येथें, सेवा नव नवरस हो! स्वार्थें. ॥ २

---

## अध्याय दहावा.

### उपोद्घात.

विभूती सप्तमाध्यायीं बोलिला दशमांत या ।
त्याचा बोलेल विस्तार करितां प्रश्न अर्जुन. ॥ १
आरंभीं निज भक्तीचा अन्य भक्तीपरीस जो ।

---

१. स्वीकारितों. २. 'राजर्षी भज गा! मज' असा एक पाठ आहे.

उत्कर्ष पूर्वअध्यायीं बोलिला, तोचि वर्णितो. ॥ २

विषयप्रवेश.

पुन्हां आइक हा माझा बोल उत्तम, जो तुझ्या ।
हितार्थ बोलतों, कीं ज्या श्रवणें प्रीति पावसी. ॥ १
महर्षी देवही माझ्या प्रादुर्भावास नेणती. ।
कीं मी महर्षी देवांचा सर्वांचा आदिकारण. ॥ २
जाणे अजा अनादित्वें मुख्या सर्वेश्वरा मला, ।
सुज्ञ तोचि मनुष्यांत बंधापासूनि सूटतो. ॥ ३
बुद्धि ज्ञान क्षमा सत्य शांति इंद्रियनिग्रह ।
मोह नाश सुखें दुःखें जन्म मृत्यु भयाभय, ॥ ४
तप दान दया साम्य तृप्ति कीर्ति अकीर्तिही ।
होती मजचि पासूनी भूतांचे भाव हे पृथक्. ॥ ५
सप्तऋषी मनू, चौघे सनकादिक मानस, ।
पूर्वी मद्भक्त हे जाले, लोकीं या ज्यांचिया प्रजा. ॥ ६
जो ही विभूति हा योग माझा जाणेल तत्त्वता ।
तो मातें अचळें योगें योजे, येथें न संशय. ॥ ७
मी उद्भव समस्तांचा, मजपासूनि सर्वही, ।
ऐसें जाणूनि भजती अभिज्ञ मज भक्तिनें. ॥ ८
माझ्याठायीं प्राणचित्त बोधिती जे परस्परें ।
वर्णिती सर्वदा मातें संतोषें गाति नाचती, ॥ ९
तयां ऐशां सदायुक्तां भजतां प्रीतिपूर्वक ।
देतों तो मी बुद्धियोग ज्याणें ते मज पावती. ॥ १०
ज्ञानदीपें कृपेनें मी त्यांचेंचि तैम नाशितों ।
अज्ञानें जे जडभ्रांती ज्ञानार्कें तीस नाशितों. ॥ ११
परब्रह्म अधिष्ठान तूं, जें अत्यंत पावन ।
आत्मा शाश्वत जो दिव्य आदिदेव अज प्रभु. ॥ १२
येरिती म्हणती तूतें ऋषि देवर्षि नारद. ।
देवल व्यास असित स्वयेंही सांगसी मज. ॥ १३
हें सर्व सत्य वाटे, जें केशवा! मज सांगसी, ।
भगवंता! तुझी व्यक्ती नेणती देव दानव. ॥ १४

---

१. प्रगटणें, अवतार. २. अज्ञान, अंधकार. ३. जन्मरहित.

प्रकाशें स्वस्वरूपा तूं जाणसी पुरुषोत्तमा! ।
भूतपाळक! भूतेशा! देवदेव! जगत्पते! ॥ १५
विभूती ज्या तुझ्या दिव्या, अशेषें सांग त्या मला. ।
हे लोक ज्या विभूतीनें व्यापूनि असतोसि तूं ॥ १६
योगेश्वरा! कसें तूतें जाणों मी चिंतितां सदा? ।
आहेसि चिंतना योग्य तूं रूपीं कोणकोणत्या? ॥ १७
विस्तारें आपुला योग, विभूतीहि जनार्दना! ।
मागुतीं सांग; मी तृप्त नव्हे या श्रवणामृतें. ॥ १८
हर्षें कृष्ण म्हणे, 'दिव्या विभूती आपुल्या तुतें ।
सांगेन, परि मुख्यत्वें, अंत ज्या विस्तरा नसे. ॥ १९
विभूती मुख्य मी आत्मा सर्वांच्या आशयीं स्फुरें, ।
जडाच्या आदिमध्यांता, घटाला मृत्तिका जसी. ॥ २०
विष्णु अदितिपुत्रांत, दृश्यां ज्योतींत सूर्य मी. ।
मरीचि नाम मरुतीं[1], नक्षत्रांमाजि चंद्र मी. ॥ २१
सर्वांवेदीं सामवेद, इंद्र देवांत मी असें. ।
इंद्रियांमाजि मन मी, भूतांमाजि प्रतीति[2] मी. ॥ २२
रुद्रांत शंकर असें, यक्षादिकीं कुबेर मी. ।
वसूंमध्यें पावक मी, शिखराद्रींत[3] मेरु मी. ॥ २३
पुरोहितांत जो मुख्य तो मी जाण बृहस्पति. ।
सेनांपतींत मी स्कंद, मी समुद्र सरोवरीं. ॥ २४
महर्षींत भृगु, वेदवाणींत प्रणवाक्षर[4], ।
जपयज्ञ सि यज्ञांत, अचलांत हिमाचल. ॥ २५
अश्वत्थ सर्व वृक्षांत, देवर्षींमाजि नारद, ।
गंधर्वीं मी चित्ररथ, सिद्धीं कपिल जो मुनी. ॥ २६
अश्वांत उच्चैःश्रवा मी जो जाला क्षीरसागरीं, ।
ऐरावत गजेंद्रांत, नरांत नरराज[5] मी. ॥ २८
आयुधांमाजि मी वज्र; गोधनीं कामधेनु मी. ।
संतानहेतु मी काम, मी सर्पांमाजि वासुकी. ॥ २८
जलजंतूंत[6] वरुण, नागजातींत शेष मी. ।
यम निग्रहकर्त्यांत, अर्यमा पितरांत मी. ॥ २९

१. मरुद्गणांमध्यें. २. चेतना. ३. पर्वतांमध्यें. ४. ॐकार. ५. राजा. ६. जलचरांत.

प्रऱ्हाद दैत्यांत असें, चालणारांत काळ मी. ।
श्वापदांमाजि मी सिंह, पक्ष्यांत विनतासुत. ॥ ३०
उडती त्यांत मी वायू, शस्त्रधर्यांत राम मी. ।
मत्स्यांमधें मकर मी, जान्हवी मी नद्यांमधें. ॥ ३१
आद्यंत तत्त्व सृष्टीचा तेव्हां मध्यहि मीच कीं, ।
अध्यात्मविद्या विद्यांत, तत्त्ववक्त्यांत तत्त्व मी. ॥ ३२
अकार मी अक्षरांत, समासीं द्वंद्व नाम मी. ।
मी स्वयें नित्य जो काळ, मी सर्वाधार सर्व मी. ॥ ३३
मृत्यु मी सर्व जो नाशी, जन्मती त्यांत जन्म मी, ।
नारींत कीर्ति, श्री, वाणी, स्मृति, प्रज्ञा, धृति, क्षमा, ॥ ३४
सामवेदीं बृहत्साम, छंदीं गायत्रि नाम मी. ।
मासांमधें मार्गशीर्ष, ऋतूंमाजि वसंत मी. ॥ ३५
द्यूत मी कपटांमाजि, तेजस्कांमाजि तेज मी, ।
जय निश्चय दोन्ही मी, सत्त्ववंतांत सत्त्व मी. ॥ ३६
वृष्णिवंशीं वासुदेव, पांडवांत धनंजय. ।
मुनीमध्यें हि मी व्यास, कवींत कवि शुक्र मी. ॥ ३७
दंड मी दंडकर्त्यांत, जिंकणारांत नीति मी. ।
परेचें मौन गुह्यांत, ज्ञान मी ज्ञानियांमधें. ॥ ३८
जें नित्य सर्वभूतांचें बीज, तें मीच अर्जुना! ।
न घडे कीं मजविणें कांहीं होय चराचर. ॥ ३९
माझ्या दिव्यां विभूतींला अंत नाहीं परंतपा! ।
हा तों त्रिभूतिविस्तार म्यां संक्षेपेंचि वर्णिला. ॥ ४०
आतां जो कां भाग्यवंत प्राणी, श्रीमंत, ऊर्जित; ।
तो तो तूं जाण कीं, माझ्या तेजांशाचाचि संभव. ॥ ४१
आतां या बहु वा ज्ञानें जाणसी किति अर्जुना!? ।
जें अधिष्ठूनि उरलों एकांशींही न हें जग. ॥ ४२

उपसंहार.

इति टीका समश्लोकी अध्याया दशमावरी. ।
श्रीपार्थसारथी कर्ता जो वामनमनोरथी. ॥ १

---

१. गरुड. २ यादवांत.

दशमाध्यायीं हरी विभूती, योगा सांगे सकळां भूतीं ।
त्यांतें जीं मुख्यत्वें नामें, अनुभवरसिकां निजसुखधामें. ॥ २

---

## अध्याय अकरावा.

### उपोद्घात.

बोलिला नवमाध्यायीं 'पश्य मे योगमैश्वरम्' ।
कीं पाहें मज ईशाची विश्वनिर्माणयुक्ति[1] हे. ॥ १
दोरीं सर्प तसें विश्व मद्रूपीं, परि दोर मी. ।
विश्व सर्पी नसे अंतीं, सर्प दोरांतही नसे. ॥ २
मातींत घट तो मिथ्या, घटीं माती न वास्तव. ।
मातीमध्यें न घटही, कीं तो वस्तु दुजी नसे. ॥ ३
मातींत मातीच असे, घट भासे नसोनियां. ।
तरी पार्था! करीं ऐसी विश्वात्मत्व उपासना. ॥ ४
आतां तूं जीव, तुजला जालें ज्ञान असें जरी, ।
यथास्थित समग्रत्वें नये अनुभवा जग. ॥ ५
निर्धर्म आत्मा माझाही तुझाही एक तो परी ।
उपाधि सर्वज्ञ माझा, अविद्यायुक्त तो तुझा. ॥ ६
माझ्या प्रसादें तूं ज्ञाता होसी, सर्वज्ञही परी. ।
जाणसी तत्त्वमात्रातें न प्रपंचविचित्रता. ॥ ७
मणि एक सुवर्णाचा कळतां, सर्व भूषणीं ।
सुवर्णतत्त्व कळलें, परि नेणसि कूसरी. ॥ ८
कसा कोण अलंकार, केवढा, काय कूसरी, ।
हें कळेना. तसें विश्व नये अनुभवा बरें. ॥ ९
तरी दृष्टी सुवर्णातें देतां, सर्वहि तें असे. ।
कांहीं दिसे, दिसेना जें, तेंही तेंचि न संशय. ॥ १०
या भावें गगनीं वायू द्विधा, त्यामाजि चंचळ ।
कळे, न ये अनुभवा स्थिर तोही नभींच कीं. ॥ ११
स्वरूपीं येरिती विश्वभावीं तूं म्हणऊनियां ।
बोलिला नवमाध्यायीं भगवान् अर्जुनाप्रती. ॥ १२

---

१. कौशल्य.

परंतु येथें तो न्याय वाटला अर्जुनास कीं ।
पाकक्रिया शिकवितो कल्पवृक्ष क्षुधातुरा. ॥ १३
हा दोष मागणाराचा, कल्पिलें कल्पवृक्ष दे. ।
तरि याचें न पाहों का विश्वरूप यथास्थित. ॥ १४
प्रार्थीन कल्पतरु हा जगद्गुरु असे जरी ।
कीं 'दाखवीं विश्वरूप,' तरी दावील निश्चित. ॥ १५
संकल्प नवमाध्यायीं अर्जुनाचे मनीं असा. ।
परि एकापुढें एक प्रसंगें शब्द चालिले. ॥ १६
आइकोनि विभूतीतें पूर्वाध्यायांत शेवटीं ।
'माझ्या न एका अंशींही विश्व हें,' बोलिला असें. ॥ १७
तरी हें येवढें विश्व जें अतर्क्य मनासही, ।
तें अनंतस्वरूपांत पाहों कोणे रिती असें? ॥ १८
प्रार्थना हे करूं पाहे, परंतु अधिकारही ।
पाहिजे, तरि तो जाला श्रवणें, हरिच्या मुखें. ॥ १९
'मीं मारणार, भीष्मादी मरणार, असा भ्रम ।
होता, सर्वहि तो गेला कृपेनें श्रीहरी! तुझ्या. ॥ २०
आतां तुझें विश्वरूप दाखवीं,' म्हणऊनियां ।
प्रार्थितो उत्तमश्लोका समश्लोकीं अतःपर. ॥ २१

विषयप्रवेश.

'अनुग्रहार्थ जें माझ्या; गुह्य अध्यात्म केवळ ।
तुवां बोलियलें, तेणें माझा हा मोह नाशला. ॥ १
सृष्टिसंहार भूतांचे विस्तारें तुजपासुनी ।
ऐकिलें पद्मपत्राक्षा! दिव्य माहात्म्य हें तुझें. ॥ २
बोलसी आपणातें हें, असेंच परमेश्वरा! ।
विश्वरूप तुझें पाहों इच्छितों पुरुषोत्तमा! ॥ ३
पाहावें म्यां, जरि असें समर्था! मानिसी, तरी ।
अव्यया! आपणातें तूं दावीं, योगेश्वरा! मज.' ॥ ४
पाहें माझीं शतशतें रूपें पार्था! सहस्रशा. ।
नानाप्रकारिचीं दिव्यें, जीं नानावर्ण आकृती. ॥ ५
पाहें देव, वसू, रुद्र, मरुत्, अश्विनिपुत्रही. ।
पाहें नाहीं देखिलीं तीं नवलें बहु भारता! ॥ ६

एकत्र ताझ्या या देहीं पाहें आजि चराचर ।
विश्व सर्व गुडाकेशा! जें पाहों अन्य इच्छिसी. ॥ ७
परि याच स्वदृष्टीनें पाहों न शकसी मज, ।
दिव्यदृष्टी तुतें देतों. पाहें ऐश्वर योग हा. ॥ ८
ऐसें बोलोनियां राया! महायोगेश जो हरी, ।
पार्थास दाविता जाला रूप, जें परमेश्वर. ॥ ९
नाना नेत्र, मुखें, ज्यांत, नाना अद्भुत दर्शनें ।
नाना आभरणें दिव्यें, नाना धरिलि आयुधें. ॥ १०
दिव्यपुष्पें, दिव्यवस्त्रें, दिव्यगंधें, विभूषितें ।
दिव्य सर्वाश्चर्यमय अनंत जगदात्मक. ॥ ११
नभीं सूर्यसहस्रांचें तेज एकसरां उठे, ।
महात्म्ययाच्या तेजाची तरी तें न करी सरी. ॥ १२
एकीं अनेकधा तेथें विश्व सर्व पृथक् पृथक् ।
शरीरीं देवदेवाच्या देखे पांडव तेधवां. ॥ १३
आश्चर्यें उठले कांटे देहीं; तो मग अर्जुन ।
वंदूनि मस्तकीं, देवा बोलियेला कृतांजळी. ॥ १४
देहीं तुझ्या मीं सुर देखताहें, समस्त भूतें सचराचरें हें. ।
पद्मासनी जो विधि[1] आणि शर्व[2], भुजंग, जे दिव्य मुनींद्र सर्व. ॥ १५
अनेक बाहू, मुख, नेत्र, पोटें, त्वद्रूप सर्वत्र अनंत मोठें. ।
न आदिमध्यांतहि तूज पाहें, विश्वेश्वरा! विश्वस्वरूप[3] तूं हें ॥ १६
करीं गदा चक्रहि, जो किरीटी, तेजोब्धि सर्वत्रहि दीप्ति मोठी. ।
सर्वत्र देखें तुज उग्ररूपा! दावाग्निसूर्यद्युति जो अमूपा. ॥ १७
तूं शुद्ध तें अक्षर[4] जें कळावें, आत्मा जगाचा निधि जो स्वभावें ।
तो वाटसी शाश्वत धर्मपाळ[6], जो नित्य तूं अव्यय सर्वकाळ. ॥ १८
आद्यंत ना मध्य, अनंतवीर्य[7], भुजा अनंता, तव नेत्र सूर्य, ।
शशी मनोनेत्र, मुखीं हुताश, पाहें तया जो त्रिजगत्प्रकाश. ॥ १९
दिशा दहा आणिक अंतरिक्षा, तूं एकला व्यापिसि अंबुजाक्षा! ।
देखोनि हें अद्भुत रूप उग्र, महाभया लोक भिती समग्र. ॥ २०

---

१. ब्रह्मा. २. शिव. ३. 'विश्वशरीर' असा एक पाठ आहे. ४. ब्रह्म. ५. अविनाशी, परब्रह्म. ६. धर्माचा रक्षक. ७. अनंतशक्ति.

प्रवेशती हे सुरवृंद देहीं. कृतांजळी वर्णिति, भीति तेही. ।
'हो स्वस्ति !' ऐसें ऋषि सिद्धमात्र, म्हणोनि तूतें स्तविती विचित्र. ॥ २१
आदित्य रुद्राष्टवसू तदादी, प्रसिद्ध आणीखहि देव वेदीं. ।
गंधर्व यक्षादिक वासुदेवा ! हे पाहती विस्मित तूज देवा ! ॥ २२
त्वद्रूप मोठें, बहुनेत्र तोंडें, भुजांघ्रि मांड्या उदरें उदंडें. ।
दंष्ट्रा कराळा बहु ज्यांत कांहीं, देखूनि म्यालें जग आणि मीही. ॥ २३
अत्युच्च तेजोमय वर्ण चित्र, प्रचंड ज्याचें मुख दीप्त नेत्र, ।
ऐशा तुतें देखुनि अंतरात्मा, दुःखी, न जाणे सुखधैर्यवर्त्मा. ॥ २४
दंष्ट्रा कराळा, विकराळ तोंडें, देखोनि कैाळाग्निसमें उदंडें, ।
नेणें दिशाही सुखही सुरेशा ! प्रसन्न तूं होय जगन्निवासा ! ॥ २५
हे सर्वही जे धृतराष्ट्रपुत्र, त्यांचे सहाय क्षितिपाळ मात्र ।
भीष्म स्वयें द्रोणहि कर्ण हाही, जे आमुचे वीर समस्त कांहीं, ॥ २६
मुखें तुझीं सत्वर त्यांत जाती, भयानकें जीं विकराळ जांतीं. ।
दांतांतही चर्वित वीरकाया, ज्यांचीं शिरें चाविसि देवराया ! ॥ २७
नदीजळें जेंवि बळें वहाती, वेगीं समुद्राभिमुखेंचि येती. ।
ज्वाळामुखीं या तुझिया अनेकीं, प्रवेशती वीरहि जे नृलोकीं. ॥ २८
कीं पेटल्या अग्निमधें पतंग येती मरायास करूनि वेग; ।
तैसे मराया निघताति लोक, वेगें तुझ्याही वदनीं अनेक. ॥ २९
या सर्वलोकां गिळितोसि जेव्हां, ज्वाळामुखीं चाटिसि त्यांस तेव्हां. ।
प्रभा तुझ्या तीव्र जगा समग्रा व्यापूनि देवा ! तपताति उग्रा. ॥ ३०
तूं कोण पां उग्रतनू, वदें हें, प्रसन्न होईं, तुज वंदिताहें. ।
जाणों तुतें इच्छितसें, प्रवृत्ति नेणें तुझी देववरादमूर्ती.' ॥ ३१
'जुनाट लोकांतक काळ मी तों, लोकांस या येथ हरूं पहातों. ।
न मारिशी तूं तरि नाशती हे, सेनेंत या जे नरवीर पाहें. ॥ ३२
म्हणूनि तूं घे यश ऊठ वेगीं, जिंकून हें राज्य समृद्ध भोगीं, ।
म्यां शांति केली पहिलीच यांची, निमित्तमात्रीं निघें सव्यसाची. ॥ ३३
द्रोणास भीष्मास जयद्रथास कर्णास आणीखहि वीर त्यांस ।
म्यां मारिलें, मार; तुझ्या अदृष्टीं आहे जयश्री, म्हणि होसि कष्टी.' ॥ ३४

---

१. हात जोडून. २. सुखाचा आणि धैर्याचा मार्ग माझा अंतरात्मा न जाणे. ३. काळाग्निसारिखीं. ४. वीरांचीं शरीरें. ५. मृत्युलोकाचे. ६. जयाचा क्षय करणारा. ७. निमित्तमात्र तूं होस.

ऐकोनि हे केशवशब्दधाटी, कृतांजली कांपतसे किरीटी ।
पुनः पुन्हा वंदुनि कृष्णजीतें, बोले, गळां सद्गद, भीतभीत. ॥ ३५
'यशें हृषीकेशा! तुझ्या स्थितींत, हें विश्व हर्षे अनुरागयुक्त. ।
दिशांप्रती राक्षस जाति धाकें, समस्तही वंदिति सिद्धलोकें. ॥ ३६
न वंदिती कां तुजला समर्था! जो थोर धात्यासहि आदिकर्ता, ।
अनंत जो विश्वपटांत तंतू, तूं सत् असत् अक्षर शुद्धही तूं. ॥ ३७
विश्वादि तूं, सर्व पुरीं पुराण तूं, भूमि या विश्वघटीं निधान. ।
ज्ञाताहि तूं ज्ञेयहि चित्स्वरूपा! हें व्यापिलें विश्व अनंतरूपा! ॥ ३८
तूं वायु अग्नींदु यमादि देव, पितामहाचाहि पिता त्वमेव. ।
नमो नमो तूज सहस्र वेळ, नमो नमो मागुतिं सर्वकाळ. ॥ ३९
मागें पुढें वंदन तूज पायीं, तूं सर्व, वंदू तुज सर्व ठायीं, ।
अनंतसामर्थ्य पराक्रमी तूं, सर्वां [11]पटीं जाणसि सर्व तंतू. ॥ ४०
जें बोलिलों मीं सलगी करूनी, रे यादवा! कृष्ण, सख्या, म्हणूनी ।
न जाणतां या महिमेसि देवा! चुकोनिया प्रीतिकरूनिया वा. ॥ ४१
शय्यासनीं, भोजनिं, चालतांही, हास्यार्थ केला अपमान कांहीं. ।
मागें पुढें हो मज देवराया! क्षमा करीं अच्युत [12]अप्रमेया! ॥ ४२
पिता जगाचा सचराचराचा, तूं पूज्य सर्वां गुरुवर्य साचा. ।
न तुल्य कोणी तुज, थोर देवा! कैंचा त्रिलोकीं अतुळप्रभावा. ॥ ४३
म्हणूनि वंदीं पसरूनि काया, प्रसन्न व्हावें मज देवराया. ।
क्षमा करीं जेंवि पिता सुताला, सखा सख्याला, प्रियही प्रियाला. ॥ ४४
अपूर्व हें देखुनि [13]हृष्ट जालों, परंतु चित्तीं बहु फार भ्यालों. ।
पूर्वी जसा, दाखविं देह तैसा, प्रसन्न होऊनि जगन्निवासा! ॥ ४५
करीं गदा चक्र, किरीट माथां, तें इच्छितों दर्शन कृष्णनाथा! ।
जें चौं भुजांचें तव रूप सोपें, तें दाविं हीं झांकुनि उग्र रूपें.' ॥ ४६
'हें अर्जुना! तूज कृपानुरागें, म्यां दाविलें रूप निजात्मयोगें, ।
अनंततेजोमय विश्वखाणी, जें देखिलें तूजविणें न कोणी. ॥ ४७

---

१. केशवाचें भाषण. २. गद्गद. ३. सप्रेम. ४. महादेवासही. ५. विश्व हेंच वस्त्र त्याचा तूं तंतु. ६. महा. ७. देही. ८. जाणायाची वस्तु. ९. आनंदरूपा. १०. महत्याचा. ११. पटांत जसा तंतु व्यापून आहे तसा तूं सर्व विश्वाला व्यापून आहेस. १२. अनंत; ज्याचा थांग लागत नाही असा. १३. हर्षयुक्त.

यागीं न वेदाध्ययनीं न दानीं, कर्मी न वा उग्रतपा करूनी, ।
न सर्वथा शक्य जगीं पहाया, मी आणिकां येरिति भक्तराया! ॥ ४८
न हो व्यथेनें मन मूढ तूझें, अत्युग्र हें देखुनि रूप माझें. ।
होऊनियां निर्भय मागुतीं हें, तूं तेंचि माझें निजरूप पाहें.' ॥ ४९
बोलोनियां येरिति वासुदेव, तें अर्जुना दाखवि रूप देव. ।
भ्याला बहू देखुनि जो प्रताप, आश्वासिला होउनि सौम्यरूप. ॥ ५०
'नररूप तुझें सौम्य हें देखोनि जनार्दना! ।
आतां असें बऱ्या वृत्तीं बुद्धिसीं स्मृति पावलों.' ॥ ५१
'हें रूप देखणें कष्ट माझें जें देखिलें तुवां, ।
या रूपाचें देव तेही सदा दर्शन इच्छिती. ॥ ५२
मी वेदीं न तपीं दानीं न पूजेहि करूनियां, ।
पाहाया शक्य, येरीती तुवां देखियलें जसें. ॥ ५३
तो मी आत्मैक्यभक्तीनें येरिती शक्य अर्जुना! ।
जाणायास पहायास प्रवेशायास तत्वता. ॥ ५४
मद्भक्ति निःसंग, ज्याला मी थोर, करि मत्क्रिया, ।
निर्वैर सर्वां भूतीं जो, तो पावे मज पांडवा!' ॥ ५५

उपसंहार.

इति टीका समश्लोकी अध्याया अकराविया. ।
श्रीपार्थसारथी कर्ता जो वामनमनोरथी. ॥ १
अध्याय एकादश विश्वरूपी, हा ईश्वरीयोग निजस्वरूपीं ।
दावीतसे ध्यान करा विशेषीं, अहर्निशीं कीटक भृंगि जैशी. ॥ २

---

## अध्याय बारावा.

उपोद्घात.

श्रीकृष्णें पूर्व अध्यायीं विश्वरूप धनंजया ।
दावूनि, बोलिला अंतीं तयाप्रति जगद्गुरू. ॥ १
कीं, 'मी नव्हें वेद तप दान पूजे करूनिही ।
पाहाया योग्य, ज्या रूपें मातें देखियलें तुवां. ॥ २

---

१. धैर्य दिलें. २. अनन्य भक्तीनें. ३. मजमध्यें मिळायास. ४. 'अयोग्य ऐश्वर्य' पाठ.

तो मी अनन्य भक्तीनें येरिती शक्य अर्जुना ! ।
जाणावया पहायाला प्रवेशायास[1] अंतरीं. ॥ ३
अनन्यभक्ति म्हणिजे भजनीं द्वैत तें नसे. ।
अन्यत्वें भजणें वेद पशुतुल्य निषेधिती. ॥ ४
अनन्यभक्ति अन्यत्व[2] उपास्योपासकांमधें ।
नसोनि जे करी भक्ती उपास्याची उपासक. ॥ ५
अनन्य देवताभक्ती, न अन्यविषयीं रती ।
ऐसें भजोनिही द्वैतें, भजतां भक्ति ते नव्हे. ॥ ६
कीं असी भक्ति देवाची किंनिमित्त करी जरी, ।
आत्मार्थ तरि देवाही परीस प्रीति आपुली. ॥ ७
स्वकल्याणार्थ नृपती सेविती श्रीपती तसा ।
विना प्रयोजन तरी न करी भक्ति कोणही. ॥ ८
एक तों भक्ति देवाची, दुसरी त्यापरीसही ।
स्वभक्ति, आतां हे भक्ति, अनन्या ते कसी वदा. ॥ ९
भक्तिचे दोष जे तीनी ते अन्यत्वींच आश्रित, ।
तिचेच तीनी गुण ते अनन्यत्वींच वर्तती. ॥ १०
निमित्तें, व्यवधानत्वें, व्यभिचारेंकरूनियां ।
सनिमित्ता, व्यवहिता, व्यभिचारिणि भक्ति ते. ॥ ११
निमित्तें भक्ति मुक्तीच्या, सनिमित्ताचि भक्ति ते. ।
व्यवधान क्षण जरी, तरी व्यवहिताचि ते. ॥ १२
कल्याण नव्हतां शीघ्र, क्षण एकहि नावडी ।
उपजे, ते व्यवहिता व्यवधानें क्षणाचिया. ॥ १३
रमे दों पुरुषीं नारी, ते जशी व्यभिचारिणी, ।
देवीं, स्वजीवीं, दों ठायीं भक्ति ही व्यभिचारिणी. ॥ १४
हे दोष अन्य भक्तींचे, आतां याचे विलक्षण ।
अनन्यभक्तिचे तीनी गुण ते आइका असे. ॥ १५
सर्व प्रियें ज्या निमित्तें, प्रिय जो निर्निमित्तचि, ।
तो स्वात्मा होय विश्वात्मा, [3]अनिमित्तात्मभक्ति ते. ॥ १६

---

१. भजमध्यें मिळायास. २. उपास्य ईश्वर आणि उपासक यांमध्यें अन्यत्व नसून. ३. निमित्तावांचून म्ह० निर्निमित्त ती आत्मभक्ति म्हणजे आपली भक्ति.

उपासकांचा जो आत्मा, तो उपास्यपणें स्फुरे, ।
तेव्हांच अव्यवहिता भक्ति, कीं न विटे कधीं. ॥ १७
ज्या आत्मार्थ उपास्याची करी भक्ति उपासक, ।
त्यासीं स्वऐक्य कळतां भक्ति अव्यभिचारिणी. ॥ १८
अनन्यभक्ति ते ऐसी या श्रीगीतेंत वर्णिली. ।
नेणोनि हा [1]रहस्यार्थ यथास्वमति बोलती. ॥ १९
भेदवाद्यांस अद्वैत बोलतां उडतें मत, ।
आणि त्यांला रहस्यार्थ न सूचतिहि येरिती. ॥ २०
मताभिमानी ज्ञानीही झाले, आश्चर्य थोर हें; ।
निर्गुणोपासनामात्रीं वाहाती अभिमान जे. ॥ २१
सगुणीं प्रीति मग कां, आत्मा कळलियावरी? ।
म्हणती यास्तव असा भक्तिमार्ग न वर्णिती. ॥ २२
निर्गुणात्मत्व कळणें ज्ञानें, तें ज्ञान बोलिजे. ।
त्या ज्ञानें सगुणीं प्रेम, अद्वैतीं भक्ति बोलिजे. ॥ २३
ज्ञानावांचूनि भक्तीचें रहस्य न कळे कधीं. ।
भक्तीवांचुनिया, कष्टें ज्ञानाची स्थिति बाणणें. ॥ २४
अधिष्ठानीं दिसे विश्व तें, साक्षी ईश आपण ।
कल्पोनि दावी, हें ज्ञान भक्तिचें तत्व बोलिलें. ॥ २५
भक्तां चतुर्विधांमध्यें जैशीं आर्तादि लक्षणें, ।
ज्ञानी लक्षण चौथ्याचें, भजनज्ञान वेगळें. ॥ २६
जो वासुदेवतंतूतें जाणे ज्ञानी [2]जगींपटीं ।
त्यातें पाहे भजन हें भक्ति यालागिं बोलिजे. ॥ २७
'बहूनां जन्मनामंते ज्ञानवान्मां प्रपद्यते ।
वासुदेवः सर्वमिति,' शेवटीं हेंचि बोलणें. ॥ २८
तो वासुदेव तो आत्मा, निर्निमित्तचि आवडे, ।
तेचि आवडि हे भक्ती, अज्ञानें न घडे कधीं. ॥ २९
नेणोनियां रहस्यातें, अज्ञत्वीं भक्ति वर्णिती. ।
निर्गुणोपासना मात्र ज्ञात्यासि म्हणती पुरे. ॥ ३०

---

१. गुरुत्वार्थ, गुह्यार्थ. २. जगपटांत वासुदेव हा तंतू असें जाणून त्याला तसें पाहणें याला भजन म्हणतात.

गीतेंत तों, भक्ति थोर अद्वैतज्ञानरूपिणी. ।
गीतार्थ जाणे तो एक वाखाणी भक्ति जे असी. ॥ ३१
श्रीकृष्णही हेंचि बोले अध्यायीं अठराविया; ।
गीतार्थवर्णनफळ ज्या श्लोकीं बोलिला स्वयें. ॥ ३२
'य इदं परमं गुह्यं मद्भक्तेष्वभिधास्यति ।
भक्तिं मयि परां कृत्वा मामेवैष्यत्यसंशयः' ॥ ३३
ऐसा अष्टादशाध्यायश्लोकश्लोकार्थ तो असा, ।
कीं, जो हें गुह्य परम सांगे पावेच तो मज. ॥ ३४
'कैसें या श्रोतयांमाजि सांगावें, कवणे रिती?' ।
वक्ता म्हणेल, तरि तें या श्लोकीं कृष्ण बोलतो, ॥ ३५
कीं माझे भक्त, त्यांमध्यें माझे ठायींच भक्ति जे[१], ।
करूनि थोर ते सांगे, तो पावे मज निश्चित. ॥ ३६
अर्थ आणीखही होतो कीं, हें सांगेल गुह्य जो, ।
पावेल माझे ठायीं तो, भक्ति थोर करूनियां. ॥ ३७
परंतु हा अर्थ येथें बोलतां, बाध लागतो; ।
कीं, सांगण्याचें फळ तों नव्हे जें त्यास पावणें. ॥ ३८
करी भक्तिहि तो त्यातें पावेलचि, न संशय. ।
तेव्हां भक्तांत गीतार्थकथनाचें नव्हे फळ. ॥ ३९
माझे ठायीं भक्ति, तीतें जो थोर करुनी वदे, ।
तो पावे मज, हा अर्थ मुख्य आणि अबाधित. ॥ ४०
तरी ज्ञानाविणें मुक्ति न घडे; भक्तिसाध्य ते ।
मागुतीं. भक्तिनें मुक्ती म्हणाल तरि आइका. ॥ ४१
मुक्ति श्रवणमात्रेंची परीक्षित् पावला, परी ।
श्रवणेंचि तथा लभ्य ज्ञान, वैराग्य, भक्तिही. ॥ ४२
तैसें गीतार्थकथन, भक्ति थोर करूनि, जो ।
सांगेल, तो ज्ञानहीन हें कदापि न बोलवे. ॥ ४३
रहस्यचि न जाणे जो आत्मैक्य तत्त्व भक्तिचें, ।
तो भक्ति थोर करुनी काय भक्तांत वर्णिल? ॥ ४४

---

१. जी भक्ति.

तस्मात् आत्मज्ञ होतां ज्ञानसिद्धी न पावला, ।
तो गीतार्थ असा वर्णी, स्थिति बाणे तयासही. ॥ ४५
'मातें पावे' म्हणे कृष्ण, तें त्याचें हेंचि पावणें ।
कीं, भक्तियोगें जे सिद्धी, तेंचि गीतार्थवर्णन. ॥ ४६
परीक्षित् 'श्रवणें सिद्धी' ही गीतार्थनिरूपणें. ।
तस्मात् गीतार्थ तो मुख्य कीं, जें मुख्यत्व भक्तिचें. ॥ ४७
द्वैतभक्ति नव्हे, ते तों त्रिदोषा भक्ति, यास्तव ।
लक्षणत्रय अद्वैतें युक्त ते भक्ति केवळ. ॥ ४८
हे भक्ति थोर करुनी, गीताटीकानिरूपण ।
मुख्य हें [1]चरमाध्यायीं श्लोकें या स्पष्ट साधिलें. ॥ ४९
कोणी निर्गुणमात्रींच ज्ञानमार्ग उपासता, ।
करूनि सगुणप्रीति, निषेधिति [2]तेतःपर. ॥ ५०
बहुक्लेशें तयां सिद्धी, आणि आत्मज्ञ होउनी ।
भजतां सगुणीं ऐक्यें, शीघ्र ते सिद्धि पावती. ॥ ५१
हेंचि या द्वादशाध्यायीं बोलेल भगवान् स्वयें ।
प्रश्नोत्तरीं अर्जुनाच्या. तरी तो अर्थ [3]मोडिती. ॥ ५२
कीं जयां कळला आत्मा तेही सगुण सेविती ।
हें सिद्ध होतें; म्हणुनि अर्थ हे मोडिती बळें. ॥ ५३
म्हणती हे ज्ञानहीन [4]सगुणोपासनापर. ।
तरी ज्ञानाहुनी थोर अज्ञ कैसे, वदे हरी. ॥ ५४
भक्त जे सप्तमाध्यायीं चतुर्विध निरूपिले, ।
ज्ञानी श्रेष्ठ चहूंमाजि तेथें हरिच बोलिला. ॥ ५५
येथें ज्ञान्याहुनी अज्ञ म्हणेल श्रेष्ठ जेधवां, ।
सर्वज्ञाची द्विधा वाणी परस्पर विरुद्ध कीं. ॥ ५६
यालागीं भक्त जे येथें युक्त आणीक संमत, ।
म्हणे श्रीकृष्ण ते ज्ञानी अज्ञानी, हें म्हणों नये. ॥ ५७
सगुणोपासक ज्ञानी ते युक्ततम संमत, ।
म्हणोनि मग सांगेल [5]निर्गुणोपासनापर ॥ ५८

---

१. शेवटल्या अध्यायांत. २. त्यानंतर. ३. विपरीत अर्थ करतात. ४. सगुणोपासक. ५. निर्गुणोपासक.

तेव्हां अयुक्त ते, आणी असंमतहि, भाव हा. ।
न बोलोनिहि, बोलेल कीं ते कष्टति यास्तव. ॥ ५९
निर्गुणोपासना मात्र करिती त्यास्त बोल हा ।
न सोसे, म्हणुनी येथें करिती [1]क्लिष्टकल्पना. ॥ ६०
म्हणती बोलिले जे हे निर्गुणोपासनापर, ।
ते तों देहाभिमानी जे आत्मज्ञांमाजि ते असे. ॥ ६१
श्लोकांत पांचव्या, 'दुःखं देहवद्भिरवाप्यते' ।
म्हणूनि बोलिला कृष्ण याचा हा भाव काढिती. ॥ ६२
परंतु अर्जुनप्रश्न असता ये रिती जरी, ।
तरी हा अर्थ घडता; अन्यथा कल्पना वृथा. ॥ ६३
आणि श्लोका चतुर्थात त्यांची जीं लक्षणें स्फुटें, ।
पाहतां साधनें त्यांचीं, न साहे गोष्टि हे तयां. ॥ ६४
जे इंद्रियांतें दमिती, सर्वत्र समबुद्धि जे, ।
ते कसे अभिमानी, जे सर्व भूतहितीं रत. ॥ ६५
श्लोकांत पांचव्या 'दुःखं देहवद्भिरवाप्यते' ।
म्हणूनि बोलिला, त्याचा अर्थ तेथें अशा रिती. ॥ ६६
कीं देहवंत ते देही, जीव चित्प्रतिबिंब जे ।
ते बिंबा निरुपाधित्वें, अव्यक्तत्वें, उपासिती. ॥ ६७
त्या देहवंतीं दुःखें हे अव्यक्तगति पाविजे. ।
येथें देहाभिमानी ते म्हणावे कां अहो बळें? ॥ ६८
यालागिं 'देहाभिमानी ज्ञानी' हें तों न बोलवे. ।
'सगुणीं प्रियही अज्ञ' बोलिला हें न बोलवे. ॥ ६९
कोणी म्हणति कीं, येथें अधिकार धनंजयां ।
देखोनि, बोलिला श्रेष्ठ सगुणोपासनापर. ॥ ७०
तरी त्याची काय भींड, कीं तयाकारणें मृषा ।
[2]ज्ञानियां होउनी अज्ञ श्रेष्ठत्वें येथ बोलिला? ॥ ७१
आतां म्हणाल कीं त्याला अधिकार नसोनिही ।
भजे ज्ञणी निर्गुणीं तो, या भावें बोलिला असें. ॥ ७२

---

१. ओढाताणीची कल्पना. २. ज्ञान्याहून.

तरि पायरिया नाना या अध्यायीं न बोलता ।
कीं ध्यानीं चित्त धारेना तरी अभ्यास तूं करीं. ॥ ७३
'अभ्यासही नव्हे जेव्हां, माझीं कर्मेचि आचर,' ।
इत्यादि क्रम जो बोले, तो अज्ञ 'श्रेष्ठ' कां म्हणे? ॥ ७४
'निर्गुणोपासना तूज न ठाके जरि अर्जुना ! ।
सगुणोपासनानिष्ठ होय,' हें कां न बोलवे ? ॥ ७५
'श्रेयो हि ज्ञानमभ्यासाज्ज्ञानाद्ध्यानं विशिष्यते' ।
याहि श्लोकीं एक एकापरीस श्रेष्ठ बोलिला. ॥ ७६
टाकूनियां स्वाधिकार, क्षणीं उंच पदाप्रती ।
जातां होईल हा कष्टी; ऐसा कां हो न शंकला ? ॥ ७७
आतां हे अर्जुनालागीं सगुणोपासना जरी ।
बोलिला म्हणतां, तोही आत्मज्ञानी, न अज्ञ तो. ॥ ७८
पूर्वाध्यायीं पहिलिया श्लोकीं अर्जुन बोलिला ।
कीं, 'माझा मोह या गुह्यें अध्यात्में सर्व नाशिला.' ॥ ७९
तस्मात् अर्जुनही ज्ञानी, ज्ञानी सगुणसेवक. ।
तें संमत श्रीहरिला; न अव्यक्तउपासक. ॥ ८०
सगुणप्रीति मग कां, चिदात्मा कळल्यावरी? ।
ज्ञानी स्वमुखचंद्रें हा त्वकलंक निरूपिती. ॥ ८१
वत्सापहरणीं 'ब्रह्मस्तुती' भागवतामधें, ।
तिची टीका त्रिचरणीं, तेथें हा पक्ष खंडिला. ॥ ८२
चरणीं पहिल्या कांहीं, कांहीं तिसरियांतही, ।
हा पक्ष वामनमुखें श्रीहरीनेंचि खंडिला. ॥ ८३
तैसेंचि वामनमुखें 'हरिनामसुधें'तही ।
देशभाषेंचि करुनी पक्ष हा दूषिला असे. ॥ ८४
तैसाच संस्कृत ग्रंथ 'श्रुतिसार' म्हणोनियां, ।
हा शुष्कद्वैतवादाचा पक्ष तेथेंहि दूषिला. ॥ ८५
आत्मत्व कळलें तेव्हां, गुरुभक्तिहि कां? असे ।
पुसतां ते कृतघ्नत्वपरिहारार्थ बोलती. ॥ ८६

१. 'आत्मज्ञचि' असा एक पाठ आहे. २. 'आत्माच कळला' असाही पाठ आहे.

तुम्ही ब्रह्म तुम्हांलाही कां कृतघ्नत्व पूसतां? ।
निमित्तें मागुती कांहीं गुरुभक्त्यर्थ दाविती. ॥ ८७
गुरुभक्तिनिमित्तें जे, त्या निमित्तेंचि ईश्वरा ।
सगुणाला न भजती, सर्व हें ज्ञान मानितां. ॥ ८८
गुरुची आणि देवाची करितां भक्ति जे गुरू ।
बोलिले अर्थ ते याला प्रकाशति म्हणे श्रुती. ॥ ८९
'यस्य देवे परा भक्तिर्यथा देवे तथा गुरौ ।
तस्यैते कथिता ह्यर्थाः प्रकाशंते महात्मनः' ॥ ९०
श्रुत्यर्थ कीं भक्ति ज्याची उत्कृष्ट परमेश्वरीं, ।
जसी देवीं तसी भक्ती गुरूचीहि करी जरी. ॥ ९१
त्याला जे बोलिले अर्थ गुरूनें शास्त्रसंमत, ।
प्रकाशती ते तयांतें तेव्हां जेव्हां असा भजे. ॥ ९२
ज्या देवासारिखी भक्ती गुरूची, श्रुति बोलते, ।
त्या देवाचीच हे भक्ती टाकिती उडवूनियां. ॥ ९३
तस्मात् गुरूची, देवाची, आत्मैक्यें भक्ति जो करी, ।
त्याला गुरूक्त आत्मत्वीं स्थिति बाणे, न अन्यथा. ॥ ९४
आत्मत्वश्रवणातें जे साक्षात्कारत्व मानिती ।
त्यांचीं हीं बोलणीं शास्त्रपांडित्याच्या बळें अशीं. ॥ ९५
गुरुसेवा कृतघ्नत्वपरिहारार्थ, जेधवां ।
न ज्ञानपरिपाकार्थ, स्वमुखें बोलती असें. ॥ ९६
ज्ञानाभिमान तो हाची, असें हें फोल बोलणें, ।
ज्ञानी निरभिमानीही कष्टती सगुणाविना. ॥ ९७
अर्जुनाच्या प्रश्नमिषें हेंचि बोलेल माधव, ।
अर्जुनें प्रश्न कां येथें केला? तो हेतु आइका. ॥ ९८
श्लोकद्वयें वासुदेवें पूर्वाध्यायांत शेवटीं ।
वर्णिला भक्त आत्मज्ञ, तेथें अर्जुन शंकला. ॥ ९९
हे बरे, कीं भजति जे निर्गुणातेंचि ते बरे? ।
करूं हा प्रश्न सर्वज्ञाप्रति, हें धरिलें मनीं. ॥ १००
करील प्रश्न या भावें श्रीकृष्णाप्रति अर्जुन ।
तेथूनियां समश्लोकीसंगतीश्लोक हे पृथक्. ॥ १०१

विषयप्रवेश.

ऐसे तत्त्वी सदा युक्त भक्त जे भजती तुतें, ।
कोणी निर्गुणमात्रातें त्यांत उत्तम कोणते? ॥ १
मन घालूनि मद्रूपीं स्वरूपीं नित्य योजिले, ।
भजती आत्मभक्तीनें ते थोर मज संमत. ॥ २
क्षरेना, बोलवेना, त्या अव्यक्ता चि उपासिती ।
अचिंत्य, सर्वत्र लिप्त न, जें अढळ शाश्वत; ॥ ३
आटोपुनी इंद्रियांतें सर्वत्र समबुद्धि जे, ।
मातेंचि पावती तेही सर्वभूतहितीं रत. ॥ ४
कष्टी अधिक ते होती अव्यक्तीं चित्त योजितां, ।
अव्यक्तगति ते देही दुःखें पावति वास्तव. ॥ ५
मातेंचि मानुनी थोर, कर्में सर्व समर्पिती; ।
तरी अद्वैतयोगेंची मातें ध्याती, उपासिती. ॥ ६
ऐसीं चित्तें मजमध्यें त्यांचा मी भवसागरीं, ।
पार्था! न लावितां वेळ होतो केवळतारक. ॥ ७
यालागीं मन मद्रूपीं, स्वरूपीं, बुद्धि घालिं तूं; ।
मजमाजीच मग तूं प्रवेशसि न संशय. ॥ ८
आतां चित्त स्थिर करूं शकेनासि मदंतरीं, ।
अभ्यासें प्राप्तिची माझ्या इच्छा करिं धनंजया! ॥ ९
अभ्यासही न करवे, करीं कर्म मदर्पण. ।
मत्कर्में करितां ज्ञानी, तूं त्या स्थितिस पावसी. ॥ १०
हेंही नव्हे तरि, मन जिंकीं, होई मदाश्रित. ।
सर्व कर्मफळें टाकीं, फळशब्दें सुखस्पृहा. ॥ ११
अभ्यासाहूनि विश्वात्मज्ञान, तें ध्यान त्याहुनी, ।
श्रेय कर्मफळत्याग मग, मुक्ति जितां मग. ॥ १२
न करी सर्व भूतांचा द्वेष, मैत्र, दयाळु जो, ।
मी, माझें न जया, दुःखसुखतुल्य क्षमा जया, ॥ १३

---

१. ईश्वरस्वरूपांत २. मिळाले. ३. नाश पावत नाहीं. ४. सर्व प्राण्यांच्या हितामध्यें. ५. अव्यक्तास भजणारे. ६. 'घालुनी' असाही पाठ आहे. ७. मिळशील. ८. सुखाची इच्छा.

संतृप्त सर्वदा योगी, स्थिरचित्त, दृढव्रत, ।
मजमाजि मनोबुद्धि, असा मद्भक्त मत्प्रिय. ॥ १४
न ज्यास्तव भिती लोक, लोकांपासूनि जो न भी, ।
हर्ष क्रोध त्रास चिंता नसे, तोही मज प्रिय. ॥ १५
निस्पृही, शुद्ध, जो दक्ष, उदासी, न मनीं व्यथा. ।
आरंभ सर्वही टाकी, आणि मद्भक्त, तो प्रिय. ॥ १६
न हर्षे, न करी द्वेष, वांछा शोक न जो करी, ।
टाकी शुभाशुभें, आणी भक्त, मत्प्रिय तो नर. ॥ १७
शत्रुमित्रीं सम, तसा सन्मानीं अपमानिंही, ।
शीतीं, उष्णीं, सुखी, दुःखीं, सम धीर, असंग जो. ॥ १८
मानी निंदा स्तुती तुल्य, तुष्ट लाभें जशा तशा, ।
निराश्रय स्थिरमती आणी मद्भक्त, तो प्रिय. ॥ १९
बोलिल्याचपरी जें हें धर्म्यामृत उपासिती, ।
श्रद्धाळु, थोर मी ज्यांला, भक्त ते बहु मत्प्रिय. ॥ २०

उपसंहार.

इति टीका समश्लोकी अध्याया द्वादशावरी, ।
श्रीपार्थसारथी कर्ता जो वामनमनोरथी ॥ १
अध्याय हा द्वादश, भक्तियोग, सप्रेम जे वाचिति स्वात्मयोग, ।
जे प्रीति ते भक्ति असें जयाला, कळे तया तारक देव जाला. ॥ २

---

## अध्याय तेरावा.

उपोद्घात.

पूर्वाध्यायीं वासुदेवें सगुणोपासनापर ।
वर्णिलें, कीं अनन्येंची योगें ते भजती मज ॥ १
संसारसागरीं त्यांचा होतों उद्धारणार मी. ।
अति सत्वर कीं माझा त्यांस विश्वास ये रिती. ॥ २
अव्यक्तोपासकां माझा नसे विश्वास; यास्तव ।
ते कष्टती, भाव ऐला कीं, वैषम्य न ईश्वरीं. ॥ ३

---

१. निष्पक्षपाती. २. 'असो' पा०. ३. सगुणोपासक. ४. 'नसे वैषम्य ईश्वरीं' असा पाठ आहे.

कल्पवृक्षास जो जैसें मागे, तैसेंचि तो तया ।
फळ दे, त्यांत वैषम्य नसे, ये रिति ईश्वरीं ॥ ४
अनन्ययोगेंचि तरी जो मी सगुण त्या मला ।
भज तूंही, म्हणउनी या भावें हरि बोलिला. ॥ ५
कीं मद्रूपीं मन धरीं, मन संकल्परूप तें. ।
रूपें चरित्रें हीं माझीं मनेंकरुनि आठवीं. ॥ ६
आणि माझ्या स्वरूपीं तूं निज बुद्धि प्रवेशवीं. ।
बुद्धिशब्दें चित्त घ्यावें, कीं स्वरूपींहि जें रिघे. ॥ ७
माझेच ठायीं मन तूं धरीं, बुद्धि प्रवेशलो. ।
या अर्थाचा भाव ऐसा कीं, भजें दोंपरी मज. ॥ ८
सगुणाचें भजन तूं करिसी; परि निर्गुणीं ।
न थारे चित्त तरि, तूं अभ्यास करिं निर्गुणीं. ॥ ९
अभ्यासही न करवे, तरी निष्काम कर्म तूं ।
मदर्पण करीं; तेंही न ठाके तूज जेधवां. ॥ १०
सर्वकर्मफलत्याग करीं तूं चित्तनिग्रहें. ।
म्हणिजे टाकिं तूं कर्मै, आणी कर्मफळासही. ॥ ११
भाव कीं, सर्वही धर्म टाकूनि, सुखनिस्पृह ।
होऊनियां, भज मज जगदात्मत्वदृष्टिनें. ॥ १२
कर्मसाध्यें सुखें, तींची कर्माचीं बोलिजे फळें. ।
तस्मात् कर्मफलत्यागें वासनात्याग सूचिला. ॥ १३
स्वर्गादिक फलत्याग म्हणावा तरि, कर्मची ।
न करी, त्यास तें कैंचें फळ कीं, त्याग हा करी. ॥ १४
कर्मे करूनि, कर्माचा फलत्यागोपदेश हा ।
म्हणावा तरि, हा अर्थ पूर्वश्लोकींच बोलिला. ॥ १५
कीं अभ्यास नव्हे, तेव्हां मत्कर्मपर होइं तूं. ।
मत्कर्म म्हणिजे जें कां निष्कामत्वें मैदर्पित. ॥ १६
या श्लोकीं बोलतो कीं, तें न ठाके जरि, अर्जुना! ।
सर्वकर्मफलत्याग करीं, होऊनि आश्रित. ॥ १७

१. जग हें ईश्वर आहे अशा बुद्धीनें. २. सूचविला. ३. मला अर्पण केलेलें.

यालागिं त्याग कर्माचा येथें बोले निही पुन्हा, ।
फळाचा त्याग बोलोनी वासनात्याग सूचिला. ॥ १८
कर्मेंचि टाकीं म्हणतां, फलत्याग नदेल कां? ।
तस्मात् फलत्यागशब्दें वासनात्याग सूचिला. ॥ १९
'सर्वधर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज', ।
बोलेल ऐसें अंतींही अध्यायीं अठराविया. ॥ २०
येथें त्यागीं फलत्यागें, वासनात्याग सूचिला. ।
कीं जों हा वासनाबद्ध[1], तोंवरी विधिकिंकर. ॥ २१
नित्यकर्म नये टाकूं, जों बाह्य सुखवासना. ।
कर्मत्याग, फळत्याग, दोनी यास्तव बोलिला. ॥ २२
फलशब्दें जरि सुख, सुखत्यागचि बोलिला ।
म्हणावें, तरि टांकावे सर्वभोग सुखप्रद[2]. ॥ २३
तेव्हां प्रारब्धकर्माचा क्षय भोगाविणें नव्हे. ।
न बोलवे त्याग तोही वासनामात्र त्याग हा. ॥ २४
न प्रार्थितां जसीं दुःखें, सुखेंही प्राप्त ये रिती, ।
मानूनि, भोग इच्छीना वासनात्याग ये रिती. ॥ २५
तस्मात् कर्मफलत्याग म्हणिजे कर्म आणिखी ।
कर्माचें फळ जें बाह्य सुख, तद्वासना त्यजीं. ॥ २६
आतां मत्कर्म म्हणिजे, एकादश्यादिकें व्रतें. ।
तींही न टाकती तेव्हां, नित्यकर्मेंचि तूं करीं. ॥ २७
या भावें बोलिला कृष्ण कीं, तीं कर्में करूनियां ।
सर्वकर्मफलत्याग करीं, श्लोकार्थ हा जरी, ॥ २८
तेव्हां 'मत्कर्म' म्हणतां स्वधर्मत्याग बोलिला. ।
तदभावीं पुन्हां त्याला, स्वकर्म करुं सांगतो. ॥ २९
तरि तें काय कठिण, हें सोपें काय त्याहुनी ।
कीं तें न करवे, तेव्हां हें करूं सांगतो हरी? ॥ ३०
आणि मत्कर्म म्हणतां नित्याचा त्याग बोलिला ।
म्हणावें तरि, जीं नित्यें त्याचींच नव्हतीं कसीं? ॥ ३१
'ये मे मतमिदं नित्यमनुतिष्ठंति मानवाः' ।
ऐसें तृतीय अध्यायीं बोलिला श्रीहरीच हा. ॥ ३२

---

१. कर्मानें बद्ध. २. सुख देणारे.

विष्णुव्रतेंचि करणें । माझें मत, आणिखी ।
नित्यकर्म न तें माझें मत, हें तों न बोलिला. ॥ ३३
तेव्हां मत्कर्म म्हणिजे निष्कामें ईश्वरार्पितें. ।
त्यांमधें आटलीं सर्व कर्में विष्णुव्रतांसह. ॥ ३४
आतां जीं लौकिकें कर्में, तत्फलत्याग बोलिला ।
म्हणाल तरि, मत्कर्म म्हणतां सर्व त्यांत हें. ॥ ३५
'यज्ञार्थात्कर्मणोऽन्यत्र लोकोऽयं कर्मबंधनः' ।
ऐसा तृतीय अध्यायीं केला निर्णय माधवें. ॥ ३६
कीं यज्ञ मी विष्णु, माझें कर्म यज्ञार्थ कर्म तें; ।
त्यावेगळीं सर्वकर्में बंधकें म्हणऊनियां. ॥ ३७
तेव्हां मत्कर्मपरम होई तूं, म्हणऊनि जें ।
बोलिला, त्यांत हीं सर्व कर्में लौकीक आटलीं. ॥ ३८
मत्कर्म म्हणिजे कर्में मदर्पण करीं, असा ।
भाव कीं, तेंचि अर्पीना तरि मत्कर्म तें नव्हे. ॥ ३९
त्यांत हीं लौकिकें कर्में ठेवूनि वदला जरी, ।
कांहीं बद्धक ठेवूनी बोलिला न घडे असें. ॥ ४०
उगा तों त्याग न घडे, ईश्वरीं अर्पिल्याविणें. ।
विष भक्षूनि, मरण त्यागी, तरि मरेचि तो. ॥ ४१
वैद्याचिया करिं दिल्या बचनाग, करी रस, ।
ईश्वरीं अर्पिलीं कर्में होती मोक्षासि कारण. ॥ ४२
यालागीं 'मत्कर्मपर होइं तूं,' बोलिला हरी. ।
लौकिकें वैदिकें विष्णुव्रतें त्यांतचि आटलीं. ॥ ४३
आतां तींही न करवे मत्कर्में, तरि अर्जुना ।
सर्वकर्मफलत्याग करीं तूं, म्हणतो हरी. ॥ ४४
कीं कर्में सर्वही टाकीं, आणि कर्मफळें सुखें. ।
म्हणिजे कर्मसाध्याची सुखाची टाकि वासना. ॥ ४५
तरी कर्मांचिया त्यागें प्रत्यवायाख्य बंधनें ।
ज्यासि, तो वासनात्याग करीही तरि, तो वृथा. ॥ ४६
ऐसें म्हणाल तरि हें आत्मज्ञान नसे तयां. ।
अज्ञा जनाची वार्ता हे या प्रसंगांत आढळे. ॥ ४७

आत्मज्ञासहि जों कांहीं वासनाशेष, तोंवरी ।
कर्मत्यागें प्रत्यवाय वासनात्याग यास्तव. ॥ ४८
मागें तृतीय अध्यायीं कर्माचा त्याग निंदतां, ।
तेथें असंग जो ज्ञानी तो कर्मातीत बोलिला. ॥ ४९
'यस्त्वात्मरतिरेव स्यादात्मतृप्तश्च मानवः ।
आत्मन्येव च संतुष्टस्तस्य कार्यं न विद्यते.' ॥ ५०
आत्मस्वींच जया प्रीति, तृप्ति संतोष त्यांतची, ।
न अन्यत्र असा ज्ञानी, त्याला कर्तव्यता नसे. ॥ ५१
'सर्वधर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज' ।
म्हणूनि अंतीं गीतेच्या बोलिले श्रीहरी असें. ॥ ५२
तोही जो वासनात्यागी ज्ञानी त्यालाचि [2]तो विधी. ।
जोंवरी वासनायुक्त ज्ञानीही विधि[3]किंकर. ॥ ५३
'अहं त्वा सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः,' ।
या वाक्यें तो नव्हे ज्ञानी म्हणाल, तरि आइका. ॥ ५४
पापापासूनियां तूतें सोडवीन म्हणूनि जें ।
बोलिला, 'पाप'शब्दें त्या संचितक्षय सूचिला. ॥ ५५
पूर्वील नाशती पापें, पुढिलीं लिप्त होति ना, ।
ज्ञान जाल्यावरी, ऐसें ब्रह्मसूत्रीं असे स्फुट. ॥ ५६
पुण्यही पापही लोहशृंखला हेमशृंखला, ।
दोनीही बंधका, तस्मात् पुण्यही पाप, भाव हा. ॥ ५७
यालागिं अर्जुन ज्ञानी कर्मत्याग म्हणूनियां ।
शेवटीं त्यास बोलेल, येथही बोलतो तसा. ॥ ५८
म्हणाल, त्याग कर्माचा बोलिला तरि, अर्जुना! ।
युद्धीं कां मागुती कृष्णें योजिला, तरि आइका. ॥ ५९
'स्वभावजेन कौंतेय निबद्धः स्वेन कर्मणा,' ।
या श्लोकीं युद्धराज्यादि त्याचें प्रारब्ध सूचिलें. ॥ ६०
प्रारब्धकर्म जें, त्याचा क्षय भोगेंचि बोलिला. ।
यालागीं अर्जुनें युद्ध करूनि राज्य भोगिलें. ॥ ६१
आतां आत्मज्ञ हा जेव्हां यालाही पाइन्या अशा, ।

---

१. सर्वसंगपरित्याग केला आहे ज्या ज्ञान्यानें तो. २. तो विधि= वर सांगितलेली क्रिया. ३. कर्मबद्ध. ४. 'तदधिगमे उत्तरपूर्वाघयोरश्लेषविनाशौ' असें ब्रह्मवाक्य आहे.

उंच नीच वदे का ते! म्हणाल तरि आइका. ॥ ६२
आत्मत्व कळणें मात्र नव्हे स्थितिस कारण ।
तें देवगुरुसेवेनें पूर्वाध्यायीं निरूपिलें. ॥ ६३
आत्मैक्यभक्तिनें देवा भजे, आणिखि निर्गुणीं ।
मन योजी, असा योगी शीघ्र सिद्धीस पावतो. ॥ ६४
बोलिला तेंचि भगवान् कीं, 'भजें सगुणा मज, ।
आणि योगें अनन्येंचि निर्गुणत्वीं भजें मज. ॥ ६५
निर्गुणीं चित्त थारे ना, तरी अभ्यास तूं करीं. ।
नव्हे अभ्यास, तरि तूं कर्मयोगचि आचर. ॥ ६६
तेंही नव्हे, तरी त्यागीं कर्में, आणिक वासना. ।
परि आश्रित होत्साता कर्मांचा त्याग तूं करीं. ॥ ६७
भाव कीं, सत्यचैतन्य त्याचा धरुनि आश्रय, ।
टाकूनि वासना तेव्हां कर्मांचा त्याग तूं करीं. ॥ ६८
म्हणसी निर्गुणात्मत्वीं न थारे चित्त जेधवां, ।
होऊं कसा आश्रित मी, तोंवरी त्यागही वृथा. ॥ ६९
तरि मी नवमाध्यायीं बोलिलों तुजलागिं कीं, ।
'प्रत्यक्षावगमं धर्म्यं सुसुखं कर्तुमव्ययम्.' ॥ ७०
कीं प्रत्यक्षीं अनुभवा ये, आणी सुखसाध्यही, ।
तें तूं विश्वात्मकध्यान[1] करीं माझें धनंजया! ॥ ७१
पटीं तंतु, घटीं माती, जडीं चैतन्य ये रिती. ।
तयास म्हणिजे ज्ञान, तें अभ्यासाहुनी बरें. ॥ ७२
समजोनी असें, त्याचें ध्यान तें त्याहुनी बरें. ।
तेव्हां हा त्याग कर्मांचा, म्हणूनी बोलिला हरी. ॥ ७३
'श्रेयो हि ज्ञानमभ्यासाज्ज्ञानाद्ध्यानं विशिष्यते ।
ध्यानात्कर्मफलत्यागस्त्यागाच्छांतिरनंतरम्.' ॥ ७४
अभ्यासाहुनि विश्वात्मज्ञान तें, ध्यान त्याहुनी, ।
श्रेय कर्मफलत्याग मग मुक्ति जितां मग. ॥ ७५
या श्लोकाची समश्लोकी टीका ही येच रीतिची ।
पूर्वाध्यायीं बोलियेली, परि भावार्थ ये रिती. ॥ ७६

---

१. विश्व हा परमेश्वर असें ध्यान.

कीं बोलिलों जो अभ्यास त्याहुनी ज्ञान हें बरें. ।
वृत्तिनिरोधनें कष्ट, त्याहुनी सुखसाध्य हें. ॥ ७७
ज्ञानशब्दें, [1]जड जग, सर्व चैतन्य जाणणें. ।
त्याचें ध्यान घडे तेव्हां कर्मत्यागासि योग्य तो. ॥ ७८
आत्मा समजणें हेंची, ज्ञान ऐसी प्रसिद्धि हे. ।
हा अर्थ तेथवां होता, कीं अभ्यास न बोलता. ॥ ७९
आत्मा आधीं समजला, तेव्हां अभ्यास मांडिला. ।
त्याहूनि आत्मा कळणें, श्रेय हें बोलणें नव्हे. ॥ ८०
ज्ञानशब्दें जड जग, तरि चैतन्य पाहणें. ।
हा अर्थ काशावरुनी म्हणाल, तरि आइका. ॥ ८१
मागें चतुर्थाध्यायांत बोलिला अर्जुनाप्रती, ।
'तद्विद्धि प्रणिपातेन' इत्यादि श्लोक दोनि हे. ॥ ८२
बोलिला पहिल्या श्लोकीं [2]गुरूपसदनक्रम, ।
कीं ते गुरू तुतें पार्था! हें ज्ञान उपदेशिती. ॥ ८३
तें ज्ञान कैसें म्हणसी, तरि मी सांगतों खुण; ।
कीं त्या ज्ञानें आपणांत भूतें निःशेष देखसी. ॥ ८४
ऐसें दुसरिया श्लोकीं बोलिला याचि कारणें. ।
ज्ञान तें कीं आत्मयांत जडां भूतांस पाहणें. ॥ ८५
अनादि परिभाषा हे कीं, जें निर्गुण केवळ ।
तेथें निरोध वृत्तीचा, योग त्यालागिं बोलिजे. ॥ ८६
जड चैतन्य एकत्वें, हेमालंकार ऐक्यवत् ।
ऐसें जें पाहणें, त्यास महर्षी 'ज्ञान' बोलती. ॥ ८७
[3]दों श्लोकीं योगवासिष्ठीं वसिष्ठहि असे रिती, ।
बोलिला 'ज्ञान'शब्दाचा अर्थ तेथेंहि ये रिती. ॥ ८८
प्रसिद्ध योगवासिष्ठीं हे दोनी श्लोक अर्थही ।
हरीच येथें बोलेल पहावा, सज्जनीं बरा. ॥ ८९
हे दोनी चित्तनाशाया योग, कीं ज्ञान राघवा! ।
निरोधवृत्तिचा योग, ज्ञान [4]सम्यङ्निरीक्षण. ॥ ९०

---

१. जडत्यागें. २. गुरूपाशीं जाणें. ३. 'द्वौ क्रमौ चित्तनाशाय योगो ज्ञानं च राघव । योगो वृत्तिनिरोधो हि ज्ञानं सम्यगवेक्षणम् ॥ १ ॥ असाध्यः कस्यचिद्योगो कस्यचित्तत्त्वनिश्चयः । प्रकारौ द्वौ तथा साक्षाज्जगदा परमः शिवः ॥ २ ॥ योगवासिष्ठ. ४ उत्तमप्रकारें पहाणें.

असाध्य योग कोणा जी, ज्ञान कोणासि दुर्घट. ।
म्हणूनि दोनि प्रकार बोलिला हे सदाशिव. ॥ ९१
अर्थ भावार्थही हाची, त्यांत सम्यग्निरीक्षण ।
म्हणिजे तंतुदृष्टीनें बरें अंबर पाहणें. ॥ ९२
दिसे घट, असे माती, असें सम्यग्निरीक्षण ।
दिसे विश्व, असे ब्रह्म, हे दृष्टी ज्ञानसंज्ञित. ॥ ९३
ये रिती रघुनाथासी वसिष्ठ गुरु बोलिला. ।
कृष्णही अर्जुनालागीं बोलतो येच रीतिनें. ॥ ९४
कीं वृत्तिच्या निरोधाचा जरि योग असाध्य हा, ।
अभ्यासापरिस ज्ञान, बरें सम्यग्निरीक्षण. ॥ ९५
धरुनि स्मृति मातीची जें घटादिक पाहणें, ।
चैतन्यस्मृतिनें विश्व पाहणें, सम्यगीक्षण. ॥ ९६
तंतुविस्मरणें वस्त्र झणीं मागुतिं पाहसी; ।
यालागिं हें ध्यान करीं; ध्यान ज्ञानाहुनी बरें. ॥ ९७
पटीं तंतू, तसा आत्मा ध्यायीं तूं सचराचरीं. ।
तेव्हां हा उचित त्याग कर्माचा म्हणऊनियां, ॥ ९८
'ध्यानात्कर्मफलत्याग' या भावार्थेंचि बोलिला. ।
या त्यागावरि जे शांती ते जीवन्मुक्त बोलिजे. ॥ ९९
या भावें बोलिला कृष्ण, 'त्यागाच्छांतिरनंतरम्' ।
कीं या ध्यानें अशा त्यागें जीवन्मुक्त सर्वेचि तो. ॥ १००
बोलिला गूढ भावें जें, हेंचि स्पष्ट त्रयोदशीं ।
बोलेल येथें भगवान् क्षेत्रक्षेत्रज्ञतत्त्वही. ॥ १०१
'क्षेत्रक्षेत्रज्ञयोर्ज्ञानं यत्तज्ज्ञानं मतं मम,' ।
या श्लोकीं स्पष्ट बोलेल तत्त्व जें जगदात्मक. ॥ १०२
क्षेत्र तों जड हा देह, क्षेत्रज्ञ क्षेत्र जाणता. ।
दोहींत जें ज्ञान, त्याचें ज्ञान तें मज संमत. ॥ १०३
ऐसें बोलेल यामाजी क्षेत्रज्ञीं ज्ञान दीसतें, ।
क्षेत्रीं जडीं ज्ञान कैंचें, म्हणूनि भ्रमती जन. ॥ १०४

---

१. वस्त्र हा तंतूच असें पहाणें.

अर्थ याचा न कळतां वाखाणिति ग्रथाद्यची, ।
परि तंतूवीण पट नसे, ऐसें न पाहती. ॥ १०५
घटीं माती दिसे, तैसें चैतन्य दिसतें जडीं. ।
हे कृपेची किली ज्यांला ठाउकी, तेचि जाणतीं. ॥ १०६
एवं या दुसऱ्या श्लोकीं, पूर्वाध्यायांत जें हरी ।
विश्वात्मता ज्ञानशब्दें बोलिला, तेंचि वर्णिल. ॥ १०७
पूर्वाध्यायीं निर्गुणीं जो योगाभ्यास, तयाहुनी ।
श्रेय विश्वात्मक ज्ञान, त्याहुनी ध्यान बोलिला. ॥ १०८
जरीहि आत्मा कळला, तरी विश्व तदात्मक ।
कळलेंचि, दुजें त्याचें कळणें ज्ञान तें कसें? ॥ १०९
झणीं ऐसी अर्जुनाला शंका होय, म्हणूनियां ।
एक ब्रह्म द्विधा ज्ञेय, या अध्यायीं निरूपिल. ॥ ११०
म्हणेल 'सांगतों ज्ञेय, ज्या ज्ञानें मुक्ति पावसी,' ।
ऐसें बाराविया श्लोकीं, बोलोनि ज्ञेय वर्णिल. ॥ १११
त्यांत बाराविया श्लोकीं उत्तरार्धें करूनियां ।
व्यतिरेकें तत्त्व शुद्ध सांगेल ज्ञान केवळ. ॥ ११२
'अनादिमत्परं ब्रह्म न सत्तन्नासदुच्यते', ।
या अर्थें करुनी तत्त्व व्यतिरेकेंचि वर्णिल. ॥ ११३
दावूनि वेगळी माती, मग सर्व घटांत ते ।
दाविजे, ये रिती ब्रह्म दावील सचराचरीं. ॥ ११४
'सर्वतः पाणिपादं तत्' इत्यादि मग अन्वयें ।
श्लोकीं त्रयोदशीं तत्त्व सांगेल जगदात्मक. ॥ ११५
तेराविचाच अध्यायीं श्लोका तेरावियामधें ।
बोलेल अन्वयें कृष्ण ज्ञेय, तें बहु दुर्लभ. ॥ ११६
ज्ञाताहि सप्तमाध्यायीं बोलियेला अलभ्य कीं, ।
'वासुदेवः सर्वमिति स महात्मा सुदुर्लभः.' ॥ ११७
जडाच्या व्यतिरेकें जें शुद्ध, तें बहु जाणती. ।
न तें सत् न असत् ऐसें ज्ञेय तें येथ वर्णिल. ॥ ११८

---

१. व्याख्यान करिती. २. किल्ली.

परंतु अन्वयें सर्व प.हणें ब्रह्म दुर्लभ ।
'सर्वत: पाणिपादं तत्' ऐसें जें येथ वर्णिल. ॥ ११९
कीं विवर्तपणें विश्व असे ब्रह्मीं म्हणूनियां ।
दृष्टांतें बोलती याचा तत्त्वानुभव नेणती. ॥ १२०
कीं रज्जु दृष्टीस दिसे आधीं, सर्प दिसे मग. ।
माती आधीं दिसे दृष्टी, दिसे तेव्हां मृषा घट. ॥ १२१
जे या अनुभवें सर्व वासुदेवचि पाहती, ।
ते भागवत, ते ज्ञानी, ते जीवन्मुक्त दुर्लभ. ॥ १२२
आधीं दृष्टी दिसे सोनें, पाहतां मग भूषण ।
तेंचि सोनें दिसे ऐसा विश्वद्रष्टा हरीच तो. ॥ १२३
दिसोनि हारपे विश्व ब्रह्मीं, हेमीं जसा नग. ।
ऐसा अनुभवी लोकीं दुर्लभाहूनि दुर्लभ. ॥ १२४
याची किल्ली गुरुमुखें कळली पाहिजे पृथक्. ।
ज्ञेय द्विविध[1] यालागीं या अध्यायीं निरूपिल. ॥ १२५
'श्रेयो हि ज्ञानमभ्यासात्' म्हणूनि वदला हरी ।
पूर्वाध्यायीं याच भावें, कीं हे ज्ञानकळा पृथक्. ॥ १२६
ज्ञान होऊनिही कोणी विश्वाधिष्ठानविस्मृती ।
करूनि पाहती विश्वतंतुविस्मरणें पट. ॥ १२७
यालागीं पूर्वअध्यायीं 'ज्ञानाद्ध्यानं विशिष्यते' ।
म्हणूनि बोलिला कृष्ण, कीं ध्यान श्रेय त्याहुनि. ॥ १२८
ध्यान तें हेंचि कीं पाहें वासुदेवीं चराचर. ।
चराचरीं वासुदेव, आत्मा आपण ये रिती. ॥ १२९
ऐसें ध्यान जया साधे, तो योगभ्रष्ट होइना. ।
मुक्ति त्याला येचि जन्मीं, यात्त्चि देहीं न संशय. ॥ १३०
आरंभीं नवमाध्यायीं संगतिश्लोक त्यामधें ।
प्रसंगें या प्रसंगातें श्रुतिस्मृत्युक्त वर्णिलें. ॥ १३१
तस्मात् विश्वात्मक ध्यान जीवन्मुक्तीस कारण. ।
परंतु आधीं विश्वात्मज्ञान होईल तेधवां. ॥ १३२
'श्रेयो हि ज्ञानमभ्यासात्' म्हणूनी बोलिला हरी ।
पूर्वाध्यायीं, 'द्विधा ज्ञेय' या अध्यायांत यास्तव. ॥ १३३

१. दोन प्रकारें जाणतां येतें.

आणीक स्पष्ट बोलेल पूर्वाध्यायोक्त ये स्थळीं, ।
कीं जे सौकर्य ते रीती करावें ध्यान वस्तुचें. ॥ १३४
पूर्वाध्यायीं बोलिला कीं 'मयि बुद्धिं निवेशय,' ।
'ध्यानेनात्मनि पश्यंति' ऐसें, तें येथ वर्णिल. ॥ १३५
मदर्थ कर्म केल्याही ज्ञानस्थितिस पावसी, ।
म्हणूनि बोलिला पूर्वी, तेंही येथें निरूपिल. ॥ १३६
येथें बोलेल हरि कीं, 'कर्मयोगेन चापरे' ।
म्हणिजे कर्मयोगेंही पाहती आत्मवस्तुतें. ॥ १३७
विश्वात्मध्यान जें पूर्वी ज्ञानोत्तर निरूपिलें ।
'अन्ये सांख्येन योगेन' म्हणोनि येथ वर्णिल. ॥ १३८
वेदोक्त सांख्य तें हें कीं तत्त्वसंख्या करूनियां ।
चैतन्य जड तत्त्वांत पाहे, तंतू पटीं जसा. ॥ १३९
नेणोनियां या प्रकारें अध्यायद्वयसंगती, ।
अर्जुनप्रश्न आरंभीं कोणी कल्पित वाचिती. ॥ १४०
सातां शतां वेगळा तो श्लोक, अध्याय तेथुनी. ।
'इदं शरीरं कौंतेय,' जेथूनि भगवान् वदे, ॥ १४१
तेथूनियां समश्लोकी टीका हे करितो हरी. ।
आतां मागील जे श्लोक, संगतिश्लोक हे पृथक्. ॥ १४२

### विषयप्रवेश.

देह हा क्षेत्र म्हणुनी कौंतेया! म्हणिजे तसें, ।
क्षेत्रज्ञ, जो यासि जाणे; तद्वेत्ते बोलती असें. ॥ १
क्षेत्रज्ञ सर्व क्षेत्रीं जो, तोही मी जाण भारता! ।
दोहींत जें ज्ञान त्याचें ज्ञान, तें मज संमत. ॥ २
तें क्षेत्र, जें, जसें, जाणे विकारी जें, जयास्तव; ।
क्षेत्रज्ञ जो, ज्या प्रभावें, संक्षेपें तेंहि आइक. ॥ ३
ऋषीश्वरीं बहुविधीं भेदीं करुनि वर्णिलें, ।
युक्तसिद्धांतवचनीं ब्रह्मसूत्रीं करूनियां. ॥ ४

---

१. सुलभपणानें.

[1]महाभूतें, अहंकार, बुद्धि, अव्यक्त आठवें. ।
[2]दशेंद्रियें, एक मन, [3]शब्दस्पर्शादिपंचक. ॥ ५
[4]संघात या चोविसांचा क्षेत्र; इच्छा, सुखासुख, ।
द्वेषप्रतीति, वृत्तीची धारणा, [5]तद्विकार हे. ॥ ६
[6]श्लाघेचा दंभहिंसेचा त्याग, क्षांति, [7]अवक्रता, ।
भक्ति श्रीगुरुची, [8]शौच स्थिरता, चित्तनिग्रह, ॥ ७
विषयांमाजि वैराग्य, निरहंकार[9] तो सदा, ।
जन्म मृत्यु जरा रोग दुःख हे दोष पाहणें. ॥ ८
आसक्त लिप्त ना होणें पुत्रदारगृहादिकीं, ।
अनिष्ट इष्टही होतां समचित्तत्व सर्वदा. ॥ ९
अद्वैतयोगें मद्रूपीं भक्ति अव्यभिचारिणी. ।
कंटाळणें लोकसभे, एकांतीं बैसणें सदा. ॥ १०
अध्यात्मबोधीं नित्यत्व, जडीं ज्ञानार्थ पाहणें. ।
हीं ज्ञानसाधनें, याचीं उलटीं अज्ञलक्षणें. ॥ ११
आतां सांगेन जें ज्ञेयं[10], मुक्ति ज्ञानें जयाचिया, ।
न आदिअंत, जें शुद्ध ब्रह्म, तें सत्, न तें असत्. ॥ १२
[11]तें रज्जुसर्प, हे हात पाय नेत्र शिरें मुखें ।
सर्वत्र तें, श्रोत्रयुक्त, सर्व व्यापुनि तें असे. ॥ १३
सर्वेंद्रियांविरहित [12]विषयेंद्रियभासक, ।
जीवत्वीं गुणभोक्तें तें, जें सर्वाधार निर्गुण ॥ १४
बाह्यांतरंग भूतांचें तेंचि स्थावरजंगम ।
[13]अतींद्रियत्वें अकळ, दूरी तें, तेंचि सन्निध. ॥ १५
नसोनि वेगळें भूतीं, वेगळेंसेंचि जें असे, ।
गिळी, [14]उगळीही भूतें, [15]धरिही, ज्ञेय जाण तें. ॥ १६

---

१. पृथ्वी, आप्, तेज, वायु, आकाश, हीं पंच महाभूतें. २. श्रोत्र (कान), त्वक् (चर्म), चक्षु (नेत्र), रसना (जीभ), घ्राण (नाक), हीं पांच ज्ञानेंद्रियें; हस्त, पाद, मुख, गुद, उपस्थ, हीं पांच कर्मेंद्रियें, मिळून दशेंद्रियें. ३. शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध हे इंद्रियांचे पांच विषय. ४. मेळा. ५. क्षेत्रविकार. ६. श्लाघेचा त्याग म्ह० मानाचा किंवा स्तुतीचा त्याग. ७. सो-शिकपणा. ८. शुचिर्भूतपणा. ९. 'निरहंकार सर्वदा' असाही पाठ आहे. १०. जाणावयाची वस्तु. ११. ब्रह्म. १२. विषयेंद्रियांचा भास होतो. १३. सूक्ष्मपणानें. १४. उत्पन्न करी. १५. (भूतांचें रूप) धारण करी.

प्रकाशीं, अंधकारीं तें असोनि, ज्योति वेगळें, ।
ज्ञान, ज्ञेय, ज्ञानलभ्य, सर्वचित्तीं अधिष्ठित. ॥ १७
संक्षेपें क्षेत्रही, ज्ञान, ज्ञेयही, बोलिलों क्रमें. ।
हें माझा भक्त जाणोनी, मत्स्वरूपासि पावतो. ॥ १८
प्रकृती आणि पुरुष, जाण दोघें अनादि हीं. ।
गुणा विकारां उत्पत्ति जाण प्रकृतिपासुनी. ॥ १९
कर्तेपणें प्रकृति हे हेतु, हे कार्यकारणी. ।
भोक्तृत्वीं सुखदुःखाचा हेतु हा पुरुष स्वयें. ॥ २०
गुण प्रकृतिचे भोगी प्रतिबिंबोनि तेंजळीं. ।
नाना योनीनिमित्ता या पुरुषा भोगवासना. ॥ २१
जो द्रष्टा, जाणता, भर्ता, परमात्मा, परेश, जो ।
तोचि भोक्ता दुजा देहीं पुरुषप्रतिबिंब जो. ॥ २२
जाणेल जो या पुरुषा, गुणेंसी प्रकृतीसही, ।
वर्ते जरी प्रपंचीं तो, तरि जन्मा नये पुन्हां. ॥ २३
पाहती निर्विशेषात्मा[3] ध्यानें कोणी, कितेक ते ।
सांख्यें, विश्वात्मयोगेंही, कर्मी, ब्रह्म असे किती. ॥ २४
आत्मा नेणोनि, कोणीही आइकोनि, उपासिती; ।
मृत्युसिंधूसि तरती तेही श्रवणतत्पर. ॥ २५
प्रतीति उपजे जे जे, जेव्हां जेव्हां चराचरीं, ।
क्षेत्रक्षेत्रज्ञसंयोगें ते, जाण भरतर्षभा! ॥ २६
समान सर्वां भूतीं जो आहे, त्या परमेश्वरा ।
अनित्यांतहि त्या नित्या जो पाहे, तोचि डोळस. ॥ २७
पटीं तंतू असें पाहे सर्वत्र सम ईश्वर. ।
न एक तो आत्मघाती, जाय मुक्तीस त्यावरी. ॥ २८
प्रकृतीनें क्रिया सर्वा करिजेताति, जो असें ।
पाहे, तेव्हां आत्मयाचें तो अकर्तृत्व पाहतो. ॥ २९

---

१. स्थान करून राहिलें आहे. २. प्रकृति हें जड त्यांत. ३. पूर्णपणें आत्मा पाहवी. ४. स्थावरजंगमामध्यें. ५. नाशवंतांत. ६. सारखा, भरलेला. ७. तो आपला घात करीत नाहीं; इतकेंच नव्हे, पण त्याला मुक्तिही प्राप्त होते. ८. अकर्तेपणा.

देखे जडतरंगांतें एक चैतन्यसागरीं, ।
[2]त्यापासूनचि विस्तार, तेधवां ब्रह्म पावतो. ॥ ३०
अनादित्वें निर्गुणत्वें चिदात्मा अविनाशि हा ।
असोनि, सर्व देहींही अकर्ता, बद्ध तो नव्हे. ॥ ३१
न [3]लिंपे जेंवि आकाश सूक्ष्मत्वें सर्वही स्थळीं, ।
सर्वत्र सर्वा देहींही, तसा आत्मा न लिंपतो. ॥ ३२
जसा प्रकाशितो लोक सर्वही एक भास्कर, ।
क्षेत्रज्ञ सर्व क्षेत्रांतें प्रकाशी एक भारता ! ॥ ३३
हा क्षेत्रज्ञक्षेत्रभेद, क्षेत्रींही ज्ञानदृष्टिनें ।
जडत्व भूतसंस्कार सोडूं जाणति, मुक्त ते. ॥ ३४
इति टीका समश्लोकी अध्यायीं या त्रयोदशीं ।
श्रीपार्थसारथी कर्ता, जो वामनमनोरथी. ॥ ३५
अध्याय तो हाच त्रयोदशावा, निरीक्षिती संत मनांत ठेवा. ।
क्षेत्रज्ञ हा चिद्गुण सर्वक्षेत्रीं, व्यापीतसे तोचिहि भूतमात्रीं. ॥ ३६

---

## अध्याय चौदावा.

### विषयप्रवेश.

बोलिला प्रकृति क्षेत्र, आत्मा क्षेत्रज्ञ, पूरुष ।
या अध्यायीं प्रकृतिच्या गुणाचे भाग बोलतो. ॥ १
ज्ञानांत उत्तम ज्ञान थोर सांगेन तें पुन्हा, ।
जें जाणोनि मुनी सर्व सिद्धि कैवल्य पावले. ॥ २
याचि ज्ञानाश्रयें माझें सारूप्यादिक पावले, ।
होतां ही सृष्टि, नव्हती; न पावति लयीं व्यथा. ॥ ३
महत्तत्त्वात्मक ब्रह्म, जीवत्वीं मज हेतु तें. ।
चिदंश ठेवितों त्यांत मी, तेव्हां विश्व होतसे. ॥ ४
ब्रह्म महत्तत्त्व माता, त्याच्या भूतांशशोणितें ।
होती देह, पिता त्यांचा मी, देतों जीववीर्य जें. ॥ ५

---

१. चैतन्यरूप समुद्रामध्यें सर्व जड पदार्थ बुडबुड्यासारखे आहेत असें पाहतो. २. त्या चैतन्यापासून. ३. चिकटत नाहीं, बद्ध होत नाहीं. ४. भूतांचा संबंध अर्थात् जडत्व. ५. ठेव, संपत्तिराशी. ६. मोक्ष हीच सिद्धि. ७. समीपता, सयोगता, सायुज्यता आणि सारूप्यता, या चार मुक्ति. ८. प्रलयकाळीं. ९. जडभाग जें रक्तमांसादि त्यानें.

प्रकृतीचेच गुण हे सत्त्व आणि रज,तम. ।
देहीं बाधति जे जीवा या गुणातीत अव्यय[1]. ॥ ५
त्यांत जें सत्त्व निर्दोष, निर्मळत्वें प्रकाशक, ।
सुखेच्छाविषय ज्ञान यासंगें येसि[2] बांधतें. ॥ ६
रज तें विषयप्रीति तृष्णासंगांत[3] उद्भव ।
बांधे याला, करवुनी कर्में विषयसाधनें. ॥ ७
तम आत्मत्वअज्ञान करी, मोह, जडभ्रम, ।
असावधानता, निद्रा, आलस्यें, तम बांधतें. ॥ ८
सुखांत प्रबळे सत्त्व, कर्मीत प्रबळे रज; ।
असावधत्वीं ज्ञानास वेष्टुनी प्रबळे तम. ॥ १०
मोडूनियां रजतमा, प्रबळे सत्त्व भारता! ।
रज सत्त्वतमां मोडी, तम सत्त्वरजा तसें. ॥ ११
सर्वेंद्रियांतें देहीं या प्रतीति बरवी जयीं, ।
आणी जेव्हां ज्ञान, तेव्हां जाणावें सत्त्व वाढलें. ॥ १२
प्रवृत्ति, कर्मी आरंभ, लोभ आणि अशांतता, ।
आणि स्पृहा, हे विकार विलास रज वाढतां. ॥ १३
कांहीं सुचेना, वर्तेना देह, आणि असावध, ।
बरें वाईट न कळे, वाढतें तम जेधवां. ॥ १४
वाढलें सत्त्व असतां, देहधारी मरे जरी, ।
ज्ञाते उत्तम ज्या लोकीं जाती, तो जाय त्याप्रती. ॥ १५
रजोवृद्धींत जो मेला, कर्मठांमाजि जन्मतो. ।
तमोवृद्धींत मेला तो, मूढयोनींत जन्मतो. ॥ १६
वेदोक्त पुण्यकर्मांचें फळ निर्मळ सात्त्विक; ।
रजाचें फळ तों दुःख; तमाचें फळ अज्ञता. ॥ १७
होतें सत्त्वास्तव ज्ञान, होतो लोभ रजास्तव; ।
असावधत्व, अज्ञान, अविवेक, तमास्तव. ॥ १८
सत्त्वें ऊर्ध्वगती[4] जाती, मध्यें राहति राजस; ।
जे निंद्यगुणवृत्तींत, तामसां त्यां अधोगती. ॥ १९

१. गुणातीत अव्यय अशा जीवाला. २. या आत्म्याला. ३. विषयसंगांत. ४. मोक्षगतीला.

कर्ता गुणावीण नरो, द्रष्टा पाहे असें जयीं, ।
स्वात्मा गुणातीत पाहे, तो पावे मत्स्वरूपता. ॥ २०
[1]लंघूनि गुण हे, आणि संस्कार तनुसंभव, ।
जन्ममृत्युजरादुःखावेगळा मुक्ति भोगितो. ॥ २१
कोणा चिन्हीं [2]तीं गुणांतें, हा अतिक्रमितो हरी, ।
कसा आचरतो, कैसा वर्ततो, यांस लंघुनी ? ॥ २२
जाणे प्रकाश प्रवृत्ति, मोह तत्त्वादि लक्षणें. ।
प्रवृत्तिकर्मं न द्वेषी, निवृत्तें जो अपेक्षिना. ॥ २३
असे उदासीन जसा, नव्हे चंचळ जो गुणीं. ।
गुण वर्तति हे ऐसें पाहे, कांहीं न जो करी. ॥ २४
प्रियाप्रिय, सुखें दुःखें, स्वनिंदा स्तुतिही सम; ।
आत्मनिष्ठ, जया तुल्य [3]भेंडा धोंडा सुवर्णही. ॥ २५
मानापमानीं, शत्रूंचा मित्रांचा पक्षही सम. ।
आरंभ सर्वही टाकी, तो गुणातीत बोलिजे. ॥ २६
मातें [4]अव्यभिचारें जो भक्तियोगें उपासितो, ।
तोचि हे गुण लंघूनी ब्रह्मत्वा योग्य होतसे. ॥ २७
वेदाची, [5]नित्य मोक्षाची, धर्म शाश्वत याचिही, ।
[6]ऐकांतसुख याचीही, [7]प्रतिष्ठा मीच केवळ. ॥ २८
इति टीका समश्लोकी अध्यायीं या चतुर्दशीं ।
श्रीपार्थसारथी कर्ता, जो वामनमनोरथी. ॥ २९
अध्यायीं चवदावियांत वदला श्रीकृष्णजी अर्जुना,
श्रोत्रादी गुण या विभाग वदतों ऐकें म्हणे सज्जना ! ।
तीन्ही हे गुण लंघुनी निजसुखा जाणोनि जे वर्तती,
ते योगी निजभक्त ते [8]गुणत्रयानीतात्मता पावती. ॥ ३०

---

१. गुणांना मागें टाकून. २. तीन्ही गुणांला. ३. मातीचें ढेंकूळ. ४. निर्बाधपणें. ५. शाश्वत मोक्षाची. ६. अखंड सुखाची. ७. आश्रय. ८. सत्व, रज, तम, या तीन गुणांनी व्याकुळ न होण्याची स्थिति.

## अध्याय पंधरावा.

### उपोद्धात.

विभाग तिहीं गुणांचे पूर्वाध्यायीं निरोपिले, ।
ते तों जड स्वयें, त्याला त्याचा भोग न बोलवे. ॥ १
म्हणावा भोग चैतन्या, तरि तें ब्रह्म केवळ. ।
उपाधिनें[1] तेंचि ईश, त्याला भोग न बोलवे. ॥ २
तेव्हां या त्रिगुणीं त्याचा प्रतिबिंबांश जीव जो, ।
'मम योनिर्महद्ब्रह्म' या दों श्लोकीं निरूपिला, ॥ ३
तो भोक्ता, आणि बिंबात्मा[2] अभोक्ता, दोघ हे जगीं, ।
एका वृक्षीं दोनि पक्षी, देहमात्रीं असे रिती. ॥ ४
प्रपंचाश्वत्थ हा वेदीं वर्णिला या मिसें, हरी. ।
वर्णितो मूळशाखादिभेदें वेदोक्त पिंपळ. ॥ ५
अश्वत्थ अविनाशी हा म्हणती म्हणऊनियां, ।
बोलेल प्रथमश्लोकीं त्याचा भावार्थ तो असा. ॥ ६
कीं द्रष्टा जोंवरी पाहे, सर्प रज्जूंत तों दिसे. ।
प्रलयीं निजतो द्रष्टा, नसे वास्तव तेधवां. ॥ ७
पाहतो जेधवां द्रष्टा सर्प आहेच, तेधवां ।
ऐसा प्रपंच म्हणुनी, म्हणती यास अव्यय. ॥ ८
ऊर्ध्वशब्दें ब्रह्म येथें, अधःशब्दें तदंश[3] जो ।
जीव कीं ऊर्ध्व जें त्याचें प्रतिबिंब अलीकडे. ॥ ९
मूळ तें मूळमायाच, शाखा देहचि अन्यही. ।
मूळ तें तों लिंगदेह, इत्यादि क्रम येथुनी. ॥ १०
या अध्यायांत भगवान् आतां बोलेल येथुनी. ।
टीका त्यांची समश्लोकी संगतीश्लोक हे पृथक्. ॥ ११

### विषयप्रवेश.

ऊर्ध्वीं[4] ब्रह्मीं मूळमाया, शाखा देह अधोजिवीं, ।
विश्वाश्वत्थ[5], श्रुती[6] पानें, जाणे जो, तोचि वेदवित्. ॥ १

---

१. कांहीं संस्कारानें. २. निष्कलंक आत्मा. ३. त्याचा अंश. ४. 'त्या ऊर्ध्वीं ब्रह्मीं । मूळ माया अश्वत्थाचें म्हणे जगत्स्वामी । तें मूळ तों माया म्हणूनि निगमागमीं । प्रसिद्ध असे' ॥ २१ ॥ यथार्थदीपिका–अ० १५ वा. ५. विश्व हाच अश्वत्थवृक्ष. ६. वेद.

जीवेश्वरीं आश्रित देह शाखा, गुणीं प्रवृद्धा[1] विषयोपशाखा[2], ।
मूळें पृथक् लिंगतनू जिवीं हीं, कर्मं जया बंध मनुष्यदेहीं. ॥ २
हा ब्रह्मरज्जू, जग सर्प आतां, आद्यंत ना वस्तुहि जो पहातां; ।
मूळें जयाचीं प्रबळें विचित्रें, छेदूनि हा वृक्ष असंगशस्त्रें, ॥ ३
तें त्याचिमध्यें पद[3] धुंडणें कीं, ज्यामाजि गेल्या परते न लोकीं. ।
कीं पावणें त्या पुरुषाच आद्या, प्रवृत्ति जेथूनिच[4] हे अनाद्या. ॥ ४
न श्लाघ्यता[5], मोह न संगदोष, निष्काम जे स्वात्मविचारशेष[6] ।
द्वंद्वें न ज्यांला सुखदुःखसंज्ञा, ते जाति त्या नित्यपदा, अभिज्ञा! ॥ ५
त्या पदा चंद्रसूर्याग्नी हे कोणी न प्रकाशिती, ।
जें पावल्या न संसार, माझें परम धाम तें. ॥ ६
माझाच प्रतिबिंबांश जाला जीव जगीं, जडा ।
मना पंचेंद्रियां अन्या प्रकृतिस्थांहि[7] चाळितो. ॥ ७
यां[8] सर्वें घे शरीरांतें, निघे ईश्वर जेधवां[9], ।
यातें घेऊनियां जातो, वारा गंधासि जे रिती. ॥ ८
श्रोत्र चक्षु त्वचा जिव्हा घ्राण यां पांच इंद्रियां ।
अधिष्ठूनि, मनातेंही, सेवितो विषयांस हा. ॥ ९
निघे कैसा, असे कैसा, भोगीं कैसा, गुणीं कसा, ।
हें न पाहति ते मूढ, पाहती ज्ञानडोळस. ॥ १०
प्रयत्नीं, आणि जे योगी देखती यासि अंतरीं, ।
अशुद्धचित्त यत्नेंही न देखति, अबुद्धि जे. ॥ ११
तेज जें चंद्रसूर्याग्नितेजेंही जें जगासह ।
प्रकाशी विषयां सर्वा, माझें तों तेज जाण तें. ॥ १२
धरितों शक्तिनें भूतें मी, पृथ्वींत प्रवेशुनी; ।
पोसितों औषधी, चंद्र मी होऊनि रसात्मक. ॥ १३
प्राणियांच्या शरीरांत मी वैश्वांनर[10] होउनी, ।
प्राणापानीं पचवितों मींच अन्नें चतुर्विधें[11]. ॥ १४

---

१. तीन गुणांनी वाढलेल्या फांद्या. २. विषय हे ज्याच्या डाहळ्या. ३. स्थान. ४. आद्य पुरुषापासून. ५. अभिमान. ६. आत्मविचारांत गढून राहिलेले. ७. प्रकृतींत असलेल्या मनाला आणि पंचेंद्रियांस. ८. मन आणि इंद्रियें यांला. ९. शरीरांतून निघतांना. १०. अग्नि. ११. भक्ष्य, भोज्य, लेह्य आणि चोष्य.

सर्वांचिया मी हृदयीं प्रविष्ट, देतों स्मृतीविस्मृतिबोध इष्ट. ।
मीं ज्ञेय सर्वां श्रुतिगम्य संतां, वेदांतकृत् व्यास मि वेदवेत्ता. ॥ १५
लोकीं या दोनि पुरुष, क्षर आणिक अक्षर. ।
क्षर तों सर्वही भूतें, अंश कूटस्थ अक्षर. ॥ १६
पुरुषोत्तम तो अन्य, सर्वात्मा बिंब बोलिला. ।
जीवत्वें जो प्रवेशूनी, ईशत्वें विश्व जो धरी. ॥ १७
ज्यालागीं मी क्षरातीत, अक्षराहूनि उत्तम; ।
यालागिं लोकीं वेदींही ख्यात मी पुरुषोत्तम. ॥ १८
तो सर्वज्ञ असें जाणे जो मला पुरुषोत्तमा, ।
मीचि क्षराक्षर अशा सर्वभावें भजे मज. ॥ १९
असें हें बोलिलों शास्त्र मी गुह्यतम सज्जना ! ।
जाणेल जो बुद्धिमंत, होय तो कृतकृत्यही. ॥ २०
इति टीका समश्लोकी अध्यायीं पंधराविया ।
श्रीपार्थसारथी कर्ता जो वामनमनोरथी. ॥ २१
अध्याय हा पंचदशाख्य नामें, जे वाचिती ऐकति अर्थ प्रेमें, ।
ते जाणती श्रीपुरुषोत्तमातें, क्षराक्षरा होउँनि उत्तमा तें. ॥ २२

---

## अध्याय सोळावा.

### उपोद्घात.

पूर्वाध्यायीं 'सर्वभावें मद्भक्त भजती मज' ।
म्हणोनि बोलिला, ते तों दैवी संपत्तिचे नर. ॥ १
मोक्ष दैवीसंपदेनें, बंधका दैत्यसंपदा. ।
म्हणोनि संपदा दोनी या अध्यायीं निरूपितो. ।

### विषयप्रवेश.

सत्वशुद्धि, भयत्याग, ज्ञानयोगांत धारणें, ॥ २
दानही, दमही, यज्ञ, तप, शास्त्र, अवक्रता, ॥ १
अहिंसा, सत्य, अक्रोध, त्याग, शांति, अपैशुन, ।
मनीं लज्जा, दया भूतीं, मृदुत्व, स्थैर्य निस्पृह. ॥ २

---

१. वेदांत करणारा व्यास. २. नाशवंत. ३. स्थिर. ४. अविनाशी, चैतन्य. ५. पेक्षा. ६. बद्ध करणारी. 'बद्ध ते' असा पाठ आहे. ७. चहाडी न करणें.

परद्रोह निजश्लाघा नसणें, धारणा, क्षमा, ।
शुद्धता, तेज, हे होती दैवीसंपत्तिच्या नरां. ॥ ३
दंभ, गर्व, स्वाभिमान, क्रोध, क्रूरत्व, अज्ञता; ।
आसुरी संपदेलागीं पावल्या ज्यासि होति हीं. ॥ ४
मोक्षार्थ संपदा दैवी, भवबंधार्थ आसुरी; ।
पांडवा! शोक न करीं, दैवी संपत्तिचाच तूं. ॥ ५
द्विधा उद्भव भूतांचा, दैव आणिक आसुर. ।
विस्तारें बोलिलों दैव; आतां आसुर आइक. ॥ ६
धर्मार्थकामप्रवृत्ति, मोक्षमार्ग, निवृत्तिही; ।
नेणती शौच आचार सत्य त्यां असुरां नसे. ॥ ७
निरीश म्हणती विश्व मिथ्या, कृत्रिम बोलती; ।
न विश्व चिदचिद्योगें[1] म्हणती, मैथुनोद्भव. ॥ ८
हे, प्रत्यक्षीं दृष्टि ज्यांची, भ्रष्टात्मे[2] अल्पबुद्धि जे, ।
क्रूरकर्मे, लोकघाती, दुष्ट चार्वाक[3] वर्तती. ॥ ९
दंभ, श्लाघा, मदें मत्त; बुडोनि कामसागरीं, ।
मोहें घेऊनि दुर्बुद्धि, वर्तती अशुचिव्रत[4]. ॥ १०
मृत्युचिंता आणि नाना चिंता जों मृत्यु तों तयां, ।
पुरुषार्थ जयां भोग[5], प्रत्यक्षीं ज्यांस निश्चय. ॥ ११
आशापाशशतीं बद्ध; कामक्रोधांत आश्रित; ।
जोडिती कामभोगार्थ अन्यायें धनसंग्रह. ॥ १२
हें आजि म्यां मेळविलें, हा होणार[6] मनोरथ, ।
म्हणती मज हें आहे, मिळेलहि पुन्हां धन. ॥ १३
हा आजि मारिला वैरी, आणिकांसहि मारिन, ।
समर्थ मी, मीच भोक्ता, बळि, सिद्ध, सुखीहि मी. ॥ १४
मी समृद्ध, मला भृत्य, कोण हो मजसारिखा? ।
यजीन, सुख घेईन, म्हणती श्रौत दैत्य हे. ॥ १५
चित्तीं स्वर्गादिकां भ्रांती, मोहजाळेंचि वेष्टले, ।
कामभोगासक्त देही, पडती नरकामधें. ॥ १६

---

१. जडचैतन्याच्या योगानें. २. 'भ्रष्टार्थी' असा एक पाठ आहे. ३. नास्तिक, चार्वाकपंथी. ४. भ्रष्टव्रतें करितात. ५. कामोपभोग. ६. 'घेणार' असाही पाठ आहे.

धनमानमदें देही, गर्विष्ठ तनु पोषिती. ।
नांवाचे यज्ञ यजिती, दंभें अविधिपूर्वक. ॥ १७
धनविद्यादिकबळें माझा द्वेष घडे तयां; ।
कीं आत्मज्ञान जें देहीं, द्वेषें हे निंदिती तया. ॥ १८
मद्भक्तां द्वेष करिती, मी त्यां क्रूरां नराधमां ।
सदा आसुरयोनींत दुष्टजन्मींच घालितों. ॥ १९
आसुरी योनि जे मूढ जन्मजन्महि पावले, ।
न पावतांचि ते मातें, जाती थोर अधोगती. ॥ २०
नरकाचें तींप्रकारें द्वार हें आत्मघातक, ।
काम क्रोध तसा लोभ, तस्मात् हें त्रय टाकिजे. ॥ २१
या तिहीं नरकद्वारांपासूनि सुटला नर, ।
आचरे आपलें श्रेय, जाय थोर गतिप्रती. ॥ २२
जो शास्त्रविधि सोडून, वर्ततो कामतत्पर, ।
न तो पावेल सिद्धीस, सुखा ना, उत्तमा गती. ॥ २३
तस्मात्प्रमाण सच्छास्त्र, कार्याकार्य, विचारितां, ।
शास्त्र विध्युक्त जाणोनी, कराया कर्म योग्य तूं. ॥ २४

### उपसंहार.

इति टीका समश्लोकी षोडशाध्यायनिर्णयीं. ।
श्रीपार्थसारथी कर्ता, जो वामनमनोरथी. ॥ १

अध्याय हा षोडश निर्णयाचा, कीं दैविही[1] आणिक आसुरीचा; ।
विभाग येथें विशदार्थ वाणी बोले हरीची, न सुखासि वाणी. ॥ १

---

## अध्याय सतरावा.

### उपोद्घात.

पूर्वाध्यायीं 'शास्त्र मुख्य, तें जाणोनिच वर्त तूं;' ।
म्हणूनि बोलिला कृष्ण, तेथें अर्जुन पूसतो. ॥ १

### विषयप्रवेश.

'जे शास्त्रविधि सोडून, श्रद्धेनें यजिती स्वयें. ।
त्यांची निष्ठा कोण? कृष्णा! सत्त्व, कीं रज, कीं तम?' ॥ १

---

१. 'दैव ही' पाठ. २. स्पष्टार्थक शब्दांनीं. ३ कमताई.

'संस्कारापासुनी श्रद्धा होते जीवांस ते त्रिधा ।
सात्त्विकी, राजसी आणि तामसी, तीस आइक. ॥ २
जसें सत्त्व, तसी श्रद्धा होते सर्वांसि भारता ! ।
ज्याची श्रद्धा तेंचि होतो जीव श्रद्धामय स्वयें. ॥ ३
देवां यजिति सत्त्वाढ्य; यक्षरक्षांस राजस; ।
तामस प्रेतभूतांच्या गणास यजिती जन. ॥ ४
शास्त्रीं नाहीं बोलिलें, तें करिती घोर जें तप. ।
दंभें, कामें, अहंकारें, विषयप्रीतिच्या बळें, ॥ ५
करिती क्षीण देहातें, जीवात्मा आंत मी तया, ।
मजही पीडिती मूढ; त्यांचे आसुर निश्चय. ॥ ६
आतां आहारही सर्वां त्रिविध प्रिय होतसे. ।
यज्ञही, तपही, दान, त्यांचे हे भेद आइक. ॥ ७
करिती बळ, आरोग्य, सुखप्रीत्यादि वृद्धि जे, ।
स्थिर, स्निग्ध, रसें युक्त आहार प्रिय सात्त्विकां. ॥ ८
अत्युष्ण, क्षार, कट्वम्ल, रूक्ष, तीखट, दाहक, ।
आहार राजसां इष्ट दुःखशोकव्यथाप्रद. ॥ ९
शिजोनि लोटला काळ, वाळलें, विटलें, शिळें, ।
उच्छिष्टें, अपवित्रें, तीं भोजनें तामसां प्रिय. ॥ १०
फळाची टाकुनी कांक्षा, यजिती विधिदृष्टिनें, ।
यजावेंचि अशा एका भावें, तो यज्ञ सात्त्विक. ॥ ११
फळाच्या अनुसंधानें, दंभार्थ अथवा, यजी. ।
यज्ञ तो भरतश्रेष्ठा ! जाण केवळ राजस. ॥ १२
हीन जो विधिमंत्रेंही, अन्नशांति न दक्षिणा, ।
श्रद्धारहित जो यज्ञ, तो तों तामस बोलिजे. ॥ १३
देवविप्रगुरुज्ञानीपूजा, शुद्धि, अवक्रता, ।
ब्रह्मचर्य, अहिंसा, हें शारीर तप बोलिजे. ॥ १४
नेदी क्लेश असें वाक्य, सत्यही प्रिय हीतही. ।
वेदवेदार्थअभ्यास, वाचेचें तप बोलिजे. ॥ १५
मनःप्रसन्नता, मौन, सौम्यत्व, मननिग्रह, ।
चित्तीं निष्कामता, ऐसें बोलिजे तप मानस. ॥ १६

१. सात्त्विक. २. गुह्यकांना आणि राक्षसांना. ३. दुःख, शोक, व्यथा देणारे आहार.

केलें जें परम श्रद्धेकरूनि तप, तें त्रिधा ।
विनाफळाच्या जें युक्त तप सात्त्विक बोलिजे. ॥ १७
सन्मान पूजा श्लाघार्थ, आणि दंभें करूनियां, ।
करिती राजस तपें, तीं चंचळ अशाश्वत. ॥ १८
मूढत्वआग्रहें, स्वात्मपीडेनें, करितो तप ।
शत्रूच्चाटनकामें वा, म्हणावें त्यास तामस. ॥ १९
देणें विहित या भावें दे, विना उपकार जो, ।
देशीं काळींहि पात्रींही दान सात्त्विक बोलिजे. ॥ २०
जें कां प्रत्युपकारार्थ, अथवा फळ इच्छुनी, ।
अथवा कष्ट मानूनी, देणें तें दान राजस. ॥ २१
कुत्सिता देशकाळीं ही, दान देणें अपात्रिं ही, ।
असन्मानें, हेळनेनें, तें तों तामस बोलिजे. ॥ २२
'ॐ तत् सत्' त्रिपदें ब्रह्म बोलिलें लक्षणत्रय, ।
तेणें पूर्वीं विप्र वेद यज्ञादि विधि बोलिजे. ॥ २३
म्हणूनि 'ॐ' म्हणुनियां, यज्ञदानतपःक्रिया ।
वेदवेत्त्यांचिया, नित्य, विधिप्रोक्ता, प्रवर्तती. ॥ २४
तो कुंभ म्हणतां माती, कर्मही ब्रह्म 'तत्'पदें, ।
मोक्षार्थ यज्ञदानादि निष्काम करिती असें. ॥ २५
सत्यत्वीं आणि साधुत्वीं वर्ते 'सत्'शब्द त्यामधें. ।
निष्कामकर्मी साधुत्वें पार्था! सच्छब्द योज ते. ॥ २६
सच्छब्दें साधुतेंही जे यज्ञीं दानीं तपीं स्थिती, ।
सच्छब्दार्थें ब्रह्मरूप तें सत्यात्मक कर्म सत्. ॥ २७
अश्रद्धेनें होम, दान तपही अणि जें घडे ।
असत् असाधु बोलावें जितां मेल्या निरर्थक. ॥ २८

उपसंहार.

इति टीका समश्लोकी अध्यायीं सतराविया ।
श्रीपार्थसारथी कर्ता जो वामनमनोरथी. ॥ २९
अध्याय हा सप्तदशाख्य योग, श्रद्धा त्रिधातीं गुणिंचा विभाग ।
जें कर्म तें ब्रह्ममय स्वरूपीं, पाहे वदे हा हरि विश्वरूपी. ॥ ३०

---

१. शत्रूच्या नाशार्थ.

## अध्याय अठरावा.

### उपोद्घात.

'ॐ तत् सत्' या तिहिं पदीं ब्रह्मिचें लक्षणत्रय ।
बोलोनि, पूर्वअध्यायीं कर्मयोगींच योजिलें. ॥ १
शंकला पार्थ येथें कीं श्रवणें ब्रह्मलक्षणें ।
कळावीं श्रवणीं आधीं, श्रुति संन्यास बोलती. ॥ २
यज्ञादि तों गृहस्थासी बोलिले, न यतीस हे. ।
गृहस्थासि कसें तेव्हां कर्मीं ब्रह्मत्व आकळे? ॥ ३
या लागीं पंचमीं, षष्ठीं अध्यायीं कर्मयोग जो, ।
निष्काम ईश्वरोद्देशें, तोचि संन्यास बोलिला. ॥ ४
'संन्यस्य श्रवणं कुर्यात्,' म्हणूनि श्रुति बोलते; ।
तेव्हां तो हाचि संन्यास, नव्हे आश्रमरूप तो. ॥ ५
जरि आश्रमसंन्यासें श्रवणालागिं योग्यता, ।
तरि या श्रवणायोग्य कसा जालों गृहस्थ मी? ॥ ६
आतां जन्मांतरीं होतों मी संन्यासी म्हणों जरी, ।
'संन्यस्य श्रवणं कुर्यात्' या श्रुतीस विरुद्ध तें. ॥ ७
'द्विजत्व पावुनी, वेद म्हणावे,' म्हणती श्रुती. ।
द्विजत्व जन्मांतरिचें नये कल्पूं इये स्थळीं. ॥ ८
'बैसोनि निद्रा करावी,' या वाक्यें संशयांतरीं ।
होता जरी बैसला हा उभ्यानेंचि निजों नये. ॥ ९
'संन्यस्य' या श्रुतिपदें संन्यासश्रवणांमधें[१] ।
काळाचें व्यवधानत्व सर्वथा बोलतां नये. ॥ १०
'संन्यस्य श्रवणं कुर्यात्' असें श्रुति न बोलती ।
'संन्यस्य श्रवणं कुर्यात्' म्हणूनि म्हणती जरी, ॥ ११
तरि संन्यस्यशब्दार्थें पूर्व संन्यास योजता, ।
'संन्यस्य' या पदें तों हे कल्पना न कधीं घडे. ॥ १२
हा अर्थ अर्जुन मनीं विचारी, आणि आपणा ।
विना आश्रमसंन्यास जालें श्रवण तों खरें. ॥ १३
ऐसेंचि याज्ञवल्क्यादि गृहस्थां जनकादिकां. ।
यालागिं जो कर्मयोग, तोचि संन्यास निश्चित. ॥ १४

१. संन्यास आणि श्रवण यांमध्यें.

आतां 'मोक्षप्रधानांग एक त्याग' म्हणे श्रुती. ।
'त्यागेनैकेन' म्हणुनी; तरि तो त्याग कोणता? ॥ १५
न्यास त्यागासि म्हणती, त्यागें संन्यास बोलिजे. ।
तरि संन्यास नसतां मुक्त हे जनकादिक. ॥ १६
आतां या त्यागशब्दें जो कर्मयोग जगद्गुरू ।
संन्यासत्वें बोलताहे, तोचि त्याग म्हणों जरी, ॥ १७
'न कर्मणा न प्रजया' म्हणूनि, श्रुति तेच कीं ।
बोलते त्यागमात्रें जे मोक्षातें श्रुति बोलते; ॥ १८
तरि संन्यास तो कैसा? आणिखी त्याग तो कसा? ।
पुसों या आदिगुरुला म्हणतां, येथ शंकला. ॥ १९
कीं संन्यास द्विविध हा, त्यागही बहुतां परी, ।
तरि या दोहिंचें तत्त्व कैसें, तेंचि पुसों म्हणे. ॥ २०
पुसेल अर्जुन असें, बोलेल श्रीजगद्गुरू. ।
कर्मयोगींच दावील संन्यास, त्याग, दोनिही. ॥ २१
काम्यकर्मत्याग त्यांत संन्यासत्वें निरूपिल; ।
त्याग, निष्कामकर्में जीं, त्यांचेंही फळ टाकणें. ॥ २२
'न कर्मणा' म्हणउनी, श्रुति काम्य निषेधुनी, ।
त्यागें ज्या मोक्ष वदते, त्याग तो कर्मयोगची.[2] ॥ २३
तोचि संन्यास, परि हा अर्थ नेणोनि अर्जुन ।
पुसतो, म्हणुनी कृष्ण अर्थ हाचि निरूपिल. ॥ २४
निष्कामकर्मही[3] बंध पितृलोक वदे श्रुती; ।
यालागिं तो कर्मयोग, जीं कर्में ईश्वरार्पित. ॥ २५
यालागिं त्यागशब्दार्थ ईश्वरार्पित कर्म कीं, ।
न करी बंध, उगला त्याग जो, त्याग तो नव्हे. ॥ २६
यालागिं काम्यकर्मांचा त्याग संन्यास वर्णुनी ।
मागुतीं सर्व कर्मांचा फळत्यागहि वर्णिला. ॥ २७
अन्यथा काम्यकर्मांचा त्याग बोलोनि, मागुती ।
'सर्वकर्मफळत्याग' कां बोलेल जगद्गुरू? ॥ २८

---

१. 'काय' असाही पाठ आहे. २. ईश्वरार्पित कर्में करणें. ३. फलेच्छा न धरितां केलेलें कर्मही.

त्याग जो काम्यकर्मांचा, फलत्याग तयांतचा ।
सांघला, कीं नित्यकर्म स्वयें निष्फल जेधवां. ॥ २९
आतां, जीं लौकिकें कर्में, तत्फलत्याग बोलिला ।
म्हणावें तरि, नित्याचा त्याग तो बोलिला नसे. ॥ ३०
काम्यत्यागें नित्यकर्म करावें हेंचि सूचिलें. ।
नित्यकर्मी तरी बंध पितृलोक वदे श्रुती. ॥ ३१
बंधकें नित्य कर्में हीं, बंधकें लौकिकें जसीं. ।
बंधकें नव्हतीं कर्में, दोनीही ईश्वरार्पितें. ॥ ३२
सर्वकर्मफलत्यागें दोहींचें फल टाकणें, ।
म्हणतो याचि भावें कीं, करावीं ईश्वरार्पितें. ॥ ३३
करूनि नित्यकर्में, हीं न करी ईश्वरार्पण, ।
बंधकें होति तीं तीं ही, न चुके वस्तुचा गुण. ॥ ३४
'नलगे मजला मृत्यु, म्हणे तरि मरे विषें. ।
सुधा न कळतां सेवी, तरि तो अजरामर. ॥ ३५
तरि हे शक्ति वैद्याची, कीं वैद्य वचनाग्रही ।
करी रसायन; असा कर्में दे ज्ञान ईश्वर. ॥ ३६
'यज्ञार्थात्कर्मणोऽन्यत्र लोकोऽयं कर्मबंधनः' ।
अध्याया तिसऱ्यामाजि या श्लोकें हाचि निर्णय. ॥ ३७
सर्वकर्मफलत्याग म्हणजे कर्म नित्य जें, ।
आणि लौकिक तें सर्व, करावें ईश्वरार्पण. ॥ ३८
या स्थळीं याचि भावें हा 'सर्व'शब्दप्रयोगही ।
उगा 'कर्मफलत्याग' येरवीं येथ बोलता. ॥ ३९
जो ग्रंथ वामनमुखें 'कर्मतत्त्व' म्हणूनियां ।
रचिला हरिनें, तेथें हा निर्णय अशेषही. ॥ ४०
प्रश्न आतां अर्जुनाचा टीका चालेल जेथुनी ।
तेथूनियां समश्लोकी, संगतीश्लोक हे पृथक्. ॥ ४१

विषयप्रवेश.

संन्यासाचें महाबाहो! जाणों मी तत्त्व इच्छितों. ।
त्यागाचेंही हृषीकेशा! वेगळें केशिसूदना! ॥ १

---

१. 'साधका' असा एक पाठ आहे. २. 'बोलिलें' असाही पाठ आहे. सुचविलें. ३. अमृत. ४. 'असा पहा' असा एक पाठ आहे. ५. 'एथुनी' असा पाठ आहे.

ज्ञानी तो काम्यकर्मांचा त्याग संन्यास जाणती, ।
सर्वकर्मफलत्याग त्याग तो ईश्वरार्पणें. ॥ २
दोषांचेंच परी कर्म टाकावें, एक बोलती; ।
टाकूं नयेहि, म्हणती, यज्ञदानतपक्रिया. ॥ ३
माझा निश्चय आईक त्यागीं तूं भरतर्षभा! ।
त्याग हा पुरुषव्याघ्रा! आहे त्रिविध बोलिला. ॥ ४
करावींच, न टाकावीं, यज्ञ दानें क्रिया तपें. ।
पावनें बुद्धिमंतां हीं यज्ञ दान क्रिया तप. ॥ ५
हेंही मीपण टाकूनी, फलत्याग मदर्पणें ।
करूनि, करणें माझें मत निश्चित उत्तम. ॥ ६
स्वरूपें नित्यकर्मांचा त्याग शास्त्रें घडेचि ना. ।
अविवेकें करी त्याग, त्याग तामस बोलिला. ॥ ७
कष्ट मानूनि, जें कर्म, देहक्लेशभयें, त्यजी, ।
केल्या या राजसत्यागा, पावे त्यागफळा न तो. ॥ ८
विहितें म्हणुनी नित्यें करी, मीपण टाकुनी, ।
मदर्पणें फळें त्यागी, त्याग सात्त्विक बोलिजे. ॥ ९
प्रवृत्तिकर्मे निंदीना, निवृत्ती सक्त होइना, ।
त्यागी, सत्त्वें बरा युक्त सुबुद्धि छिन्नसंशय. ॥ १०
देहधारी नव्हे सक्त टाकाया सर्व कर्मही, ।
ब्रह्मार्पणें फळें त्यागी, त्यागी तो एक बोलिजे. ॥ ११
संन्यास त्याग पूर्वोक्त न ज्यांस, त्यांस हीं फळें ।
जीं बरीं, वाइटें, मिश्रें; न त्या संन्यासियां क्वचित्. ॥ १२
आतां निःसंगता हे, कीं कर्मांचीं पांच कारणें ।
बोलिलीं सांख्य वेदांतीं; आत्मा निःसंग जाण तूं. ॥ १३
अधिष्ठान क्षेत्र, कर्ता अहंकारचि, इंद्रियें, ।
चेष्टा प्राणाचिया, दैव तद्भोगप्रद पांचवें. ॥ १४
कायावाचामनेंही जें कर्म आरंभितो नर, ।
त्या बऱ्या, वाइटां, मिश्रां, पांचही हींचि कारणें. ॥ १५
ऐसें असोनिही कर्ता केवळा आत्मयासि जो ।
मानी, न शोधितां, बुद्धीअंध तो शास्त्रदृष्टिही. ॥ १६

१. शास्त्रदृष्टीनें ही अंध.

मी कर्ता हा नसे भाव, बुद्धि लिप्त नव्हे फळीं, ।
मारूनि हे लोकही, तो न मारी; बद्धही नव्हे. ॥ १७
कर्मी साधन, साध्याचा, साधकांचा, विधि त्रिधा. ।
करणें, कर्म, कर्ता, हा कर्मसंग्रहही त्रिधा. ॥ १८
ज्ञान, कर्महि, कर्ताही, सत्त्वादि त्रिगुणी त्रिधा, ।
सांगेन सांख्यशास्त्रोक्त तें यथास्थित आइक. ॥ १९
सर्वां जडीं ज्ञानसत्ता एक, भिन्नीं अभिन्न जें ।
अविनाशी नश्वरांत देखे, तें ज्ञान सात्त्विक. ॥ २०
भूतीं भिन्नत्व, अन्योन्य भौतिकीं जीव हे स्वयें. ।
अनादि ते वेगळाले, जाणे तें ज्ञान राजस. ॥ २१
सर्व जें कारण तसें एक तत्कार्य मानुनी, ।
सक्त त्यांत न जें तत्त्व अयुक्त क्षुद्र तामस. ॥ २२
मी कर्ता हा नसे संग, राग द्वेष नसोनिही, ।
निष्काम जें नित्यकर्म केलें, तें कर्म सात्त्विक. ॥ २३
जें मी कर्ता म्हणउनी, कामइच्छेंकरूनियां, ।
आणि जें बहु कष्टेंही करी, तें कर्म राजस. ॥ २४
मोहें तत्काळ जें बाधे, परहिंसाक्षयार्थ जें, ।
आरंभिजे न धर्मादिहेतु, तें कर्म तामस. ॥ २५
फलेच्छा न अहंकार ज्यास, उत्साह धैरणा, ।
सिद्धीअसिद्धींत सम, कर्ता सात्त्विक बोलिजे. ॥ २६
कामीं कर्मफळीं इच्छा, लोभी, अशुचि, हिंसक, ।
हर्षशोकें युक्त होय, कर्ता राजस बोलिला. ॥ २७
अयुक्त मूढ गर्विष्ठ कपटी आळशी शठ ।
विषादी दीर्घसूत्री जो, कर्ता तामस बोलिला. ॥ २८
बुद्धीचे धारणेचेही भेद त्रिगुण आइक. ।
बोलिजेती अशेषें जे, वेगळाले धनंजया! ॥ २९
प्रवृत्तिबंधही देखे जडा कार्या भयांत जे, ।
निवृत्ति मोक्ष आत्मत्वीं निर्भयीं, बुद्धि सात्त्विकी. ॥ ३०

१. धैर्य. २. विस्तारानें.

जिणें धर्मा अधर्मातें, कार्यातें कारणांसही, ।
जाणावें तत्वता तैसें, नेणे, ते बुद्धि राजसी. ॥ ३१
अधर्मातें धर्म मानी, विपरीतार्थही करी, ।
वेदीं पुराणीं, ते बुद्धी अविद्यावृत तामसी. ॥ ३२
ज्या धारणेनें धरिजे मन प्राणेंद्रियक्रिया ।
विश्वात्मयोगें जडतां न धरी धृति सात्त्विकी. ॥ ३३
जिणें धर्मार्थकामातें धरिजे तत्फलासही, ।
इच्छिजे वासनासंगें, धारणा तेचि राजसी. ॥ ३४
जिणें निद्रा शोक भय विषाद मद यांसही ।
पार्था! न सोडि दुर्बुद्धि, धारणा तेचि तामसी. ॥ ३५
आतां सुख त्रिविध कीं योगीं जेथें रमे मन, ।
अभ्यासें वृत्ति दुःखांच्या त्या सुखीं नाश पावती. ॥ ३६
आरंभीं विष जें वाटे, शेवटीं अमृतोपम, ।
चित्तबुद्धिप्रसादें हें उपजे, सुख सात्त्विक. ॥ ३७
विषयेंद्रियसंयोगें आरंभीं अमृतोपम, ।
शेवटीं जें विषा तुल्य, सुख तें जाण राजस. ॥ ३८
आरंभीं, फलबंधेंही, जें कां बुद्धिस मोहक, ।
निद्राविस्मृतिआलस्यें सुख तें जाण तामस. ॥ ३९
न तें पृथ्वींत न स्वर्गीं देवांमाजिहि सत्त्व तें, ।
जें नातळे या त्रिगुणां, तें माझें सत्त्व केवळ. ॥ ४०
ब्राह्मणां क्षत्रियां वैश्यां शूद्रांच्याही क्रिया पृथक् ।
अधिष्ठानस्वभावें जें, जालें त्रिगुण त्या गुणीं. ॥ ४१
तप क्षमा दम शम शौचास्तिक्य अवक्रता ।
ज्ञान विज्ञान या जाल्या विप्रवर्णासह क्रिया. ॥ ४२
शूरत्व तेज दक्षत्व धारणा रणधीरता ।
दातृत्व ईशभक्ती या जाल्या क्षात्रासह क्रिया. ॥ ४३
कृषिगोरक्षणें द्रव्यें विकणें वैश्यकर्म हें ।
सेवा शूद्रक्रिया याही जाल्या वर्णासमागमें. ॥ ४४
स्व स्वकर्मींच रत जो, सिद्धि तो पावतो नर. ।
स्वकर्मीं निष्ठ, तो सिद्धि पावे ते रीति आइक. ॥ ४५

१. ज्या बुद्धीकरून.

जेथें प्रवृत्ति भूतांची ज्याणें हें व्यापिलें जग, ।
स्वकर्मे त्यास पूजूनी, पावतो सिद्धि मानव. ॥ ४६
स्वधर्म नीचही श्रेय, परधर्मा बऱ्याहुनी. ।
स्ववर्णी नेमिलें कर्म करितां, पातकी नव्हे. ॥ ४७
जें वर्णांसह जालें, तें न टाकावें सदोषही; ।
कीं कर्मे वेष्टिलीं दोषें सर्व, अग्नि धुरें जसा. ॥ ४८
बुद्धि ते सिद्धि नैष्कर्म्या तो संन्यासेंचि पावतो, ।
अलिप्तबुद्धि जो कर्मी जितचित्त परिग्रह. ॥ ४९
गुरूपदेशें सिद्धीतें पावला ब्रह्म तो कसा, ।
पावतो ते ज्ञाननिष्ठा ! तूं संक्षेपेंचि आइक. ॥ ५०
निष्कामचित्त आत्मत्वीं धारणेनें धरूनियां, ।
शब्दादिभोग टाकूनी, द्वेषप्रीतीहि टाकुनी. ॥ ५१
एकांत, लघु आहार, मनोवाक्कायनिग्रह, ।
ध्यानयोगीं सदा निष्ठ, वैराग्य धरि जो दृढ; ॥ ५२
बळ गर्व अहंकार काम क्रोध परिग्रह ।
सोडूनि ममता, शांत ब्रह्मत्वा योग्य होतसे. ॥ ५३
ब्रह्म होतां, प्रसन्नात्मा, इच्छा शोक न जो करी; ।
सर्वभूतीं भक्ति माझी, तो सर्व सम पावतो. ॥ ५४
अन्यत्वें ब्रह्म पुच्छत्वें जाणे सर्वात्मभक्तिनें ।
तत्त्व जाणोनि, देहांतीं निवोनि न निघे पुन्हां. ॥ ५५
प्रारब्धें सर्व कर्मेंही करी जरि मदाश्रयें, ।
माझ्या प्रसादें तो पावे पद शाश्वत अव्यय. ॥ ५६
अर्पूनि सर्वेंही कर्मे, चित्तें मत्पर होउनी, ।
ज्ञानयोगाश्रयें चित्त मद्रूपीं लावीं, तूं सदा. ॥ ५७
मच्चित्त मत्प्रसादें तूं सर्वदुःखाब्धि लंघिशी; ।
आतां जरि अहंकारें न आइकसि, नाशसी. ॥ ५८
जें अहंकार धरुनी 'भांडेना' म्हणतोसि तूं, ।
हें मिथ्या, तुज तूझीच युद्धीं प्रकृति योजिल. ॥ ५९
संस्कारें कर्म जें जालें, प्रारब्धें बद्ध तूं तया. ।
करूनि इच्छिसी मोहें, करिसी तें अवश्य तूं. ॥ ६०

अर्जुना! सर्व भूतांच्या असे हृदयीं ईश्वर. ।
बुद्धिसूत्रें काळयंत्रीं आरूढे नाचवीतसे. ॥ ६१
त्यातेंचि जाई शरण या भावें, कीं समस्त तो; ।
तत्प्रसादें थोर शांती पद शाश्वत पावसी. ॥ ६२
ऐसें गुह्याहुनी गुह्य ज्ञान म्यां उपदेशिलें, ।
विचारूनी अशेषें हें, तुज मानेल तें करीं. ॥ ६३
सर्वां गुह्यांहुनी गुह्य आतां हा शब्द आइक. ।
सुबुद्धि इष्ट तूं माझा, म्हणोनि वदतों हित. ॥ ६४
मद्रूपीं मन, मद्भक्त, यजीं वंदीं मलाच तूं. ।
मातेंचि पावसी सत्य, प्रतिज्ञा करितों सख्या! ॥ ६५
एका मातें शरण ये, सर्व धर्मांसि टाकुनी, ।
संचितें क्रियमाणेंही मी नाशीन; भिऊं नको. ॥ ६६
तपहीना नको सांगों, अभक्तां, तों कदापि हें, ।
श्रवणेच्छाविहीनाला, दोष लावी मला, तया. ॥ ६७
माझ्या भक्तांत, जो माझी भक्ति थोर करूनियां, ।
सांगेल हें महागुह्य, पावेल मज निश्चित. ॥ ६८
त्याहूनिही मनुष्यांत माझें प्रिय करी असा ।
न होणार, न त्याहूनी कोणी मत्प्रिय या जगीं. ॥ ६९
गीता हा धर्म्य संवाद माझा तूझा म्हणेल जो, ।
ज्ञानयज्ञेंचि मी त्याणें पूजिलों मज वाटतें. ॥ ७०
श्रद्धाळु, यासि निंदीना, आइकेहि, असा नर, ।
तोहि पावे पापमुक्त लोकां पुण्यात्मिकांचिया. ॥ ७१
हें ऐकिलेंस कीं नाहीं पार्था! एकाग्र मानसें? ।
अज्ञानमोह गेला कीं नाहीं सांग धनंजया! ॥ ७२
स्मृति आली, मोह गेला प्रसादें अच्युता! तुझ्या. ।
असें मी गत[१]संदेह, तुझें वचन मानिन. ॥ ७३
श्रीवासुदेवपार्थांचा हा संवाद महद्भुत ।
राया! आइकिला, आंगीं कांटे अद्यापि माझिया. ॥ ७४
हा म्यां आइकिला गुह्ययोग व्यासकृपेस्तव, ।
योगेश्वराच्या कृष्णाच्या साक्षात् श्रीमुखपंकजें. ॥ ७५

१. संशय गेला आहे ज्याचा असा.

केशवा अर्जुनाचा हा पुण्यसंवाद अद्भुत ।
पुनःपुन्हा आठवूनी, हर्षतों मी पुनःपुन्हा. ॥ ७६
स्मरोनि अत्यद्भुत तें विश्वरूप पुनःपुन्हा, ।
राया! आश्चर्य मानूनी हर्षतों मी पुनःपुन्हा. ॥ ७७
जेथें श्रीकृष्ण योगेश, जेथें पार्थ धनुर्धर, ।
माझ्या मतें तेथ जय भाग्य श्री नीति शाश्वती. ॥ ७८
इति टीका समश्लोकी अध्यायीं **अठराविया** ।
श्रीपार्थसारथी कर्ता जो **वामन**मनोरथी. ॥ ७९

उपसंहार.

हे श्रीमद्भगवद्गीता श्रीकृष्णें **पांडुनंदना** ।
स्वसखा भक्त म्हणुनी, कृपेनें उपदेशिली. ॥ १
**संजयें धृतराष्ट्रातें** यथा[1]श्रुत निरूपिली. ।
हेचि **वैशंपायनेंही** बोलिली **जनमेजया**. ॥ २
**सूतेंही** [2]**नैमिषारण्यवास** जे **शौनकादिक**, ।
त्यांपासीं वर्णिली हेची वेद[3]गुह्यार्थरूपिणी. ॥ ३
देवाधिदेवें श्रीकृष्णें तेचि **वामन**आननें ।
[4]भूलोकभाषेकरुनी [5]समश्लोकीत वर्णिली. ॥ ४
**गीतार्थ** वर्णितां ग्रंथ वाढेल अपरांपर; ।
[6]समश्लोकीप्रतिज्ञा हे केली यास्तव **माधवें**. ॥ ५
विश्वरूपीं **कौरवांतें** स्वयें मारुनि दावुनी, ।
मारवी **अर्जुनाहातीं**; यश, श्री, राज्य, दे तया. ॥ ६
[7]माता धन्य, पिता धन्य, धन्य धन्य सुहृत्सखे, ।
केले **गीतार्थ** गूढार्थ हृदयांत प्रकाशितां. ॥ ७
आतां **वामन**धन्यत्व काय **वामन** वर्णिल? ।
कीं [8]चराचर हें साक्षात् **वासुदेव** दिसे जया. ॥ ८

---

१. जशी ऐकिली तशी. २. नैमिषारण्यवासी. ३. वेदाचे जे गूढ अभिप्राय ते स्पष्ट करणारी. ४. पृथ्वीवरील भाषेनें, मराठी भाषेनें. संस्कृत ही देववाणी, आणि मराठी ही पृथ्वीवरील वाणी हें स्पष्टच. ५. श्लोकाला श्लोक अशी रचना, तींत. ६. समश्लोकी टीका करण्याची प्रतिज्ञा. ७. वामनाची माता. ८. स्थावर जंगम सर्व.

तरि गीतार्थ जो जाणे, कृतकृत्य असाच तो, ।
असा न जो, तया गीता बरवी कळली नसे. ॥ ९
परंतु [1]गीतार्थनिष्ठ तो पावेल तया स्थिती, ।
कीं हे गीता ब्रह्मविद्या ऐसीच [2]वरदायिनी. ॥ १०
श्रीमद्भगवद्गीता हे साक्षात् श्री[3]भगवत्तनू ।
[4]वैरी [5]वरदरायाचे वर येविषयीं इला. ॥ ११
ते या अष्टादशाध्यायीं अध्यायांतीं निरूपिले, ।
श्रवणीं पठणीं अर्थवर्णनीं फळ बोलतां. ॥ १२
त्यांत शास्त्रज्ञ आत्मज्ञ [6]अर्थश्रवणवर्णनीं ।
अधिकारी द्विधा, त्यांत आत्मज्ञानी असोत ते. ॥ १३
कीं तया फळली श्रीमद्गीता [7]कल्पलता; सुख ।
त्यांचें वर्णावया शक्त [8]सहस्राननही नव्हे. ॥ १४
आतां शास्त्रज्ञ जो, आणी आत्मज्ञान नसे तया, ।
उपजे [9]तत्त्वजिज्ञासा अर्थश्रवणवर्णनें. ॥ १५
आर्त जिज्ञासु इत्यादि चौं भक्ति गणना तयां; ।
गुरुरूपें तयां भेटे, वदे तत्त्व जगद्गुरू. ॥ १६
वामनासि दिली भेटी जे रिती मळ्याचळीं, ।
श्रीसच्चिदानंदनामें यतिवेषें रमावरें. ॥ १७
कथा 'निगमसारीं' हे अध्यायीं पहिल्या स्फुट ।
बोलिला तोचि विश्वात्मा, ख्यात ते संतमंडळीं. ॥ १८
जिज्ञासु जो, तया भेटे गुरुरूपें रमापती. ।
मरे इतकियामध्यें, तरि पावेचि मुक्ति तो. ॥ १९
कीं '[10]देहांतीं अशा भक्तां ब्रह्म तारक देव तो, ।
उपदेशी' म्हणउनी, बोलते स्पष्ट हे श्रुती. ॥ २०
भक्तां चतुर्विधांमाजि ज्ञानी आत्माचि केवळ; ।
उरल्यांत अशी पावे गति जिज्ञासु भक्त जो. ॥ २१

---

१. गीतार्थांमध्यें निष्ठा ज्याची तो. २. वर देणारी. ३. भगवंताचें शरीर. ४. 'त्यावरी मुक्तिदानाचे' असा पाठ आहे. वरी=त्यावर. ५. वरदात्यांमध्यें श्रेष्ठ, श्रीकृष्ण, त्याचे. ६. अर्थाचें श्रवण आणि वर्णन यांविषयीं. ७. कल्पवृक्ष. ८. सहस्रमुख, शेष. ९. तत्त्व जाणण्याची इच्छा. १०. 'देहांते देवः परब्रह्म तारकं व्याचष्टे' ही श्रुति.

कीं आर्त म्हणजे रोगी, आरोग्यार्थचि जो भजे; ।
अर्थार्थी धनइच्छेनें, भक्त दोघे सकाम हे. ॥ २२
'ये यथा मां प्रपद्यंते तांस्तथैव भजाम्यहम्' ।
अध्यायांत चतुर्थांत ये रिती बोलिला हरी. ॥ २३
अर्थ कीं जे जसें मातें भजती, फळ मी तसें ।
देतों जगद्गुरु तयां सम, कल्पतरू जसा. ॥ २४
परंतु अन्यदेवांच्या भक्तांपरिस थोर ते; ।
कीं पूर्वसुकृतें ज्यांचीं फार, ते हरि सेविती. ॥ २५
तेही सप्रेम भजती, सकामहि जरी तरी, ।
सत्संगें होति निष्काम, तेव्हां जिज्ञासु होति ते. ॥ २६
जिज्ञासु जालियां, तेही आत्मज्ञानास पावती. ।
गीतार्थवर्णनें आणि श्रवणें वर्णिलें जग. ॥ २७
आतां गीतार्थही कोणी जाणोनी विषयातुर ।
नव्हती तत्त्वजिज्ञासु हरिसेवा करूनिही. ॥ २८
त्यांतही दोंपरींचेही, कोणी भेदींच तत्पर, ।
अद्वैत मोडिती, जें कां गीतेमाजि निरूपिलें. ॥ २९
जरी भजति गोविंदा, तरी पशुसमान ते, ।
कीं बळें आणिती द्वैत, भगवद्भजनांत ते. ॥ ३०
दाटूनि वेगळा देव, वेगळा मी म्हणूनियां, ।
'भजती जे पशुसम' म्हणूनि म्हणती श्रुती. ॥ ३१
अद्वैततत्त्वजिज्ञासु भजती ऐक्य; त्यांसही ।
कळलें यद्यपि नसे, न निंदी श्रुति त्यांसही. ॥ ३२
'कीं देव अन्य, मी अन्य, म्हणऊनि उपासिती ।
ते पशू नेणती तत्त्व; म्हणोनि म्हणते श्रुती. ॥ ३३
तस्मात् गीता कामधेनू अद्वैतामृतवर्षिणी. ।
मागती भेदेंगोमूत्र तीस, ते तेंचि दे तयां. ॥ ३४
मूत्र तों कामधेनूचें आणिकां धेनुचें सम. ।
अद्वैतामृत जें थानीं, करी अमर एक तें. ॥ ३५

---

१. विषयामध्यें गुंतलेले. २. 'अथवा योऽन्यां देवतामुपास्तेऽन्योऽसावन्योऽहमस्मीति न स वेद यथा पशुः' ही श्रुति. ३. अद्वैतरूप अमृताचा (दुधाचा) वर्षाव करणारी. ४. भेदरूप गोमूत्र.

असो. हें बोलतां ग्रंथ वाढेल बहु मागुती. ।
'ब्रह्मस्तुति'त्रिचरणीं टीका हे, ते स्थळीं पहा. ॥ ३६
आतां सहज गीतार्थीं निष्ठ, आणि जयां नसे ।
ब्रह्मात्मज्ञानजिज्ञासा, तयांची गति आइका. ॥ ३७
तयांस, आणि हे गीता म्हणती पाठ जे, तयां ।
हे जन्मीं तत्त्व न कळे तरी जन्मांतरीं कळे. ॥ ३८
कीं तत्त्वज्ञान देऊनी, मुक्ति देणार एक जो, ।
तयास प्रिय हे फार, जे गीता म्हणती सदा. ॥ ३९
'ज्ञानयज्ञेन तेनाहमिष्टः स्यामिति मे मतिः,' ।
म्हणोनि बोलिला ऐसें या अध्यायीं जगद्गुरू. ॥ ४०
गीतापाठी असे, तेव्हां ज्ञानियांच समान तो. ।
परंतु त्यासही मुक्ती आत्मज्ञानेंचि; नान्यथा. ॥ ४१
'ज्ञानादेव हि कैवल्यं,' म्हणोनि ब्रह्मसूत्र हें, ।
जरि, जिज्ञासु होऊनी गीतापाठकही, म्हणे. ॥ ४२
तरि गीतार्थपाठाची बोलिली गति, ते तया, ।
परंतु गोडी अर्थाची नेघे, जिज्ञासु तो नव्हे; ॥ ४३
म्हणोनि अर्थनिष्ठांची पायरी थोर त्यांहुनी. ।
जिज्ञासेवांचुनी देव नेदी ज्ञान जगद्गुरू. ॥ ४४
कल्पवृक्षस्वभावत्वें सर्वांसहि समान जो; ।
परंतु गीतापठणें पुण्याचे राशि जोडतां, ॥ ४५
अर्थीं उपजतां प्रीति, तत्त्वजिज्ञासु होय तो. ।
'न च तस्मान्मनुष्येषु कश्चिन्मे प्रियकृत्तमः', ॥ ४६
म्हणोनि बोलिला याच अध्यायांत जगद्गुरू; ।
या जन्मींच हरी त्याला भेटेल गुरु होउनी. ॥ ४७
अथवा पुढिले जन्मीं त्याच्या मोक्षीं न संशय; ।
षष्ठाध्यायीं वर्णियेला योगभ्रष्ट जसा, तसा. ॥ ४८
पावोनि पुण्यलोकातें पुढें ज्ञानीच होइल. ।
ज्ञानाविण नव्हे मुक्ति, नव्हे ज्ञान गुरूविणें. ॥ ४९
हें सत्य, परि त्या गीतापठणें सर्व तें घडे. ।
प्रीतीनें म्हणतां गीता, अर्थीं आवडि उद्भवे. ॥ ५०

अर्थानुभवजिज्ञासा उपजे त्यावरी तया. ।
आत्मा कळे गुरुमुखें. अभ्यासेंचि तरी स्थिती. ॥ ५१
गीतार्थ वर्णितां, पात्रे अनायासें स्थितीस तो, ।
कीं 'गीतेचा अर्थ सांगे, त्याहुनी मज कोणिही. ॥ ५२
नसे प्रिय, न होणार', म्हणोनी बोलिला हरी. ।
ज्ञान देऊनि जो मुक्ती देणार परमेश्वर, ।
त्याचा जाला प्रिय, तया स्वयें उद्धरणार तो. ॥ ५३
'तेषामहं समुद्धर्ता मृत्युसंसारसागरात्' ।
म्हणूनि द्वादशाध्यायीं बोलिला ये रिती हरी. ॥ ५४
तैसेंचि याचि अध्यायीं बोलिला अर्जुनाप्रती ।
कीं 'ये शरण तूं मातें, बंध तोडीन मी तुझे.' ॥ ५५
सोडवीन तुतें सर्वां पापांपासूनि मी असें ।
बोलिला पापशब्दार्थें संचित क्रियमाणही. ॥ ५६
ज्ञानें तुटे कर्मबंध, ज्ञानाविण न तो तुटे. ।
शरणागतिमात्रें ते तोडिसी केंवि केशवा!? ॥ ५७
म्हणेल अर्जुन असें म्हणऊनि म्हणे हरी ।
कीं 'ये शरण तूं मातें एकातें,' म्हणऊनियां. ॥ ५८
एक मी म्हणिजे जें कां अनेक जग दीसतें ।
तें सर्व एक मी ऐशा सर्व भावें, भजें मज. ॥ ५९
'तमेव शरणं गच्छ सर्वभावेन भारत!' ।
ऐसें जें बोलिला मागें, त्याचाचि स्पष्ट अर्थ हा. ॥ ६०
सर्वात्मभावें शरण येणें, तें ज्ञान केवळ; ।
ज्ञानें शरण तूं येतां, बंध तोडीन सर्व मी. ॥ ६१
म्हणोनि बोलिला भाव ऐसा कीं मज जोंवरी ।
नये शरण, तों ज्ञान न बिंबे बरवें तया. ॥ ६२
जों ज्ञान बिंबलें नाहीं, न तुटे कर्मबंध तों. ।
यालागिं मुक्ति देणार एक तो परमेश्वर. ॥ ६३
तयास गीतापाठें जो अत्यंत प्रिय होइल, ।
तयाचे बंध तोडील निश्चयें तो जगद्गुरू. ॥ ६४

१. अर्थाचा अनुभव घेण्याची इच्छा. २. मोक्ष. ३. केवळ शरण येण्यानें.

हें सत्य परि, या श्लोकीं अर्थ नानापरी जगीं ।
बोलती अर्थ, ते सर्व पाहतां बाध लागतो. ॥ ६५
'सर्वधर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज' ।
या अर्धीं 'एक'शब्दाचा अर्थ बोलति अन्यथा. ॥ ६६
कीं अन्य देव टाकूनि एका शरण ये मला. ।
तेव्हां ज्ञानें शरण ये, हा तों अर्थ न साधला. ॥ ६७
उगाच ये शरण जो ज्ञानावांचूनि, सर्वही ।
धर्म टाकूनि वेदोक्त प्रत्यवाय तयां घडे. ॥ ६८
'यस्त्वात्मरतिरेव स्यादात्मतृप्तश्च मानवः' ।
या दों श्लोकीं ज्ञानियाला धर्मत्यागें न पातक. ॥ ६९
धर्म टाकूनि अज्ञानी जरी शरण जायही, ।
प्रत्यवाय तरी त्याला न सोडी, कर्म टाकितां. ॥ ७०
यालागिं 'एका शरण ये मातें,' म्हणऊनि जें ।
बोलिला, 'एक'शब्दाचा अर्थ हा ज्ञानवाचक. ॥ ७१
पूर्वार्धीं अर्थ ये रीती, उत्तरार्धांतही असा ।
अर्थ जो बोलती, तोही अर्थ बाधित होतसे. ॥ ७२
'अहं त्वा सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः' ।
येथेंही 'पाप'शब्दाचा अर्थ नेणोनि बोलती. ॥ ७३
कीं 'धर्म टाकितां पाप जें कां होईल तूजला, ।
मीं सोडवीन तुजला त्यापासूनि,' म्हणे हरी. ॥ ७४
तेव्हां आधीं करवितो त्या हातीं पाप आपण, ।
मग आपण तीं पापें नाशीन म्हणतो अहो ! ॥ ७५
आणीक फळ तों कांहीं या प्रसंगीं न बोलिला. ।
तूं पाप करिं हें, मी तें नाशीन फळ हेंचि कीं. ॥ ७६
आतां याहूनि पहिला श्लोक, त्यामाजि बोलिला ।
कीं, 'पावसील मज तूं मद्धर्मे भजतां मज.' ॥ ७७
तरि येथें बोलिला कीं, 'माझें यजन वंदन ।
करीं तूं, मग तूं मातें पावसील न संशय.' ॥ ७८
'मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु' ।
ये रिती भजतां धर्म त्यागही, पापही, नव्हे. ॥ ७९

त्यागशब्दें, विष्णुधर्म करावे अन्य टाकुनी, ।
तेधवां नित्यकर्मेंही अर्पणें विष्णुधर्म तो. ॥ ८०
या त्यागें पापचि नव्हे त्याचें तें फळ बोलिला. ।
याहि त्यागें निजप्राप्ती म्हणतो न घडे असें. ॥ ८१
त्यागें ज्या उपजे पाप, मुक्ति त्यागें तया कशी? ।
ज्या त्यागें पाप, त्या त्यागें शरणागतिही कशी? ॥ ८२
यालागिं शंका हे व्यर्थ, अर्थही न समर्थ हा. ।
अज्ञास त्याग धर्माचा बोले हेंही न बोलवे. ॥ ८३
दुसरें ज्ञान नसतां कर्म टाकीं म्हणे जरी, ।
तेव्हां स्वकृत धर्माचा सेतु आपण मोडितो. ॥ ८४
एकल्या ज्ञानियावीण कर्मत्याग न आणिकां. ।
म्हणूनि सर्व गीतेंत पूर्वी सिद्धांत बोलिला. ॥ ८५
येथें अज्ञानियांलागीं कर्मत्याग वदे जरीं, ।
तेव्हां सर्वहि पूर्वोक्त असिद्ध नियमोदित. ॥ ८६
आणि ज्या अर्जुनालागीं धर्म टाकीं म्हणे हरी ।
तोही ज्ञानी स्वयें, ज्याचा गुरू हरि जगद्गुरू. ॥ ८७
यालागिं सर्वप्रकारें ज्ञानियांसचि ये स्थळीं ।
सर्वधर्मत्याग वदे, अन्य अर्थ निरर्थक. ॥ ८८
'नैव तस्य कृते नार्थो नाकृतेनेह कश्चन,' ।
या श्लोकीं टाकितां कर्म, पापी ज्ञानी नव्हे कधीं. ॥ ८९
यालागीं अर्जुन ज्ञानी, 'धर्मत्याग' म्हणूनियां, ।
त्यास सांगे; तया पाप हे शंका अल्पबुद्धिची; ॥ ९०
म्हणाल तरि, कां 'शोक नको करुं,' म्हणे तया, ।
धर्मत्यागें पापशंका तया न उपजे जरी? ॥ ९१
तरि हेही वृथा शंका, कीं साक्षात् परमेश्वर ।
धर्मत्याग वदे तेथें पापशंका उठे कशी? ॥ ९२
मुख्यार्थ याचा होतांही, घ्याचा गौणार्थ कां परी? ।
अर्थ ज्यांला न समजे तेचि घेतील अर्थ हा. ॥ ९३
'मातें शरण ये,' ऐसें बोलतां, कर्मबंधन ।
ज्ञानाविणें न तुटती म्हणसी जरि अर्जुना! ॥ ९४

१. पूर्वोक्त नियमानें सांगितलेली गोष्ट सिद्ध होत नाही.

तरि एका शरण ये, एक मी सर्व जाणुनी, ।
एकत्वबोधें भजतां, कर्मे नाशीन सर्व मी. ॥ ९५
'हेहीविषयिं तूं शोक नको करुं', म्हणूनियां ।
बोलिला पापशब्दार्थें संचितक्रियमाणही. ॥ ९६
कर्म त्रिविध या देहीं होतें जें क्रियमाण तें, ।
भोगितो पूर्वकर्मातें कर्म प्रारब्ध नाम तें. ॥ ९७
प्रारब्धा वेगळीं कर्मे जन्मजन्मांतरार्जितें,[1] ।
कर्मे तीं संचितें, त्यांत भोगें प्रारब्ध नासतें. ॥ ९८
'स्वभावजेन कौंतेय निबद्धः स्वेन कर्मणा' ।
या श्लोकें युद्धराज्यादी त्याचें प्रारब्ध सूचिलें. ॥ ९९
जें भोगिल्याविण कधीं न सुटे, 'भोगिं तें' म्हणे, ।
यावरी 'होउनी ज्ञानी सर्वधर्म' म्हणे 'त्यजीं.' ॥ १००
कीं 'युद्ध व करीं ऐसें,' आतां न म्हणवे तया. ।
प्रारब्ध राज्य करणें आणी बंधूंसि मारणें. ॥ १०१
यालागीं धर्मत्यागांत ज्ञानही त्याग हा नव्हे. ।
यालागिं त्याग सांगोनी युद्धही करवी पुन्हां. ॥ १०२
उरलें क्रियमाणाख्य अणि संचितकर्म जें, ।
तीं दोनी नाशती ज्ञानें, म्हणती पाप दोहिंस. ॥ १०३
'सोडवीन तयां सर्वां पापांपासूनि मी तुतें. ।
नको शोक करूं,' तेही विषयीं अर्थ भाव हा. ॥ १०४
येतां शरण एकत्वें एकत्व ज्ञान तें तुझें, ।
करीन दृढ मी, तेव्हां कर्मे नाशति भाव हा. ॥ १०५
ज्ञान जाल्यावं तीं दोनी नाशती पापसंज्ञितें. ।
कर्मापासूनि त्या आतां आणखी सोडवी कसा? ॥ १०६
म्हणाल तरि जों ज्ञान पाकातें पावलें नसे. ।
तों हीं न नाशती कर्मे संचितक्रियमाणही. ॥ १०७
जो एकत्वें शरण ये आणी जो सगुणा भजे, ।
ज्ञानपाकें तयाचीं तीं कर्मे नाशील भाव हा. ॥ १०८
अकर्तात्मपणें आंगा न लागे क्रियमाणही ।
ज्ञानें संचितही नासे, हीं दोनी पापसंचितें. ॥ १०९

---

१. निरनिराळ्या जन्मीं मिळविलेलीं.

इतुकाही अर्थ एका [1]ब्रह्मसूत्रें करूनियां ।
वेदव्यासें सूचविला, या श्लोकीं जो निरूपिला. ॥ ११०
सूत्रार्थ हा कीं तें ब्रह्म कळल्यावरि पाप जें ।
पुढें होणार, लिंपेना; आणि नाशील पूर्विल. ॥ १११
पुण्यही पापही [2]लोहशृंखळा [3]हेमशृंखळा. ।
तस्मात् जें कर्म तें पाप, या भावें बोलिला हरी. ॥ ११२
पापशब्दें पूर्वकर्म, ज्याला म्हणति संचित. ।
सर्वशब्दें पुढें जें जें क्रियमाण असे द्विधा. ॥ ११३
या सर्व कर्मापासूनी सोडवीन भिऊं नको. ।
यालागिं 'ये तूं शरण एकत्वें' म्हणिजे असें. ॥ ११४
[4]अबाधितार्थ हा ऐसा वेदवेदांतसंमत. ।
यालागिं जाय जो कृष्णा जगीं शरण, तो तरे. ॥ ११५
ऐसेंही परमात्मा तो म्हणतो स्पष्ट कीं, 'मला ।
गीतार्थ वर्णी त्याहूनी नसे प्रिय, न होइल'. ॥ ११६
यालागिं गीतापठणें, जिज्ञासेनें, तदर्थ जे, ।
विचारितां, त्यांस मोक्ष हात जोडुनियां उभा. ॥ ११७
यालागिं हे समश्लोकी टीका प्रकटली जगीं. ।
सर्वदा पाहती ईतें जीवन्मुक्तांसमान ते. ॥ ११८
जगद्गुरू जो सर्वात्मा त्याच्या [5]चरणपंकजीं ।
[6]सर्वात्मभावें शरण वामनें हे समर्पिली. ॥ ११९

अध्याय अष्टादश सौख्यधामा, हा मोक्षसंन्यासचि मोक्षनामा ।
वाचाल भावें जयि सर्वदा हो ! तयीं नुरे लेश प्रपंचदाहो. ॥ १२०
अध्यायांतीं एक हा श्लोक जाणा, पुष्पप्राय श्रीगुरूतें सुजाणा, ।
पायीं त्याच्या लेहुनी अर्पिला हो, मागें हाची सर्वदा स्वात्मलाहो. ॥ १२१

समश्लोकी टीका प्रकटलि जगीं [7]ज्ञानसरिता,
सदा स्नानें पानें करुनि करि आनंदभरिता ।
अनंतां जन्मांच्या हरुनि सकळा साच [8]दुरिता,
स्वयें दे मोक्षातें श्रवणपठणीं हेचि त्वरिता. ॥ १२२

---

१. 'तदधिगमे उत्तरपूर्वाघयोरश्लेषविनाशौ तद्व्यपदेशात्' हें ब्रह्मसूत्र. २. लोखंडाची बेडी. ३. सोन्याची बेडी. ४. ज्याला कांहीं बाध येत नाहीं—असा अर्थ. ५. चरणकमलीं. ६. हा सर्वांचा एक आत्मा या श्रद्धेनें. ७. ज्ञानरूप नदी. ८. पातकाला.